सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | मंगळवार, ४ मार्च २०२५ । युगाब्द ५१२६ । वर्ष ४१ वे अंक ११६ । पाने १२ । किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


# घरे, कृषीपंपांना वीजदर सवलत आदीसाठी ६ हजार ४८६ कोटी

## अर्थसंकल्पीय अधिवेशनात पुरवणी मागण्या सादर

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३ मार्च**

ग्रामीण नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजनेतून घरे, मुख्यमंत्री बळीराजा वीजदरसवलत योजनेंतर्गत कृषिपंप ग्राहकांना वीजदर सवलत, केंद्र योजनेअंतर्गत रस्ते व पूल प्रकल्पांसाठी बिनव्याजी कर्जासाठी निधी, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य योजना, पुणे रिंग रोड, जालना नांदेड द्रुतगती महामार्गाच्या कामांना गती, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळास बळीराजा जलसंजीवनी



**मुंबई : राज्य विधीमंडळांच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार व इतरांनी छत्रपती शिवरायांना अभिवादन केले.**

योजना, शासन अंशदान घटकाखाली विविध प्रकल्पांना निधी अशा लोकोपयोगी आणि राज्याच्या पायाभूत विकासाला बळकटी देण्यासाठी निधीची तरतूद असलेल्या ६ हजार ४८६ कोटी २० लाख रुपयांच्या आणि निव्वळ भार ४ हजार २४५ कोटी ९४ लाख रुपये असलेल्या पुरवणी मागण्या सोमवारी विधीमंडळात सादर करण्यात आल्या. आजपासून सुरु झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी वर्ष २०२४-२५ च्या पुरवणी मागण्या आज विधानसभेत सादर केल्या. सादर केलेल्या ६ हजार ४८६ कोटी २० लाख रुपयांपैकी ९३२.५४ कोटींच्या मागण्या अनिवार्य, ३४२०.४१ कोटींच्या मागण्या कार्यक्रमांतर्गत आणि २१३३.२५ कोटी रुपयांच्या रकमा केंद्र पुरस्कृत कार्यक्रमांतर्गत अर्थसहाय्य उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने सादर करण्या आल्या आहेत. ६४८६.२० कोटींच्या स्थूल पुरवणी मागण्या असल्या तरी त्याचा प्रत्यक्ष निव्वळ भार हा. ४२४५.९४ कोटी आहे. (सविस्तर वृत्त पान २ वर)

**विभागनिहाय प्रस्तावित पुरक मागण्या- मार्च, २०२५**

| विभाग | रक्कम (रुपये कोटीत) |
|---|---|
| ग्राम विकास विभाग | ३००६.२८ |
| उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म | १६८८.७४ |
| नगर विकास विभाग | ५९०.२८ |
| उच्च व तंत्र शिक्षण विभाग | ४१२.३६ |
| सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग | ३१३.९३ |
| पर्यावरण व वातावरणीय बदल | २५५.५१ |
| महसूल व वन विभाग | ६७.२० |
| इतर मागास बहुजन कल्याण विभाग | ६७.१२ |
| सार्वजनिक बांधकाम विभाग | ४५.३५ |

## महत्त्वाचे

### विधान परिषदेच्या ५ जागांसाठी २७ मार्चला द्वैवार्षिक निवडणूक

**मुंबई :** केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानपरिषदेच्या ५ जागांसाठी द्वैवार्षिक निवडणूक जाहीर केली आहे. विधानसभा सदस्यांद्वारे निवडून दिल्या जाणाऱ्या विधानपरिषदेच्या ५ सदस्यांच्या जागा राजीनाम्यामुळे रिक्त झाल्या आहेत. त्यासाठी २७ मार्चला मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी सोमवार, १० मार्च २०२५ रोजी अधिसूचना जारी केली जाईल. १७ मार्चपर्यंत उमेदवारांना नामांकन अर्ज दाखल करता येईल. अर्जांची छाननी १८ मार्च केली जाईल, तर नामांकन अर्ज मागे घेण्याची मुदत २० मार्चपर्यंत आहे. २७ मार्चला सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत या निवडणुकीसाठी मतदान होईल. तर त्याच दिवशी ५ वाजेनंतर मतमोजणी होणार आहे.

### सोमनाथ सुर्यवंशी मृत्यूप्रकरणी आंबेडकरी जनतेचे आझाद मैदानावर तीव्र आंदोलन

**मुंबई :** परभणीमध्ये सोमनाथ सुर्यवंशी यांचा मृत्यू ही हत्या असून संबंधित पोलिसांना कठोर शिक्षा व्हावी, यासाठी संपूर्ण प्रकरणाची चौकशी हायकोर्टाच्या न्यायाधिशांकडून करावी तसेच सरकारने सुर्यवंशी यांच्या कुटुंबियांना एक कोटी रुपयाची आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष खासदार वर्षा गायकवाड यांनी केल्या आहेत. परभणी प्रकरणी आझाद मैदानात हजारो आंबेडकरी जनतेच्या वतीने राज्यव्यापी आंदोलन करण्यात आले, यावेळी खा .गायकवाड म्हणाल्या की, परभणी प्रकरण सरकारने जाणीवपूर्वक दडपण्याचा प्रयत्न केला आहे. पोलीस मारहाणीत एका तरुणाचा मृत्यू झाला तरीही सरकार त्याकडे गांभिर्याने पहात नाही, पण सरकारला आम्ही स्वस्थ बसू देणार नाही. सोमनाथ सुर्यंवंशी व विजय वाकोडे यांना न्याय मिळेपर्यंत हा संघर्ष सुरुच राहणार आहे.

# महिला दिनी मिळणार लाडक्या बहिणींना हप्ता

**मंत्री अदिती तटकरे यांनी दिली माहिती**

**मुंबई, ३ मार्च**

महिला दिनाच्या पूर्वसंध्येला म्हणजे ७ मार्चला लाडक्या बहिणींना फेब्रुवारीचा हप्ता मिळणार असल्याची माहिती मंत्री अदिती तटकरे यांनी दिली. महिला प्रतिनिधीसाठी विशेष सत्र होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

लाडकी बहीण योजनेवर विरोधक आधीपासूनच टीका करीत आले आहेत. आम्ही जवळपास अडीच कोटी महिलापर्यंत पोहोचलो आहोत, गेल्या महिन्यात २ कोटी ४० लक्ष महिलांना यांचा लाभ झाला आहे. फेब्रुवारी म हिन्यात त्याच प्रमाणात लाभार्थी राहणार आहेत, असे त्यांनी सांगितले.

लाडकी बहीण योजना ही विरोधकांच्या डोळ्यात खूपत असल्याने त्यांनी या योजनेला विरोध केला. आता महिलांचा महायुतीला मि ळणारा प्रतिसाद पाहता त्यांना नैराश्य आले आहे म्हणून ते खोट्या गोष्टी पसरवण्याचा प्रयत्न करीत आहेत. पण, महायुतीचे सरकार सक्षम आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित



पवार आणि एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सरकार ही योजना अशीच सुरू ठेवणार आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

फेब्रुवारी महिन्याचा हप्ता महिला दिनाच्या पूर्वसंध्येला महिलांच्या खात्यात जमा होणार आहे, तर माचीचा हप्ता अधिवेशन झाल्यावर विभागाच्या वतीने निधीचे नियोजन करण्यात येईल, तेव्हा देण्यात येईल. लाडकी बहीण योजनेचा हप्ता २१०० रुपये करण्याचा योग्य निर्णय हा मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री घेतील. आम्ही योजनेचा निधी लाडक्या बहीणींच्या खात्यात कसा जाईल, यासाठी प्रयत्न करणार आहोत. बचत गटाच्या माध्यम ातून महिलांनी आर्थिक सक्षम व्हावे यासाठी आम्ही प्रयत्नशील राहणार आहोत, असे अदिती तटकरे म्हणाल्या.

# राममंदिरावरील हल्ल्याचा कट उधळला

**● फैजाबादेतून अतिरेक्याला अटक । दोन ग्रेनेड जप्त । आयएसआयकडून घेतले होते प्रशिक्षण**

**लखनौ, ३ मार्च**

कोट्यवधी हिंदूंच्या आस्थेचे केंद्र असलेल्या अयोध्येतील राममंदिरावर दहशतवादी हल्ला करण्याचा नापाक मनसुबा गुजरात दहशतवाद विरोधी पथक (एटीएस) आणि फरिदाबाद विशेष कृती दलाने (एसटीएफ) उधळला आहे. दोन राज्यांतील पोलिसांनी संयुक्त कारवाई करीत अब्दुल रहमान नावाच्या तरुणाला अटक केली. तो अयोध्यतील रहिवासी आहे. त्याच्या ताब्यातून दोन ग्रेनेड जप्त करण्यात आले. सुरक्षा यंत्रणांनी तातडीने ते निष्क्रिय केले आहेत.

अब्दुल दुल रहमान पाकिस्तानातील पाताळयंत्री गुप्तचर संस्था आयएसआयच्या संपर्कात होता, अशी माहिती पोलिसांनी दिली. राममंदिरावर हल्ला घडवण्यासाठी आयएसआयने त्याला तयार केले होते. तो कित्येक कट्टरपंथी जमातींसोबत जुळला असल्याची माहितीही समोर आली. राममंदिराची उभारणी झाल्यानंतर त्यावर हल्ला करण्याचा कट आयएसआयने रचला होता. अब्दुलने यापूवीर्ती राममंदिराची पाहणी केल्याचे तपासात निष्पन्न झाले. राममंदिरातील सुरक्षेची माहिती त्याने आयएसआयला दिली होती. मंदिरात ग्रेनेड हल्ला करून मोठ्या प्रम ाणात नुकसान करण्याचा कट दहशतवाद्यांनी रचला होता. त्यातच एक अतिरेकी भारतात मोठा हल्ला घडवण्याचा कट रचत असल्याची माहिती गुजरात एटीएसला मिळाली होती. या माहितीच्या आधारे गुजरात एटीएस आणि फरिदाबाद एसटीएफने सापळा रचला आणि अब्दुल रहमानला अटक केली. अब्दुल रहमान आयएसआयच्या इस्लामिक स्टेट खुरासान प्रोव्हिन्स अर्थात् आयएसकेपीचा सदस्य आहे. या मोड्युलच्या उर्वरित सदस्यांचा शोध आता सुरक्षा यंत्रणांनी सुरू केला आहे. कडक सुरक्षा आणि सतर्कतेचा आदेश अब्दुलला अटक झाल्यानंतर अयोध्येसह देशभरातील सवंदेनशील धार्मिक स्थळांची सुरक्षा कडक करण्याचा तसेच सतर्कतेचा आदेश देण्यात आला. दहशतवाद्यांचे मनसुबे यशस्वी होऊ देणार नाही आणि त्यांचे संपूर्ण नेटवर्क खोदून काढले जाईल, असे सुरक्षा यंत्रणांनी सांगितले.

**असे केले जेरबंद**

फैजाबाद येथून रेल्वेगाडीने अब्दुल रहमान फरिदाबाद येथे गेला होता. तिथे त्याच्या सूत्रधाराने त्याला दोन ग्रेनेड सोपवले. रेल्वेने अयोध्येला पोहोचल्यावर हल्ला करण्याची योजना त्याने आखली होती. मात्र, त्याची माहिती आधीच सुरक्षा यंत्रणांना मिळाली होती. गुजरात एटीएस, फरिदाबाद एसटीएफने संयुक्त कारवाई करीत रहमानच्या मुसक्या आवळल्या.

**अब्दुलची केंद्रीय यंत्रणांकडून चौकशी**

सध्या हरयाणा पोलिस आणि केंद्रीय सुरक्षा यंत्रणा अब्दुल रहमानची कसून चौकशी करीत आहेत. त्याच्या मोबाईलचे न्यायवैद्यक परीक्षण केले जात आहे. यात कोण-कोण सहभागी आहेत. याची माहिती अब्दुलकडून घेतली जात आहे.

# मुंडे, कोकाटेंच्या राजीनाम्यासाठी विरोधक आक्रमक

**● विधानभवनाच्या पायऱ्यावर आंदोलन**

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि.३ मार्च**

राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला आजपासून सुरुवात झाली आहे. वादग्रस्त मंत्री धनंजय मुंडे व कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्यासाठी विरोधकांनी पहिल्या दिवसापासूनच आक्रमक पवित्रा घेतला.' महाराष्ट्र मे दो गुंडे ,मुंडे और कोकाटे, अशी घोषणाबाजी करत विधान भवनाच्या पायऱ्यावर आंदोलन केले तर विधान परिषदेत दोघांच्या राजीनाम्याची मागणी गोंधळ घातला. मुख्यमंत्री फडणवीस यांनी कोकाटे यांचे प्रकरण न्यायालयात प्रलंबित असून त्यांच्या निकालानंतर राज्यपाल व सभागृह त्याबाबत निर्णय घेईल, असे उत्तर देत विरोधकांना शांत करण्याचा प्रयत्न केला.

अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी महाविकास आघाडी च्या आमदारांनी एकत्रितपणे विधानभवनाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन केले .त्यानंतर म हायुती सरकारच्या

निषेधार्थ जोरदार घोषणाबाजी करीत मंत्री धनंजय मुंडे आणि माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्यासाठी आक्रमक झाले. महाराष्ट्रात दोन गुंडे, कोकाटे आणि मुंडे, अशी घोषणाबाजी करीत विधानभवनाच्या पायऱ्यावर काहीकाळ आंदोलन केले. राज्यपालांच्या अभिभाषनानंतर विधान परिषदेत झालेल्या काम काजावेळी विधान परिषदेत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी शोक प्रस्ताव मांडत असताना हा मुद्दा पुन्हा लावून धरला. एखाद्या मंत्र्याला न्यायालयाने दोषी जाहीर केले असतानाही त्याला पाठीशी घातले जाते राजीनामा घेतला जात नाही, ही अत्यंत खेदाची बाब असल्याचे सांगून यावर तातडीने सभापतीने निर्णय द्यावा अशी मागणी केली. शोक प्रस्ताव मांडत असताना हा मुद्दा मांडल्याने सत्ताधारी पक्षाच्या आमदारांनी त्याला आक्षेप घेतला. सभापती रामराजे शिंदे यांनीही दानवे यांना थांबण्याच्या सूचना केल्या. त्यामुळे काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर देत विरोधकांना शांत करण्याचा प्रयत्न केला. कोकाटे यांनी शिक्षेविरोधात दाखल केलेल्या याचिकेवर न्यायालयात सुनावणी झाली असून कोर्टाने निर्णय प्रलंबित ठेवला आहे. त्यांचा निर्णय जाहीर झाल्यानंतर राज्यपाल तसेच सभागृह मंत्री कोकाटे यांच्याबाबत योग्य तो निर्णय घेतील असे आश्वासन दिले मात्र विरोधकांची त्यावर समाधान झाले नाही. त्यातच सभापती शोक प्रस्ताव मांडून दिवसभराचे कामकाज स्थगित करण्यात आले.

**मुंडे, कोकाटे यांची मुख्यमंत्र्यांसोबत बैठक**

विरोधकाच्या रडारवर असलेल्या वादग्रस्त मंत्री धनंजय मुंडे व माणिकराव कोकाटे यांनी आज राज्यपालाचे अभिभाषण झाल्यानंतर मुख्यमंत्र्यांशी भेट घेऊन चर्चा केली यावेळी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर उपमुख्यमंत्री अजित पवारही उपस्थित होते . यावेळी त्यांच्या राजीनामे बाबतची भूमिका निश्चित करण्यास बाबत मुख्यमंत्र्यांनी चर्चा केली असल्याचे समजते.

**विधानसभेत विरोधी पक्षनेतेपदी ठाकरे गट तर परिषदेत काँग्रेसला संधी**

महाविकास आघाडीच्या तोकड्या संख्याबळामुळे अद्याप विधानसभेतील विरोधी पक्षनेतेपदीची निवड झालेली नाही. तिन्ही पक्षांमध्ये उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे सर्वाधिक वीस आमदार असल्याने त्यांच्याकडे हे पद दिले जाईल तर विधान परिषदेत काँग्रेसचे सर्वात जास्त सदस्य असल्याने या सभागृहात विरोधी पक्षनेते पदी काँग्रेसच्या आमदाराला संधी दिली जाईल. असे आघाडीच्या बैठकीच्या ठरल्या आहे असे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नाना पटोले यांनी जाहीर केले विधानसभेत विरोधी पक्षनेते पदासाठी भास्करराव जाधव तर विधान परिषदेत सतेज पाटील यांनाही संधी मिळण्याची दाट शक्यता आहे.

**आव्हाडांची हातात बेड्या घालून एन्ट्री!**

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते आ. जितेंद्र आव्हाड हातात बेड्या घालून जितेंद्र आव्हाड विधिमंडळात पोहोचले. अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर घाला घातला जात आहे. व्यक्त होणाऱ्या कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करुन त्यांचे आवाज बंद केले जात आहेत. ही पद्धत चुकीचा आहे. व्यक्त होणे हा आमचा संविधानिक अधिकार आहे. आम्हाला व्यक्त होता आलंच पाहिजे. राईट टू एक्सप्रेशन, राईट टू स्पीच हे आमचे मूलभूत अधिकार आहेत. ते शाबूत राहिलेच पाहिजेत म्हणून या बेड्या आहेत. अमेरिकेत भारतीयांवर अन्याय होत आहे. व्हीसाच्या बाबतीत ट्रम्प सरकारने आखलेले धोरण अनेक भारतीयांचा संसार उद्ध्वस्त करणारं आहे. भारतीयांना विमानात कोंबून भारतात पाठवलं गेलं. पायात साखळदंड, हातात हतकड्या, शौचालयाला जागा नाही, जेवण नाही असं अपमानित करून भारतीयांना भारतात पाठवलं गेले. अमेरिका आपला बाप नाही.









सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

पान १ वरुन

## ६ हजार ४८६ कोटींच्या पुरवणी मागण्या सादर

सादर पुरवणी मागण्यांमध्ये महत्वाच्या व मोठ्या पुरवणी मागण्या अशा :- (रुपये कोटीत)

| बाब | रक्कम | समायोजना नंतरची रक्कम |
|---|---|---|
| केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजनेच्या (ग्रामीण) सर्वसाधारण व अ.ज. घटकातील लाभार्थ्यांकरिता पुरवणी मागणी | ३७५२.१६ | २७७९.०५ |
| मुख्यमंत्री बळीराजा वीजदरसवलत योजना- कृषिपंप ग्राहकांना (सर्वसाधारण, अ.जा. व अ.ज. घटक) वीजदर सवलत देण्यासाठी | २००० | १६८८.७४ |
| केंद्र सरकारकडून राज्य शासनाला भांडवली खर्चासाठी विशेष सहाय्य योजनेअंतर्गत रस्ते व पूल प्रकल्पांसाठी देण्यात येणाऱ्या बिनव्याजी कर्जासाठी | १४५०.०० | लाक्षणिक |
| राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान छठङन्च् योजनेच्या सर्वसाधारण प्रवर्गाकरिता केंद्र व राज्य हिस्स्यापोटी | ६३७.४२ | लाक्षणिक |
| मुद्रांक शुल्क अनुदान - महानगरपालिका व नगरपालिका | ६०० | ६००. |
| ✻ राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेकरिता | ३७५ | २५७.०३ |
| राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाच्या अंमलबजावणीसाठी केंद्र हिस्सा | ३३५.५७ | लाक्षणिक |
| ग्रामपंचायतींच्या रस्त्यांवरील पथदिव्यांच्या विद्युत देयकांची रक्कम, विद्युत देयकांच्या व्याज व दंडाची रक्कम महावितरणला अदा करण्यासाठी | ३०० | २०९.५५ |
| राज्यातील ४ साखर कारखान्यांना राष्ट्रीय सहकार विकास निगम यांच्याकडून महाराष्ट्र शासनामार्फत खेळत्या भागभांडवल निर्मितीसाठी मार्जिन मनी लोन | २९६. | २९६. |
| पुणे रिंग रोड, जालना नांदेड द्रुतगती महामार्ग या प्रकल्पांच्या भूसंपादनाकरीता घेतलेल्या कर्जावरील व्याजाच्या परतफेडीसाठी | २४४ | लाक्षणिक |
| महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीवेतन व सातव्या वेतन आयोगाच्या थकबाकीसाठी | २२१.८९ | लाक्षणिक |
| गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळास बळीराजा जलसंजीवनी योजना, शासन अंशदान या घटकाखाली विविध प्रकल्पांसाठी | १७५ | लाक्षणिक |
| राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेंतर्गत मुळा-मुठा नदी, पुणे- प्रदुषण कमी करण्याचा प्रकल्प | १७१ | १०३.५१ |
| डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजनेसाठी | १५० | १५० |
| धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान- केंद्र हिस्सा | १०० | लाक्षणिक |
| यंत्रमाग ग्राहकांना वीजदर सवलत देण्यासाठी अतिरिक्त तरतूद करणेबाबत | १०० | लाक्षणिक |



## शिवसेना उबाठा पक्षाच्यावतीने महापालिका आयुक्तांना निवेदन

**सोलापूर, दि. ३ मार्च-**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने शहरातील विविध मागण्या आणि समस्यांबाबत महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांना निवेदन देण्यात आले.

सोलापूर शहरातील वाढलेले अतिक्रमण,स्वच्छता,पाणीपुरवठा,ग्रामदैवत सिद्धेश्वर मंदिर समोरील शौचालय,ऍडव्हेंचर पार्क याबाबत निवेदन देऊन सविस्तर चर्चा करण्यात आली. यावर लवकरच सकारात्मक कारवाई करण्यात येईल,असे आश्वासन यावेळी पालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी दिले.लवकरच योग्य तो निर्णय घेऊन सोलापुरवासियांना दिलासा द्यावा अन्यथा संवैधानिक पध्दतीने आंदोलन करण्यात येईल, असा इशारा यावेळी जिल्हाप्रमुख अजय दासरी,उपजिल्हाप्रमुख प्रताप चव्हाण,शहर प्रमुख महेश धाराशिवकर, निवडणुकणयंत्रणा प्रमुख शशिकांत बिराजदार यांनी दिला आहे.यावेळी शहर प्रमुख शरणराज केंगनाळकर,उपजिल्हाप्रमुख दत्ता गणेशकर,विधानसभा संघटक दत्ता माने, शिवा ढोकळे, जगदीश कलकेरी,अजय खांडेकर,अमित भोसले, राम वाकसे, उज्वल दिक्षित यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते.



## हन्नूरच्या अनंत चैतन्य स्कूलच्या चिमुकल्यांनी केले वृक्षारोपण

**अक्कलकोट दि ३ मार्च-**

महान भौतिकशास्त्रज्ञ सी. व्ही. व्यंकटरमन यांचा जन्मदिवस राष्ट्रीय विज्ञान दिवस. याचे औचित्य साधून महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य सेमी इंग्रजीच्या चिमुकल्यांनी वृक्षारोपण करून महान शास्त्रज्ञ सी. व्ही. व्यंकटरमन यांना अभिवादन करण्याबरोबरच पर्यावरण समतोल साधण्यासाठी आपल्या परीने योगदान देण्याचा प्रयत्न केला. या चिमुकल्यांना शिक्षिका सुरवसे, कोळी, पवार व विभाग प्रमुख शशी अंकलगे यांचे प्रोत्साहन मिळाले. या लहान चिमुकल्यांनी केलेल्या स्तुत्य उपक्रमाचे, त्यांच्या प्रयत्नाचे संस्थेचे अध्यक्ष व आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी, संस्थेचे संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, हन्नूर प्रशालेचे माजी प्राचार्य सिद्धेश्वर कल्याणशेट्टी, संचालिका व मार्गदर्शिका शांभवीताई कल्याणशेट्टी, हन्नूरचे उपसरपंच सागरदादा कल्याणशेट्टी, संचालक मल्लिकार्जुन मसुती, सी. ई. ओ. रुपाली शहा, विज्ञान विभाग प्रमुख पुनम कोकळगी यांनी कौतुक केले.

# अन्यथा जशास तसे उत्तर देऊ

### आमसभेतील विरोधकांच्या भूमिकेवरुन परिचारक समर्थक आक्रमक

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.३ मार्च -**

काही दिवसांपूर्वी पंढरपूर पंचायत समिती मध्ये झालेली आमसभा ही ग्रामीण भागातील मूलभूत प्रश्न बाजूला ठेवून पंढरपूर नगरपालिकेची निवडणूक डोळ्यासमोर ठेवून घेण्यात आली. यामध्ये ग्रामीण भागातील प्रश्नांकडे दुर्लक्ष करून शहरातील प्रश्न मांडण्यात आले.शहरात १३ रस्त्यांची कामे सुरू असताना परिचारक यांच्या नावाचा उल्लेख करून स्वतःचे महत्त्व वाढवून परिचारकांवर व्देष म्हणून ही सभा होती का ? असा प्रश्न उपस्थित करत पुढील काळात परिचारक कुटुंबाला टार्गेट केल्यास जशास तसे उत्तर देऊ असा इशारा राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या आमदारांना परिचारक समर्थकांनी पंढरपूर येथील पत्रकार परिषदेत दिला.

येथील कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये सोमवारी (ता.३) परिचारक गटाच्या पदाधिकाऱ्यांकडून नुकत्याच झालेल्या आमसभेत विरोधकांनी केलेल्या विविध आरोपांना उत्तर देण्यासाठी पत्रकार परिषदेचे आयोजन केलेले होते. यावेळी बाजार समितीचे सभापती हरिष गायकवाड, पंढरपूर अर्बन बँकेचे अध्यक्ष सतीश मुळे, माजी नगराध्यक्ष लक्ष्मण शिरसट, पंचायत समितीचे माजी उपसभापती प्रशांत देशमुख, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती राजूबापू गावडे, लक्ष्मण धनवडे, सुभाष मस्के, माऊली हळनवर, भाजपा महिला आघाडीच्या प्राजक्ता बेणारे, विश्रांती भुसनर, नगरसेवक विक्रम शिरसट आदींसह पांडुरंग परिवारातील विविध संस्थांचे अन्य पदाधिकारी देखील उपस्थित होते.

काही दिवसापूर्वी पंढरपूर पंचायत समिती येथे माढ्याचे आमदार अभिजीत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आमसभेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये सांगोल्याचे आमदार बाबासाहेब देशमुख, मोहोळच्या आमदार राजू खरे आणि पंढरपूर मंगळवेढाचे आमदार समाधान आवताडे सहभागी झाले होते. या आमसभेवर परिचारक गटातील समर्थकांनी आक्षेप घेत आमदारांचा निषेध करण्यात आला आहे. याचबरोबर महिला अधिकाऱ्यांना अपमानास्पद वागणूक दिल्याने महिला आयोगाकडे जाणार असल्याचा इशारा ही देण्यात आला आहे.



#### आमसभेचे अध्यक्षपद आमदार आवताडेंकडेच हवे होते

पंढरपूर तालुका पंचायत समितीच्या वतीने नुकतेच आमसभेचे आयोजन करण्यात आलेले होते. या आमसभेच्या अध्यक्षपद पंढरपूर मतदार संघाचे आमदार समाधान आवताडेंनीच भूषविणे गरजेचे होते. मात्र माढ्याचे आमदार अभिजीत पाटील यांच्या अध्यक्षपदी ही सभा पार पडली. मुळात हे चुकीचे झाले आहे. कारण आमसभा ही पंढरपूर तालुक्याची होती. त्यामुळे सहाजिकच पंढरपूर मतदार संघाचे आमदार हेच अध्यक्षपदी हवे होते असे पंचायत समितीचे माजी उपसभापती प्रशांत देशमुख यांनी सांगितले.

#### आमसभेत शहरातील प्रश्न उपस्थित करणे चुकीचे

पंचायत समितीच्या वतीने तालुक्यातील प्रश्ना संदर्भात आमसभेचे आयोजन करण्यात येत असते. शहरातील प्रश्ना संदर्भात पालिकेची सभा असते. त्यामुळे आमसभेत हेतू पुरस्सर आगामी काळातील पालिका निवडणूका डोळ्या समोर ठेवून विरोधकांनी शहरातील प्रश्न उपस्थित केलेले आहेत. हे चुकीचे झालेले आहे असे पंढरपूर अर्बन को.ऑप.बँकेचे अध्यक्ष सतीश मुळे यांनी सांगितले.

#### महिला आयोगात तक्रार करणार

आमसभे मध्ये महिला आधिकाऱ्यांना विरोधकांनी घरातील नोकरां प्रमाणे भाषा वापरली. महिला आधिकाऱ्यांना शासकीय कामां विषयी प्रश्न जरुर विचारा मात्र हे प्रश्न विचारत असताना त्यांना दमबाजी न करणे, भाषा व्यवस्थित असणे गरजेचे आहे. त्यामुळे समस्त महिलांचा हा अपमान आहे. या विरोधात आपण राज्य महिला आयोगाकडे तक्रार करणार असल्याची भाजपा महिला आघाडीच्या डॉं. प्राजक्ता बेणारे आणि विश्रांती भुसनर यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली.



सोलापूर : वाढत्या तापमानात ग्राहकांची काळजी घेण्यासाठी आच्छादन टाकण्यात येत आहे. पूर्व मंगळवार पेठ बाजारपेठेत टिपलेले हे छायाचित्र (छायाचित्र : केवल तिवारी)

## शहरातील विविध रस्त्यांवर ग्रीन शेडचे अच्छादन; वाढत्या उन्हापासून संरक्षण होण्यासाठी दुकानदारांचा पुढाकार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ मार्च**

सोलापूर शहराचे तापमान गेल्या काही दिवसांपासून दिवसेंदिवस वाढत आहे. फेब्रुवारी महिन्यातच तापमानाचा पारा हा ३७ अंशा पलीकडे गेला होता. मार्च महिन्यात देखील कडक उन्हाळा असेल असा हवामान खात्याने अंदाज वर्तवल्यानंतर वाढत्या उन्हापासून संरक्षण होण्यासाठी नागरिकांनी विविध उपयोजनात्मक पर्याय शोधण्यास प्रारंभ केला आहे. त्यातूनच सोलापूर शहरातील विविध बाजारपेठांमध्ये आलेल्या नागरिकांना उन्हाचा त्रास होऊ नये यासाठी दुकानदारांच्या वतीने प्रमुख रस्त्यांवर ग्रीन शेड अच्छादन केले जात आहे.

शहरातील मंगळवार पेठ सराफ बाजारात ग्रीन शेड लावण्यात आले आहे. सराफा बाजारात आलेल्या ग्राहकांना उन्हापासून त्रास होऊ नये यासाठी दुकानदारांनी पुढाकार घेऊन हे ग्रीन शेड उभारले आहे. दरवर्षी व्यापाऱ्यांकडून हे पाऊल उचलले जाते. त्याच पद्धतीने नवीपेठ येथे देखील ग्रीनशेड उभारण्यात आले आहेत. रखरखीत उन्हाच्या तीव्र झळा पासून शरीराचे संरक्षण व्हावे यासाठी प्रमुख बाजारपेठेमध्ये ग्रीनशेड विक्रीस सुरुवात झाली आहे. त्यामुळेच सोलापूर शहरातील प्रमुख बाजारपेठ व विविध रस्त्यांवर असे ग्रीनशेडचे आच्छादन दिसून येत आहे.

## २७ मिळकतदारांच्या ७/१२ उताऱ्यावर पालिका चढविणार बोजा

### खुल्या जागेच्या मिळकत थकबाकिपोटी करणार कारवाई

### अन्यथा एप्रिलमध्ये त्या मिळकतींचा जाहीर लिलावाची प्रक्रिया

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मार्च-**

नोटीस बजावूनही मिळकत कराची थकबाकी भरली नसल्याने अखेर संबंधित २७ मिळकतदारांच्या मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर / मिळकत पत्रिकेवर महानगरपालिकेकडील मिळकत कराचा बोजा चढविण्यात येणार आहे. बोजा चढवूनही जर संबंधित मिळकतदार यांनी ३१ मार्च २०२५ च्या आत थकित कराचा भरणा केला नाही तर एप्रिलमध्ये त्या मिळकतींचा जाहीर लिलाव करण्यासाठी प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे.

महानगरपालिका, सोलापूर शहर व हद्दवाढ भागातील मिळकतदारांना त्यांच्या देयकातील थकबाकीसह संपूर्ण कराची रक्कम भरण्याबाबत दि. १७ जानेवारी २०२५ अन्वये स्थानिक वृत्तपत्रामधून एकूण ३२ मिळकतदारांना आवाहन केले होते. तसेच नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत थकबाकीसह सर्व रक्कम भरली गेली नाही तर, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, अनुसूची ड प्रकरण ८ नियम ४२ अन्वये जप्त करण्यात येणाऱ्या मिळकतीचा जाहीर लिलाव करुन मिळकत कराची रक्कम वसूल केली जाणार आहे, अशी माहिती महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी दिली.

जाहीर लिलाव करण्यापूर्वी या मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर / मिळकत पत्रिकेवर महानगरपालिकेचा बोजा चढविण्याची कारवाई करण्यात येणार असल्याबाबत जाहीर नोटीस देण्यात आलेली होती. त्या प्रमाणे वृत्तपत्रामध्ये देण्यात आलेल्या जाहीर नोटीसीस अनुसरुन ३२ मिळकतदारापैकी ५ मिळकतदारांनी थकबाकीची रक्कम भरलेली आहे. उर्वरित मिळकतदारांनी आज रोजी पर्यंत मिळकतकर भरलेला नाही. त्यामुळे उर्वरित २७ मिळकतदारांच्या मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर / मिळकत पत्रिकेवर महानगरपालिकेकडील मिळकत कराचा बोजा चढविण्यास महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या मान्यतेने जिल्हाधिकारी, संबंधित महसुल अधिकारी व कार्यालयांना पत्र पाठविण्यात आले आहे.



## गावगाथा दिवाळी अंकाला उत्कृष्ट साहित्यिक अंक पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मार्च-**

अक्कलकोट तालुक्यातील वागदरी येथून प्रकाशित होणारे''गावगाथा'' दिवाळी अंकाचे तिसरे वर्ष असून ग्रामीण संस्कृती, रूढी, परंपरा व ग्रामीण साहित्य, यासोबत ग्रामीण भागातील लेखकांना व्यासपीठ मिळावे या उद्देशाने मागील तीन वर्षांपासून दिवाळी अंक प्रकाशन केले जात आहे. मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई, दादर सार्वजनिक वाचनालय आणि मराठी विचारधारा प्रतिष्ठान गोरेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मराठी भाषा गौरव दिनाच्या कार्यक्रमात ऊत्कृष्ट साहित्यिक अंक' गावगाथा दिवाळी अंकाला सन्मानित करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे ज्येष्ठ पत्रकार सचिन परब यांच्या हस्ते संपादक धोंडपा नंदे संपादक गावगाथा दिवाळी अंक यांना सन्मान चिन्ह, सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी व्यासपीठावर कवी एकनाथ आव्हाड, कामगारनेते दिवाकर दळवी, संघाध्यक्ष रवींद्र मालुसरे, चितळे उद्योगसमूहाचे राहुल जोगळेकर, दादर सार्वजनिक वाचनालयाचे सेक्रेटरी यतीन कामथे, मराठी विचारधारा प्रतिष्ठानचे विश्वस्त विकास होशिंग उपस्थित होते.

## ओजीटी उपक्रमामुळे रोजगारक्षम पिढी घडण्यास मदत

### सोलापूर विद्यापीठातील कार्यक्रमात प्र-कुलगुरू डॉ. दामा यांचे मार्गदर्शन




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मार्च-**

नवीन शैक्षणिक धोरणानुसार आता पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांना शिक्षण घेतानाच प्रत्यक्ष प्रशिक्षणाची संधी विविध शासकीय, निमशासकीय संस्था तसेच कंपन्यांमध्ये मिळणार आहे. त्यासाठी ऑन जॉब ट्रेनिंग (ओजीटी) व आंतरवासिता अंतर्गत विद्यार्थ्यांना प्रशिक्षण घ्यावे लागणार आहे, त्याचा फायदा रोजगारक्षम पिढी घडण्यास मदत होणार असल्याचे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा यांनी केले. शनिवारी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील प्लेसमेंट सेल विभाग यांच्यातर्फे कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर यांच्या मार्गदर्शनाखाली फॅकल्टी कॅपॅसिटी बिल्डिंग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रा. दामा हे बोलत होते. यावेळी कुलसचिव योगिनी घारे, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे समन्वयक मनीष पाटील, डॉ. श्रीराम राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्लेसमेंट सेल विभागाचे समन्वयक डॉ. अनिल घनवट यांनी केले.

मनीष पाटील म्हणाले, विविध उद्योग व कंपन्यांना कुशल मनुष्यबळाची गरज भासते. आता नवीन शैक्षणिक धोरणात विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाची व्यवस्था केल्याने त्याचा निश्चितच कंपन्यांना फायदा होणार आहे. त्याचबरोबर कुशल मनुष्यबळ देखील तयार होईल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी डॉ. दीपक ननवरे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास अतुल बक्षी, किरण भिसे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यांनी डॉ. रोहिणी शिवशरण यांनी केले तर आभार डॉ. श्रीराम राऊत यांनी मानले.

## शहर हरीत व सुंदर करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे

### आयुक्त डॉ. ओम्बासे : उद्योजक, पर्यावरणप्रेमी संस्था पदाधिकाऱ्यांसमवेत आयुक्तांनी घेतली बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मार्च-**

सोलापूर शहर हरीत व सुंदर करण्यासाठी सर्वानी प्रयत्न करावे.बांधकाम परवानगी देताना ग्रीन बिल्डींग प्रकल्पास चालना देण्यासाठी स्वतंत्र धोरण करण्यात येईल. येणाऱ्या पावसाच्या कालावधीत वृक्षारोपण करण्यासाठी झोन निहाय नियोजन करून परिसरातील शाळा व संस्थाना त्यामध्ये सहभागी करून घेण्यासाठी स्पर्धाचे आयोजन करण्यात येईल, अशी माहिती आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिली.

सोलापूर शहर परिसरात जास्तीत जास्त वृक्षारोपण करून ३३ टक्के हरित क्षेत्र निर्मिती करण्यासाठी आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या अध्यक्षतेखाली शहरातील उद्योजक, पर्यावरण प्रेमी संस्था व नागरिक यांच्या समवेत बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त रवी पवार, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त तैमुर मुलाणी, उपायुक्त श्री. आशिष लोकरे,सहाय्यक आयुक्त पर्यावरण विभाग शशिकांत भोसले, सहाय्यक अभियंता प्रकाश दिवाणजी, पर्यावरण संवर्धन अधिकारी अक्षय मोरे, उद्यान अधीक्षक किरण जगदाळे, चेबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष राजू राठी, धवल शहा, यंत्रमाग संघाचे अध्यक्ष पेंटप्पा गडडम,अंबादास बिंगी, पंकज चींदरकर, नरेंद्र गायकवाड, अनिल जोशी, डॉ.मनोज देवकर, नारायण पाटील, बँक ऑफ बडोदाचे अमित चौधरी, पवन देसाई, अभिषक बदलापुरे, विजय जाधव भारत पाटील आदी उपस्थित होते.

#### हरित पट्टे, रस्ते दुभाजकात वृक्षारोपणासाठी प्रस्ताव

पर्यावरण प्रेमी, सामाजिक संस्था,उद्योजक यांच्या मार्फत शाळा, दवाखाने,शासकीय इमारत परिसर, खुल्या जागा हरित पट्टे, रोड डिव्हायडर वृक्षारोपण/मेन्टेनन्स करण्यात करीता सहभागी व्हावे. त्याकरिता उपायुक्त तैमूर मुलाणी (नोडल अधिकारी) (email-dmcsolapur2gmail.com) यांच्याकडे विहित नमुन्यात प्रस्ताव सादर करावा.

#### पुणे शहराच्या धर्तीवर प्रस्ताव तयार करणार

पुणे शहराच्या धर्तीवर वृक्षप्राधिकरण पुनर्गठन करण्याकरिता सविस्तर प्रस्ताव तयार करण्यात येईल. सी.एस.आर. निधीमधून प्राणी संग्रहालय परिसरामध्ये ३० टक्के हरित क्षेत्र विकसित करण्यासाठी आराखडा तयार करावा. अक्कलकोट रोड एमआयडीसी परिसरातील ओपन स्पेस येथे वृक्षारोपणासाठी संस्थांच्या मागणी अर्जानुसार प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करावे. शहरातील उपलब्ध ओपन स्पेसची स्वतंत्र यादी तयार करून वृक्षारोपण करिता उपलब्ध करून देण्यात दिली.

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर मंगळवार, ४ मार्च २०२५
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



## ऑस्कर स्पर्धेत यंदाही भारताच्या पदरी निराशा

**लॉस एंजेलिस, ३ मार्च**

९७ व्या अकादमी अवॉर्ड्स म्हणजेच ऑस्कर २०२५ च्या विजेत्यांची घोषणा झाली आहे. ऑस्कर हा जगभरातील चित्रपटांसाठी दिला जाणारा सर्वांत मानाचा आणि प्रतिष्ठित पुरस्कार आहे. लॉस एंजेलिस येथे असलेल्या डॉल्बी थिएटरमध्ये यंदाचा ऑस्कर सोहळा पार पडला.

या वर्षी भारतातील गुनीत मोंगा व प्रियांका चोप्राचा सह-निर्मित असलेला 'अनुजा' या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट लाईव्ह ॲक्शन शॉर्ट फिल्ममध्ये फायनल नॉमिनेशन मिळाले होते. मात्र, प्रत्यक्षात भारताला ऑस्करमध्ये कोणताही पुरस्कार मिळाला नाही. या चित्रपटाकडून भारतीयांना बऱ्याच अपेक्षा होत्या. मात्र, त्या भंग झाल्या.

भारतातून यंदा केवळ 'अनुजा' या लाईव्ह ॲक्शन शॉर्ट फिल्मने ऑस्करसाठी प्रवेश मिळवला होता. भारतीय प्रेक्षकांना या सिनेमाकडून मोठ्या अपेक्षा होत्या, मात्र 'अनुजा' अंतिम स्पर्धेत अपयशी ठरली. यावर्षी 'आय एम नॉट अ रोबोट' या शॉर्ट फिल्मने ऑस्कर जिंकत बाजी मारली. त्यामुळे भारतीय सिनेसृष्टीला ऑस्कर जिंकण्यासाठी आणखी वाट पाहावी लागणार आहे.

भारतीय सिनेसृष्टीत दरवर्षी ऑस्कर जिंकण्याची मोठी अपेक्षा असते. 'आर आर आर' चित्रपटाप्रमाणे भविष्यात कोणता भारतीय चित्रपट ऑस्करमध्ये कमाल करेल, हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. गुनीत मोंगा यांना तिसऱ्यांदा ऑस्कर नामांकन मिळाले आहे. याआधी त्यांच्या प्रोजेक्ट्स द एलिफंट विस्पर्स आणि पीरियड एन्ड ऑफ सेंटेंस या चित्रपटांना नामांकन मिळाले होते. (वृत्तसंस्था)

### अशी आहे 'अनुजा' चित्रपटाची गोष्ट

अनुजा ही एका नऊ वर्षीय मुलीची गोष्ट आहे. ही मुलगी एका कपड्यांच्या फॅक्टरीमध्ये तिच्या बहिणीबरोबर काम करते. या चित्रपटात दाखवण्यात आले आहे की, कसे एका निर्णयामुळे तिचे आणि तिच्या संपूर्ण कुटुंबाचे भविष्य बदलून जाते. ॲडम जे ग्रेव्हज यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे, तर सुचित्रा मट्टाई यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे. हा चित्रपट नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होणार आहे.




### 'आय एम नॉट अ रोबोट'ने मारली बाजी

### ९७ व्या ऑस्कर पुरस्कारांची घोषणा



९७ वा ऑस्कर पुरस्कार सोहळा अमेरिकेतील लॉस एंजेलिस येथे पार पडला. अकादमी ऑफ मोशन पिक्चर्स आर्ट्स ॲण्ड सायन्सेसने सर्वोत्कृष्ट ॲनिमेटेड फीचर फिल्म, सर्वोत्कृष्ट अभिनेता, सर्वोत्कृष्ट अभिनेत्री अशा अनेक श्रेणींमध्ये पुरस्कार प्रदान करण्यात आले. हॉलिवूड अभिनेता किरन कल्किनला सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्याचा पुरस्कार मिळाला आहे.

### हिंदीचा डंका!

**लॉस एंजेलिस, ३ मार्च**

९७ वा ऑस्कर पुरस्कार सोहळा अमेरिकेतील लॉस एंजेलिस येथे पार पडला. कॉमेडियन आणि पॉडकास्टर कॉनन ओ'ब्रायन यांनी ऑस्करचे सूत्रसंचालन केले.



'अनुजा'च्या पराभवाने भारतीयांची निराशा झाली असली, तरी कोनन ओ'ब्रायनने भारतीयांना प्रोत्साहन देण्यासाठी कोणतीही कसर सोडली नाही. लॉस एंजेलिसमधील डॉल्बी थिएटरमध्ये झालेल्या ९७ व्या अकादमी पुरस्कार सोहळ्यात कॉनन ओ'ब्रायनने भारतीय प्रेक्षकांना आश्चर्यचकित केले. त्यांनी हिंदीत बोलताना, 'नमस्कार मित्रांनो, तिथे सकाळ झाली आहे म्हणून मला आशा आहे की, तुम्ही चविष्ट नाश्ता करीत ऑस्कर पाहाल. कॉनन ओ'ब्रायनची ही शैली लोकांना आवडली. आता त्याच्या क्लिप्स सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. (वृत्तसंस्था)

## औरंगजेब हा उत्तम प्रशासक होता; त्याचे शंभूराजेंशी धार्मिक भांडण नव्हते

### अबू आझमी यांचे विधान

मोगल बादशहा औरंगजेब हा उत्तम प्रशासक होता. त्याच्यात व छत्रपती संभाजी महाराज यांच्यात धर्माची लढाई नव्हती. उलट त्याच्याच काळात भारताला सोन्याची खाण म्हणून संबोधले जात होते, असा वादग्रस्त दावा समाजवादी पार्टीचे नेते अबू आझमी यांनी केला आहे. सद्यस्थितीत महाराष्ट्रासह देशात मुस्लिमांवर अत्याचार वाढल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला.

अबू आझमी पुढे बोलताना म्हणाले की, औरंगजेब हा उत्तम प्रशासक होता. त्यांच्या काळातच भारताला सोन्याची खान म्हणून संबोधले जात होते. औरंगजेबाची कबर खोदण्याबद्दल बोलणारे भाजप नेते जातीय सलोखा बिघडवत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. दोन वर्षांपूर्वी बोलताना अबू आझमींनी बोलताना म्हटले होते की, छत्रपती शिवाजी महाराजांचा जितका आदर इतर समाज करतो त्याहून अधिक मुस्लीम समाज करतो. शिवाजी महाराजांनी त्यांच्या काळात मुस्लिमांसाठी खूप काही केले. ४० टक्के मुस्लीम त्यांच्याजवळ होते. वकील, सुरक्षा रक्षक सर्व मुस्लीम होते. ही लढाई धर्माची नव्हती तर सत्तेची होती. राजा, महाराजांना धर्माशी देणेघेणे नव्हते.

मी औरंगजेब रहमतुल्ला अलैहच्या साथीला आहे. त्याचा इतिहास जाणून घेतला तर तुम्हाला हे लक्षात येईल की औरंगजेब धर्मनिरपेक्ष राजा होता. त्याने अफगाणिस्तान पासून बर्मापर्यंत आपले राज्य फैलावले. अनेक हिंदू-मुस्लिम राजांनी सत्तेसाठी वेगवेगळे निर्णय घेतले. पण आज त्याला धार्मिक रंग दिला जात आहे आणि त्यामध्ये गोदी मीडिया कारणीभूत आहे.

### देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा : उपमुख्यमंत्री शिंदे

औरंगजेबाचं उदात्तीकरण करणे हे अतिशय दुर्दैवी आहे. अबू आझमी यांच्या विधानाचा निषेध करावा तेवढा कमी आहे. अबू आझमी यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल केला पाहिजे. औरंगजेबाचं कौतुक करणं हे महापाप आहे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.

### मुस्लिमांवरील अन्याय दिसत नाही?

अबू आझमी म्हणाले की, मी दररोज सकाळी पाहतो की मुस्लिमांना अपमानित करण्यासाठी, त्यांना उद्ध्वस्त करण्यासाठी आणि नष्ट करण्यासाठी कट रचले जात असल्याचा आरोप त्यांनी सरकारवर केला आहे. बांगलादेशात हिंदूंवर होणारे अत्याचार दिसत आहे. पण देशाचे पंतप्रधान आणि राज्याचे मुख्यमंत्री हे मुस्लिमांवर होणारा अन्याय पाहू शकत नाहीत का? जर समाजातील २० टक्के लोकांसोबत हे घडत असेल तर ते अजिबात बरोबर नाही. जर तुम्ही त्यांना आरक्षण दिले नाही, त्यांना रोजगार दिला नाही तर ते कुठे जातील? ते हिंदू सणांमध्ये वस्तू विकतात म्हणून तुम्ही म्हणता की ते दारू विकतात. हे चुकीचे आहे. द्वेषाची ही परंपरा थांबवा.

## प्रगतिशील, विकसित महाराष्ट्राच्या दिशेने वाटचाल | अभिभाषणात राज्यपाल राधाकृष्णन् यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, ३ मार्च**

शेतकरी, महिला, समाजातील दुर्बल घटकांच्या सक्षमीकर णासाठी तसेच आरोग्य, रोजगार, उद्योग, पायाभूत सोयी सुविधांचे बळकटी करणास शासनाचे प्राधान्य आहे. राज्य शासन सर्व समाज घटकांना सोबत घेऊन सर्वसम वेशक, प्रगतीशील, पुरोगामी व विकसित महाराष्ट्र घडविण् ासाठी काम करीत आहे असे प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन् यांनी राज्य विधिमं डळाच्या अर्थसंकल्पीय अधिवे नाच्या अभिभाषणात केले.

राज्यपाल म्हणाले की, राज्य शासन कृषी क्षेत्रातील संधीचा विस्तार करून शेतकरी हितास प्राधान्य देणारे निर्णय घेत आहे. राज्यात सौरऊर्जा पंपांद्वारे शेतीकरिता पाणी मिळण्यासाठी शेतकऱ्यांना मदत करण्याकरिता मागेल त्याला सौर पंप योजना या अंतर्गत ३ लाख १२ हजार सौर पंप बसविले आहेत. पाच वर्षांत शेतकऱ्यांना १० लाख सौर पंप पुरविण्यात येतील. प्रधानमंत्री-कुसुम व मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना या अंतर्गत राज्यातील सर्व कृषी वाहिन्या सौरऊर्जाकृत करणारे देशातील पहिले राज्य बनण्याचे लक्ष्य महाराष्ट्राने ठेवले आहे. राज्याने केवळ नऊ महिन्यांच्या विक्रमी वेळेत १४७ मेगा वॅट एकत्रित सौरऊर्जा क्षमतेच्या एकूण ११९ वाहिन्या कार्यान्वित केल्या आहेत.

प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेंतर्गत लाखांपेक्षा राज्यातील ९५ अधिक शेतकऱ्यांची लाभार्थी म्हणून निवड केली असून, ८७लाखांपेक्षा अधिक शेतकऱ्यांना बँकांद्वारे किसान क्रेडिट कार्ड सुविधा पुरविण्यात आली आहे. या उपक्रमाचा उद्देश आर्थिक सहाय्य व कर्ज सुविधा देऊन शेतकऱ्यांना सक्षम करणे हा आहे. शेतकऱ्यांना वेळेवर आर्थिक सहाय्य मिळावे यासाठी २०२४-२५ या वित्तीय वर्षात ७४ हजार ७८१ कोटी रुपये इतके पीक कर्ज वितरित करण्याचे लक्ष्य ठेवले आहे, याकडे राज्यपालांनी वेधले. लक्ष गाळमुक्त धरण योजना चालू वर्षात गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार या योजनेंतर्गत १२७४ जलाशयांमधून सुमारे चार कोटी घनमीटर गाळ काढला असून, तो ९५ हजार एकर जमिनीवर पसरविण्यात आला आहे. त्याचा ३१ हजार पेक्षा अधिक शेतकऱ्यांना लाभझाला. वॉटरशेड यात्रा ८ फेब्रुवारीपासून सुरू झाली असून, ती ३१ मार्चपर्यंत राज्यातील ३० जिल्ह्यांतील १४० प्रकल्पांमध्ये जाणार आहे. लोक सहभागातून शाश्वत भूजल व्यवस्थ पनाला चालना देण्यासाठी राज्यात अटल भूजल योजना कार्यक्षमपणे राबवित आहे

शाश्वत ऊर्जेला प्रोत्साहन देण्यासाठी व कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी इथेनॉलचा पर्यायी इंधन म्हणून वापर करण्यावर भर देऊन, इथेनॉलचे उत्पादन व पुरवठ्याला चालना देण्यासाठी पुढाकार घेतला आहे. २०२४-२५ या वर्षाकरिता राज्यातील साखर कारखान्यांमार्फत तेल कंपन्यांना १२१ कोटी लिटर इथेनॉल पुरविण्याचे निर्धारित केलेले लक्ष्य पूर्ण करील. शेतकऱ्यांना सहाय्य करण्यासाठी किमान आधारभूत कमत योजना या अंतर्गत हंगामात २०२४-२५ या ५६२ खरेदी केंद्रांमार्फत ११ लाख २१ हजार ३८५ मेट्रिक टन सोयाबीनची खरेदी केली आहे. खरीप विपणन हंगाम २०२४-२५ मध्ये सात लाख मेट्रिक टनांपेक्षा अधिक धान आणि १७१ मेट्रिक टनांपेक्षा अधिक भरड धान्य खरेदी केले आहे. प्रत्येक तालुक्यात किमान एक स्वतंत्र कृषी उत्पन्न बाजार समिती स्थापन करण्यासाठी मुख्यमंत्री एक तालुका एक बाजार समिती योजना राबवत आहे. महिला विकासाला प्राधान्य महिला विकासाला प्राधान्य, शिक्षण संधीत वाढ, आरोग्य सुविधांचे बळकट करण, कौशल्ययुक्त रोजगार निर्मितीवर भर, पायाभूत सुविधांचे बळकट करण, क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन देणं सरकारचा पयत्न असल्याचे राज्यपाल म्हणाले.



महाकुंभाची सांगता झाली असली, तरी अजूनही असंख्य भाविक प्रयागराजच्या त्रिवेणी संगमात स्नानाचा आनंद घेत आहे. त्यातच सोमवारी विनायक चतुर्थीनिमित्त भाविकांची गर्दी वाढली होती.

## जपानमध्ये ८० इमारती जळून खाक

### जीव वाचविण्यासाठी लोकांची धावपळ

**जपान, ३ मार्च**

जपानमध्ये जंगलातील आगी भडकल्या आहेत, ज्यामुळे हजारो लोकांना त्यांचे घर सोडावे लागले आहे. ही आतापर्यंतची सर्वांत भीषण आग असल्याचे बोलले जात आहे. बुधवारी इवाते प्रांतातील ओफुनाटो शहरात आग लागली आणि लवकरच ती मोठ्या जंगलात पसरली. आगीने अंदाजे १८०० हेक्टर (४,४५० एकर) वेढले आहे. दरम्यान, स्थानिक अधिकाऱ्यांनी भीषण आगीतून एका जण ठार झाल्याची पुष्टी केली आहे, याशिवाय आगीमुळे किमान ८० इमारतींचे नुकसान झाले आहे. सोशल मीडियाला या आगीचे व्हिडीओ वायरल होत आहे.

अग्निशमन दल आणि आपत्कालीन पथके आग आटोक्यात आणण्यासाठी सतत प्रयत्न करीत आहेत; परंतु जोरदार वारा आणि कोरड्या हवामानामुळे त्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. आग पसरू नये म्हणून अधिकाऱ्यांनी हेलिकॉप्टर आणि ग्राऊंड पथके तैनात केली आहेत. जपानमधील जंगलातील आगी साधारणपणे फेब्रुवारी ते एप्रिल दरम्यान लागतात, जेव्हा वारे कोरडे आणि जोरदार असतात, ज्यामुळे आग पसरण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण होते. २०२३ मध्ये जपानमध्ये सुमारे १३०० जंगलातील आगींची नोंद झाली. या आगी हवामान बदल आणि पर्यावरणीय बदलांचा परिणाम आहेत, ज्यामुळे आगीची तीव्रता आणि वारंवारता वाढत आहे.



## नरेंद्र मोदींनी घेतला गिर सफारीचा आनंद

### सिंहांच्या संवर्धनासाठी आदिवासींचे कौतुक

**सासन, ३ मार्च**

जागतिक वन्यजीव दिनाच्या पृष्ठभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी गुजरातच्या जुनागढ जिल्ह्यातील गिर वन्यजीव अभयारण्यात सिंह सफारीचा आनंद लुटला.

सामूहिक प्रयत्नांमुळे आशियाई सिंहांच्या संख्येत सातत्याने वाढ होत आहे आणि सिंहांच्या अधिवासाचे संवर्धन करण्यात आजूबाजूच्या भागांत राहणाऱ्या आदिवासी आणि महिलांचे मोठे योगदान आहे, असे कौतुक त्यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये केले. जागतिक वन्यदिनाच्या दिवशी म्हणजे आज सकाळी मी गिर येथे सफारीला गेलो. गिर हे आशियाई सिहांचे घर म्हणून ओळखले जाते. गिरमध्ये आल्याने मी गुजरातचा मुख्यमंत्री असताना आम्ही एकत्रितपणे केलेल्या कामाची आठवण मला झाली, असे मोदींनी पोस्टमध्ये म्हटले आहे. मागील कित्येक वर्षांपासून करण्यात आलेल्या एकत्रित कामामुळे गिरमधील आशियाई सिंहांची संख्या सातत्याने वाढत आहे.

### होणार सिंहांची गणना

केंद्रीय पर्यावरण, वने व वातावरण बदल मंत्री भूपिंदर यादव, इतर मंत्री आणि वनविभागाचे वरिष्ठ अधिकारी नरेंद्र मोदी यांच्यासोबत सफारीत होते. नंतर नरेंद्र मोदी यांनी गिर वन्यजीव अभयारण्याचे मुख्यालय असलेल्या सासन गिर येथे राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या सातव्या बैठकीचे अध्यक्षस्थान भूषविले. या वर्षी मे महिन्यात गिरमधील सिंहांची गणना केली जाईल, अशी घोषणा बैठकीत करण्यात आली.

### सिंहांच्या संवर्धनासाठी २,९०० कोटी रुपये

केंद्र सरकारने आशियाई सिंहांच्या संवर्धनासाठी २,९०० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे, ज्यासाठी गुजरात हे एकमेव निवासस्थान आहे. या व्यतिरिक्त राष्ट्रीय प्रकल्पाचा भाग म्हणून जुनागढ जिल्ह्यातील नवीन पिपल्या येथे २०.२४ हेक्टरपेक्षा जास्त जमिनीवर वन्यजीवांसाठी राष्ट्रीय संवर्धन केंद्र स्थापन केले जात आहे, असे गुजरात सरकारने निवेदनात म्हटले आहे.

## आता अंध व्यक्तीही होऊ शकतात न्यायाधीश!

### सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय

**नवी दिल्ली, ३ मार्च**

सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी ऐतिहासिक निर्णय देत, दृष्टिहीन उमेदवार न्यायिक सेवाअंतर्गत पदांच्या निवडीत भाग घेण्यास पात्र राहणार असल्याचे तसेच केवळ अपंगत्वामुळे कोणत्याही उमेदवाराचा विचार नाकारला जाऊ शकत नाही, असे स्पष्ट केले.



न्या. जे. बी. पार्डीवाला आणि न्या. आर. महादेवन् यांच्या न्यायासनाने हा निर्णय दिला. न्या. महादेवन् म्हणाले की, अधिकारांवर आधारित दृष्टीकोनानुसार दिव्यांगांना न्यायालयीन सेवा मिळविण्याच्या संधी शोधताना कोणत्याही प्रकारच्या भेदभावाचा सामना करावा लागू नये. सर्वसमावेशक चौकट प्रदान करण्यासाठी राज्यांकडून सकारात्मक कृती झाली पाहिजे. केवळ अपंगत्वाच्या आधारावर कोणत्याही उमेदवाराला अर्ज नाकारता येणार नाही. दिव्यांगांना वगळण्यात येणारा कोणताही अप्रत्यक्ष भेदभाव, मग तो कटऑफ असो किंवा प्रक्रियात्मक अडथळ्यांद्वारे असो, वास्तविक समानता राखण्यासाठी त्यात हस्तक्षेप केला पाहिजे.

न्या. महादेवन् म्हणाले की, न्यायालयाने हा सर्वांत महत्त्वाचा खटला मानला आहे. आम्ही संवैधानिक चौकट आणि संस्थात्मक अपंगत्व न्यायशास्त्राबद्दल देखील बोललो आहोत. यावेळी न्या. पार्डीवाला म्हणाले की, न्या. महादेवन् यांनी लिहिलेला हा ऐतिहासिक निकाल आहे आणि मी प्रत्यक्ष न्यायालयात हे बोलण्यापासून स्वतःला रोखू शकत नाही. (वृत्तसंस्था)

## रामललाच्या दर्शनाची वेळ पूर्ववत

### नवीन नियम लागू

**अयोध्या, ३ मार्च**

रामललाच्या दर्शनाची वेळ बदलण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राम मंदीर तीर्थक्षेत्र ट्रस्टने घेतला आहे. ट्रस्टचे विश्वस्त डॉ. अनिल मिश्र यांनी दिलेल्या माहितीनुसार, महाकुंभात स्नान करून भाविक अयोध्येत दाखल होत असल्यामुळे मंदिरात दर्शनाची वेळ वाढविण्यात आली होती. मात्र, महाकुंभाच्या समारोपानंतर दर्शन कालावधी पुन्हा पूर्ववत करण्यात आला आहे.

बदललेला दर्शन कालावधी आज सोमवारपासून लागू झाला आहे. महाकुंभातून येणाऱ्या भाविकांचा प्रचंड ओघ बघता, दर्शनाचा कालावधी वाढवून १९ तास करण्यात आला होता. आता तो कमी करण्यात आला आहे. आतापर्यंत सकाळी ६ ते रात्री ११ वाजेपर्यंत रामरायाचा दरबार भक्तांसाठी खुला होता. आता त्यात बदल करण्यात आले आहेत. (वृत्तसंस्था)



### दर्शनाच्या नव्या वेळा

**मंगलआरती** : पहाटे ४ वाजता, **भोग आरती** : दुपारी १२ वाजता, **दर्शन** : १२ ते १२.३०, **श्रृंगार आरती** : सायंकाळी ४ वाजता, **दुपारी १ ते सायंकाळी ६.५०** : दर्शन, **सायंकाळी ७ वाजता** : भोग आणि संध्याआरती, **रात्री ९.४५ पर्यंत** : दर्शन, **रात्री ९.४५ ते १०** : भोग आणि शेजारती, **रात्री १० वाजता** : मंदीर बंद

## अग्रलेख...

# भूमिकाभयाचे ओझे!

कोणत्याही निवडणुकीत एखाद्या राजकीय पक्षास मिळणारा मतांचा कौल हे मतदारांच्या अपेक्षांचे प्रतिबिंब असते. ज्या पक्षाकडून मतदारांच्या काही अपेक्षा असतात आणि जो पक्ष या अपेक्षा पूर्ण करेल अशी मतदारांची भावना असते, त्या पक्षाला जनाधार मिळतो, हे स्पष्ट आहे. त्यामुळे मतदारांचा कौल किंवा जनाधार लक्षात घेऊन राजकीय पक्षांनी वारंवार चिंतन व आत्मपरीक्षण करणे गरजेचे असते. ज्या पक्षांनी महत्प्रयासाने ऐक्याची मोट बांधून आघाडी स्थापन केली व सत्तेसाठी सक्षम पर्याय ठरण्याचा दावा मतदारांसमोर केला, त्या पक्षांनाही मतदारांनी स्पष्टपणे झिडकारल्यानंतर तरी त्यांनी आत्मपरीक्षण, चिंतन आणि मतदारांनी दिलेल्या कौलाची मीमांसा करावी आणि कोणत्या अपेक्षापूर्तीच्या भावना पूर्ण करण्यात आपण कमी पडत आहोत, याचा आढावा घेऊन त्या त्रुटी दूर करण्यासाठी प्रयत्न करावेत, हे साधारणतः पराभूत पक्षांकडून मतदारांची अपेक्षा असते. महाराष्ट्रातील विरोधी पक्षांच्या बहुधा हेच लक्षात येत नसावे. मतदारांना गृहीत धरणे आणि मतदार आपल्या पाठीशी उभे आहेत या भ्रमात वावरणे हे राज्यातील महाविकास आघाडीच्या अनेक नेत्यांचे गुणविशेष ठरले आहेत. आपणच राज्यातील जनतेचे एकमेव प्रतिनिधी आहोत, ही अनेक नेत्यांची समजूत विधानसभा निवडणुकीत मतदारांनीच धुळीस मिळविली. त्यामुळे मतदारांच्या अपेक्षांची नाडी या नेत्यांना ओळखता आली नाही, हे तेव्हाच स्पष्ट होऊनही पराभवानंतरच्या आत्मचिंतनातून त्याची कारणमीमांसा करण्याचे धाडस या नेत्यांनी दाखविले नसल्याने, महाराष्ट्रातील विरोधकांच्या महाविकास आघाडीचे तारू पुरते भरकटल्यागत झाले आहे. तसे नसते, तर महायुतीचे स्पष्ट बहुमताचे भक्कम सरकार सत्तेवर आल्यानंतर होत असलेल्या पहिल्याच अर्थसंकल्पीय अधिवेशनाआधी विरोधकांनी काही ठोस सकारात्मक भूमिका घेतली असती. विधायक मुद्द्यांवर विरोधकांना सहकार्य करण्याच्या समंजसपणा दाखविला असता आणि राज्याच्या हिताच्या मुद्द्यांवर सहमतीचे राजकारण करण्याचे धोरण कृतीतून स्पष्ट केले असते.

महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पूर्वसंध्येस होणाऱ्या मुख्यमंत्र्यांच्या चहापान बैठकीवर बहिष्कार घालणे ही राज्यातील विरोधी पक्षांनी पाडलेली प्रथा यंदाही महाविकास आघाडीच्या नेत्यांनी पुरती पाळली. या बहिष्काराची कारणे देताना विरोधी पक्षांच्या नेत्यांनी मांडलेले मुद्दे पाहता, मतदारांच्या अपेक्षा आणि राजकीय भूमिका यामध्ये असलेली दरी बुजविण्याच्या भावनेचे फारसे दर्शन होत नाही. राजकारण आणि सामाजिक स्थिती यामध्ये असलेली सूक्ष्म भेदाची रेघ पुसून टाकण्याची आजची खरी गरज सध्याच्या राजकारणात पाहावयास मिळत नाही, हे बहुधा त्याचे कारण असावे. ही बाब खरी आहे, की राज्यातील सामाजिक वातावरण सध्या फारसे स्वच्छ नाही. जातीय तेढ, वेगवेगळ्या जातीय मुद्द्यांवरून सुरू असलेले कुरघोडीचे राजकारण, सामाजिक अस्वस्थता, गुन्हेगारी व त्यामुळे समाजात पसरलेली असुरक्षिततेची भावना हे मुद्दे राजकारणविरहित सामाजिक भावनेतून हाताळले गेले पाहिजेत. महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात जेव्हा अशा समस्या उद्भवल्या होत्या, तेव्हा त्यांचे निराकरण करण्यात त्या सरकारला यश तर आले नाहीच; पण ते अपयश झाकण्यासाठी महाविकास आघाडीचे काही नेते तेव्हाच्या विरोधकांवर महाराष्ट्रद्रोहाचा आरोप करत असत, हे महाराष्ट्राने पाहिले आहे. जनतेच्या सुरक्षिततेच्या किंवा सामाजिक समस्यांचा कोणताही मुद्दा जेव्हा जेव्हा तत्कालीन सत्तेच्या विरोधी पक्षनेते या नात्याने देवेंद्र फडणवीस यांनी जबाबदारीने उचलला होता, तेव्हा तेव्हा त्यांच्यावर राजकारण करीत असल्याचा निरर्थक आरोप केला जात होता, हेही महाराष्ट्राने पाहिले आहे. मुंबईच्या उपनगरातील साकीनाका येथे एका महिलेवर निर्घृण, पाशवी बलात्कार झाला. त्या विकृत कृत्याने उभा महाराष्ट्र हादरला होता. त्या वेळीही अशा गुन्ह्याचे राजकारण करू नका, असा सल्ला देत तत्कालीन सत्तेच्या प्रवक्त्यांनी घेतलेली कातडीबचाऊ भूमिकाही महाराष्ट्राने पाहिली होती. ज्या ज्या वेळी महाराष्ट्रावर संकटे ओढवली, नैसर्गिक आपत्ती कोसळल्या, तेव्हा तेव्हा सरकारला जाग आणण्याच्या तत्कालीन विरोधकांच्या भूमिकेस राजकारणाचे रंग चढविले गेले. त्याचा परिणाम व्हायचा तोच झाला. ते प्रश्न तर सुटले नाहीतच; पण केवळ विरोधकांचा आवाज बंद करण्यासाठी व त्यांच्या भूमिकेबाबत जनतेमध्ये संभ्रम पसरविण्यासाठी तत्कालीन सत्ताधीशांच्या प्रवक्त्यांनी केलेली वक्तव्ये व काही कृतींमुळे राज्याच्या राजकीय संस्कृतीसमोर प्रश्नचिन्हे उभी राहिली होती. काही संवेदनशील प्रश्न सामंजस्याने व सत्ताधाऱ्यांसोबत सहकार्याने सोडवायचे असतात. त्याचे राजकारण करायचे नसते. महाविकास आघाडी सरकारच्या काळात जेव्हा विरोधकांनी सामंजस्याने समस्या सोडविण्यासाठी सहकार्याची भूमिका घेतली, तेव्हा त्यांच्यावर राजकारण करत असल्याचा ठपका ठेवून आपली निष्क्रियता झाकण्याचा प्रयत्न केला गेल्याने जनतेचा अपेक्षाभंग झाला, हे विरोधकांच्या सद्यःस्थितीचे कारण आहे. मात्र, त्याचा सुगावादेखील लागला नसावा, अशीच जुनी भूमिका आजच्या राजकीय वर्तनातून उमटताना दिसते.

चहापान बैठकीवरील बहिष्काराचा निर्णय आणि सोमवारी अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होत असताना राज्यपालांच्या अभिभाषणाधी विरोधकांनी घेतलेली कथित आक्रमक भूमिका पाहता, जनतेच्या नेमक्या अपेक्षांचे प्रतिबिंब त्यामध्ये शोधावेच लागते. महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांत राज्याचे सामाजिक स्वास्थ्य बिघडेल अशा अप्रिय घटना घडल्या हे खरे आहे. असे काही झाले की, सरकारवर टीकेची झोड उठविणे म्हणजे विरोधकांची भूमिका बजावणे अशी एक समजूत अलिकडे रूढ होत चालली दिसते. गेल्या तीन-चार वर्षांत महायुतीचे सरकार सत्तेवर असताना घडलेल्या व सामाजिक स्वास्थ्य बिघडविणाऱ्या घटनांबाबत विरोधकांनी घेतलेली ही भूमिका म्हणजे, या घटनांच्या मुळाशी जाण्याच्या प्रयत्नांशी प्रतारणा म्हणावी लागेल. पुण्याच्या बसस्थानकातील बलात्काराच्या घटनेनंतर महाराष्ट्रात वादळ माजले. विरोधकांकडे सामाजिक प्रश्न म्हणून पाहणे योग्य ठरेल. समाजाच्या काही घटकांमधील विकृतींची ही परिणती असते. राज्याच्या एका शहरातील एका बसस्थानकाच्या एका एकाकी कोपऱ्यात घडलेल्या या गुन्ह्यासाठी सरकारवर शरसंधान करून सरकारला जबाबदार धरणाऱ्या याच नेत्यांनी साकीनाका बलात्काराच्या घटनेवरील विरोधकांच्या आक्रमक भूमिकेस केवळ राजकारण ठरविले होते, याची या निमित्ताने आठवण होणे अपरिहार्य आहे. महाराष्ट्र आता विकासाच्या एका नव्या टप्प्यावर वाटचाल करू लागला आहे. आरोग्य, रोजगाराच्या नव्या संधी, पायाभूत सोयीसुविधांचे बळकटीकरण व सर्व समाजघटकांना सोबत घेऊन सर्वसमावेशक प्रगतीच्या दिशेने वाटचाल करण्याच्या सरकारच्या भूमिकेचे सकारात्मक परिणाम दिसू लागले आहेत. शेतकरी असल्याचा अभिमान वाटावा, अशी सुविधांची खैरात शेतकऱ्यांवर करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरू पाहात आहे. पीक विमा, पीक कर्ज, सुनिश्चित वीजपुरवठा, सिंचनाच्या विविध योजना, गाळमुक्त धरणांबरोबर गाळयुक्त शिवार योजनेतून सुपीक शेतजमिनीचे प्रयोग, पाणलोट योजनेतून शाश्वत भूजल व्यवस्थापनाच्या योजना, महिलांच्या सक्षमीकरणाच्या योजना, रोजगार वृद्धीसाठी विशेष साह्याच्या योजना, शैक्षणिक क्षेत्रातील नवे प्रयोग, परकीय गुंतवणूकदारांना आकृष्ट करून महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासासाठी व रोजगारवृद्धीसाठी केले जाणारे प्रयोग ही विकासाची नवी वाटचाल आहे. महाराष्ट्राच्या मतदारांना राज्याच्या स्वास्थ्यासाठी याच प्रयोगांची नेमकी अपेक्षा आहे. याच भावनेतून मतदारांनी महायुतीला सत्ता राबविण्याचा कौल दिला असल्याने, विरोधकांनी मतदारांची ही भावना लक्षात घ्यावयास हवी. विकासाच्या या वाटचालीत सत्ताधाऱ्यांच्या हातात हात घालणे हे महाराष्ट्राची आजची गरज असताना, बहिष्कारासारख्या निरर्थक प्रथांचे पालन करून विरोधकांसाठी विरोध करण्याची परंपरा आता संपवायला हवी. ती काळाची गरज आहे. महाराष्ट्राच्या राजकारणाने देशाच्या राजकारणास अनेकदा दिशा दिली आहे. त्या दिशेने वाटचाल करून देशाने प्रगतीचा अनुभवही घेतला आहे. त्या दिशेकडे महाराष्ट्राने पाठ फिरविली, तर होणारी हानी केवळ राजकारणाची नसेल. ती राज्यकारणाची हानी ठरेल. म्हणून राजकारणविरहित सामंजस्याचे राजकारण करावे, ही जनतेची अपेक्षा विरोधकांनी लक्षात घ्यावयास हवी.

## आंतरराष्ट्रीय

वसंत गणेश काणे

# ट्रम्प यांचे स्वप्न बृहन् अमेरिकेचे

लेखांक २ रा

ग्रीनलँड अमेरिकेला विकत देण्यास डेन्मार्कने नकार दिल्यामुळे अमेरिकेला अतिशय राग आला आहे. कारण स्पष्ट आहे. कुठे अमेरिकेसारखी जगातील एकमेव बलाढ्य सत्ता आणि कुठे डेन्मार्कसारखे यःकश्चित आणि चिमुकले राष्ट्र? त्याचे खरे तर अहोभाग्य की अमेरिकेसारखे गिऱ्हाईक स्वतःहून चालत आले आणि त्याने ग्रीनलँडला मागणी घातली; तीही मागाल ती किंमत द्यायचे मान्य करून! तरीही नकार देण्याचा उद्धटपणा डेन्मार्कने करावा? ते अमेरिकनांना विशेषतः डोनाल्ड ट्रम्प यांना कसे बरे सहन होईल? पण असे काय आहे या ग्रीनलँडमध्ये?

हे महाकाय बेट आर्क्टिक आणि अटलांटिक महासागर यांच्यामध्ये आणि कॅनडालगतच्या बेट समूहाच्या पूर्वेला आहे. आज ग्रीनलँड हा डेन्मार्कचा स्वायत्त प्रदेश आहे. तसा हा भूभाग कॅनडाला लागून आहे. पण राजकीय आणि सांस्कृतिक दृष्टीने पाहिले तर तो युरोपशी सांधलेला आहे. ग्रीनलँडच्या नैर्ऋत्य भागातच लोकवस्ती असून उरलेले बेट जवळजवळ मानवविरहितच आहे. जेमतेम ५ नगरपालिका, एक नॅशनल पार्क आणि एकच विमानतळ! यापैकी विमानतळाचे व्यवस्थापन युनायटेड स्टेट्स एअर फोर्सकडे (अमेरिकेकडे) आहे. ग्रीनलँड जगातील सर्वात मोठे बेट मानले जाते, पण त्याची लोकसंख्या ६० हजारांपेक्षाही कमी आहे.

तीन चतुर्थांश ग्रीनलँड कायमस्वरूपी बर्फाच्छादित असते. या बर्फाचे वजन एवढे आहे की, मधला भूभाग समुद्रसपाटीपासून ३०० मीटर खाली दबला गेला आहे आणि समुद्राच्या किनाऱ्यालगतचा भूभाग वर उंच उचलला गेला आहे. ही एक तरंगती कढईच झाली की! अशा या ग्रीनलँडची भुरळ कुणाला पडणार नाही? सध्या डेन्मार्कने लष्करी सामर्थ्य वाढविण्यास सुरुवात केली असून फ्रान्सने डेन्मार्कची बाजू घेतली आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी कॅनडाची निवड का केली? पहिले कारण असे की, कॅनडा आणि अमेरिकेच्या सीमा लागून आहेत. बेकायदेशीरपणे स्थलांतर करणारे घुसखोर कॅनडाच्या सीमेवरून अमेरिकेत प्रवेश करतात. त्यामुळे येथे गुन्हेगारी वाढविल्याचा आरोप ट्रम्प यांनी केला आहे. यामुळे बेरोजगारी वाढली आहे आणि त्याचवेळी असुरक्षितताही वाढते आहे.

दुसरे प्रमुख कारण म्हणजे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांचे जागतिक स्तरावर खलिस्तानी चळवळ्यांसमोर सपशेल लोटांगण घालणे हे आहे. म्हणून ट्रम्प यांनी जाणूनबुजून कॅनडाला अमेरिकेचे ५१ वे राज्य म्हणून आणि ट्रुडो यांचा उल्लेख 'कॅनडाचे पंतप्रधान ट्रुडो' असा न करता अमेरिकेच्या '५१ व्या राज्याचे गव्हर्नर ट्रुडो 'असा करायला सुरुवात केली. ही गंमत म्हणायची की हे विधान गांभीर्याने घ्यायचे? पण संतापलेल्या कॅनडामध्ये उत्तरादाखल अलास्काला वेस्ट कॅनडा, ग्रीनलंडला ईस्ट कॅनडा, खुद्द अमेरिकेला साऊथ कॅनडा, मेक्सिकोच्या आखाताला कॅनडाचे आखात, पनामा कालव्याला कॅनडा कॅनाल दाखविणारा नकाशा प्रसिद्ध झाला आहे. पनामा कालव्यावरही ट्रम्प यांना अमेरिकन




वर्चस्व हवे आहे. कारण पनामा कालवा जसा उत्तर आणि दक्षिण अमेरिका खंडांना जोडतो, तसाच तो अटलांटिक आणि पॅसिफिक महासागरांमधील एक महत्त्वाचा व्यापारी मार्गदेखील आहे. १९७७ पर्यंत या कालव्याचे नियंत्रण अमेरिकेकडे होते. नंतर अमेरिकेने या कालव्याचा ताबा पनामाला दिला. गरज पडली तरच या कालव्याच्या संरक्षणासाठी अमेरिका आपले सैन्य पाठवील, असे ठरले होते. मात्र आता ट्रम्प यांनी या कराराला मूर्खपणा म्हणून संबोधले आहे. ते म्हणतात की, पनामा कालव्यात चिनी जहाजांची संख्या वाढते आहे. त्याचवेळी पनामा अमेरिकन जहाजांवर खूप जास्त कर लादतो आहे. अशा स्थितीत अमेरिकेच्या सुरक्षेसाठी आणि आर्थिक हितासाठी त्याचे नियंत्रण परत अमेरिकेकडे असणे आवश्यक आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या यादीतील नवीन म्हणावे असे नाव मेक्सिकोचे आहे. ट्रम्प यांनी गल्फ ऑफ मेक्सिकोचे नाव बदलून 'गल्फ ऑफ अमेरिका' करा, असे सुचवले आहे. मेक्सिकोला अमेरिकेकडून खूप फायदा होतो आहे, असे ट्रम्प यांचे म्हणणे आहे. मेक्सिकोसोबतच्या व्यापारात अमेरिकेचे नुकसान होते. मेक्सिकोमध्ये गुन्हेगारी शिगेला पोहोचली आहे, असे त्यांनी अनेकदा जाहीरपणे सांगितले आहे. त्यामुळे मेक्सिकोची जबाबदारी अमेरिकेने स्वतःच्या हातात घेण्याची वेळ आली आहे, असे डोनाल्ड ट्रम्प ठासून सांगताहेत. त्यांना आजची युद्धात नष्टप्राय झालेली गाझापट्टीही पर्यटनस्थळ म्हणून विकसित करण्यासाठी हवी आहे. कॅनडा, ग्रीनलँड आणि मेक्सिको अमेरिकेत सामील झाल्यास अमेरिकेचे एकूण क्षेत्रफळ २.३४ कोटी चौरस किलोमीटर होईल आणि अमेरिका क्षेत्रफळाच्या दृष्टीने जगातील सर्वात मोठा देश बनेल. सध्या सर्वात मोठा देश रशिया आहे, त्याचे एकूण क्षेत्रफळ १.७१ मिलियन चौरस किलोमीटर आहे.

अमेरिका आणि भारत या दोन्ही देशांमधील व्यापारी संबंध अधिक वृद्धिंगत करावेत या मताचे ट्रम्प आणि मोदी हे दोन्ही नेते आहेत. दोन्ही बाजूने (टेरिफ) आयात शुल्कात कपात करावी आणि आर्थिक भागीदारी करार व्हावा यासाठी द्विपक्षीय चर्चा करण्याचे आवाहन ट्रम्प यांना केले होते. टेरिफ हा सीमा कर परदेशातून आयात केलेल्या वस्तूंवर लावतात. टेरिफमुळे आयात केलेल्या विदेशी वस्तू महाग होतात व ग्राहक स्वदेशी वस्तू घेण्यास प्रवृत्त होतो. अशाप्रकारे स्वदेशी उत्पादनाला चालना आणि संरक्षण मिळते. टेरिफमुळे सरकारचे उत्पन्नही वाढते, ते वेगळेच. अमेरिकन उत्पादनांवर सर्वाधिक (टेरिफ) कर लावणाऱ्या देशांमध्ये भारताचा समावेश आहे. वाटाघाटीत याबाबत भारताला नमते घ्यावे लागेल, हे स्पष्टच होते. कोणताही देश अमेरिकन वस्तूंवर जेवढा कर लावेल, अमेरिका त्या देशातील वस्तूंवरही तेवढाच कर लावेल. ही 'टिट फॉर टॅट' (जशास तसे) योजना ट्रम्प यांनी स्वीकारली आहे. आजवर विकसनशील आणि अविकसित देशांना आर्थिक मदत व्हावी म्हणून अमेरिकेने ही योजना अंमलात आणली नव्हती. अमेरिकेचे हे वर्तन जागतिक नेत्याला साजेसे होते. ट्रम्प यांचे दुसऱ्या कार्यकाळातले धोरण याउलट दिसते आहे. दुसऱ्या कार्यकाळाच्या पहिल्या काही दिवसांतच अशी काही धोरणे अधिक धडाडीने राबविली जात आहेत. यामुळे अमेरिकेचे जागतिक राजकारणातील स्थान धोक्यात येण्याची शक्यता आहे. केवळ व्यापारी आणि निव्वळ व्यवहारी धोरण स्वीकारण्याचे अमेरिकेने ठरविले आहे, असे दिसते. युक्रेनबाबत घेतलेल्या यू टर्नमुळे तर अमेरिकेची विश्वसनीयताच शिल्लक राहणे कठीण आहे. अमेरिकेला कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) उद्योगाला चालना द्यायची आहे त्यासाठी ट्रम्प अणुऊर्जेचे उत्पादन दुपटीने वाढवू पाहताहेत. भारतही अमेरिकेच्या साह्याने स्वतःच्या अणुऊर्जा क्षेत्राचा जलद विस्तार करू पाहतो आहे. भारत सरकारने अलिकडेच अमेरिकेसाठीच्या अण्वस्त्र कायद्यात सुधारणा करण्याचे जाहीररीत्या मान्य केले आहे. जसे की, नुकसानाची जबाबदारी परकीय कंपनीवरच टाकणारी कलमे रद्द करण्याला भारताने मान्यता दिली आहे. केवळ अमेरिकन संरक्षण सामग्रीच नव्हे तर भारताला तंत्रज्ञान हस्तांतरण आणि सह-उत्पादनासाठी अधिक अनुकूल अटी हव्या आहेत. या अटी अमेरिकेला मान्य नाहीत. अमेरिकेला शह देण्यासाठी तंत्रज्ञान हस्तांतरणासह लष्करी सामग्री पुरवू, असा प्रस्ताव रशियाने भारतासमोर ठेवला आहे. अहो, 'अमेरिका फर्स्ट'प्रमाणेच 'इंडिया फर्स्ट' ही भारताची भूमिका आहे. यात चूक काय आहे?


९४२२८०४४३०

## वेध

चंद्रकांत लोहाणा

# धगधगते मणिपूर!

मणिपूर येथील संघर्षाला जातीयतेचे नाव देऊन काँग्रेसने मोदी सरकार आणि भाजपाला कोंडीत पकडण्याचा अनेकदा प्रयत्न केला. सूडभावनेने काँग्रेस पक्ष एवढा वैफल्यग्रस्त आणि बेताल झाला आहे की, त्यास देशाची अखंडता, एकता व सुरक्षिततेचेही भान राहिले नाही. काँग्रेस पक्षाची ही मानसिकता अनेकदा आपल्या देशासाठी अडचणीची ठरली आहे. तरीही हा पक्ष जिवंत आहे. या पक्षाचा देशहितविरोधी उपद्?व्याप अजूनही सुरू आहे. मणिपूरमधील संघर्ष हा जातीयवादी आणि आरक्षणाशी संबंधित असल्याचे चित्र रंगविले गेले. हा संघर्ष तेथील मैतेई आणि कुकी या जनजातीमधील आरक्षण आणि जमिनीच्या ताब्याचा असल्याचे सांगून महिलांच्या सुरक्षेचा मुद्दा पुढे करीत पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शाह यांना लक्ष्य करण्यात आले. हाच धागा पकडून विरोधकांनी संपूर्ण देशाला भ्रमित करण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये काँग्रेस पक्ष आघाडीवर आहे. परंतु, या संघर्षामागील खरे कारण फारच विदारक आहे. सरकारच्या हाती येत असलेल्या पुराव्यावरून मणिपूरला अशांत करण्यामागे विदेशी शक्तीचा हात असल्याचे दिसून येत आहे. ड्रग माफिया, खलिस्तानी गट, जिहादी गट आणि अन्य देशविरोधी शक्तीचा या मागे हात असल्याचे पुरावे हाती लागत आहेत. विशिष्ट 'टूलकिट'द्वारे मणिपूरमधील संघर्ष अधिकाधिक तीव्र करण्याचे प्रयत्न केले गेले. उपरोक्त शक्तींनी या संघर्षाला खतपाणी घालून काश्मीरप्रमाणेच मणिपूर पेटविण्याचा प्रयत्न केला. ज्याप्रकारे पंडित जवाहरलाल नेहरू यांनी काश्मीरचा प्रश्न संयुक्त राष्ट्र संघाकडे नेऊन अधिक चिघळवला, त्याचप्रमाणे काँग्रेस आणि परकीय शक्ती मणिपूरला अस्थिर करून भारतामध्ये पुन्हा एकदा अराजकता माजविण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून येत आहे. भविष्यामध्ये भारतापुढील हा एक गंभीर धोका आहे, हे नागरिकांनी ओळखले पाहिजे. हे फक्त सामाजिक अथवा राजकीय संघर्ष नाही तर देशासाठी फार मोठे एक षडयंत्र आहे, हे आम्ही समजून घेतले पाहिजे. ही बाब आपल्या देशाच्या सुरक्षिततेसाठी अतिशय धोकादायक ठरू शकते, हेही ध्यानात घ्यायला हवे. काँग्रेस पक्षाला देशाच्या सुरक्षिततेशी काहीएक देणेघेणे नाही. या पक्षाला फक्त आणि फक्त सूडाचे राजकारण करायचे आहे. सत्तेसाठी वाट्टेल ते करण्याची या पक्षाची परंपरा राहिली आहे. आपल्या परंपरेशी काँग्रेस पक्ष इमानेइतबारे वागत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपाला निव्वळ शिव्या देऊन आपल्या देशाची सुरक्षितता आणि अखंडता राखली जाऊ शकते का? या प्रश्नाचे उत्तर भविष्यामध्ये काँग्रेसला जनतेस द्यावे लागेल.



मणिपूरचा भौगोलिक परिसर अमली पदार्थाच्या तस्करीसाठी सोयीचा असल्याने आंतरराष्ट्रीय ड्रग माफिया व ख्रिस्ती मिशनरी संस्थांनी तेथे आपले घट्ट जाळे निर्माण करून पाय रोवले आहेत. मानवतेच्या गोड मुखवट्याच्या आड धर्मांतराचे भले मोठे जाळे निर्माण केल्याचा आरोप होत आहे. त्यासाठी दुर्गम भागातील भोळ्या आणि असहाय समुदायांना लक्ष्य केले जाते. शिक्षण, मदत आणि पैशाचे आमिष दाखवून हजारो हिंदूचे धर्मांतरण केले जात आहे, ही वास्तविकता आहे. मागील १०० वर्षांहून अधिक काळ मणिपूर ख्रिस्ती प्रचारकांच्या कारवायांचे केंद्र राहिले आहे. मणिपूरमधील संघर्ष हा केवळ जातीयवादाचा परिणाम नसून तो धर्मांतरण, आंतरराष्ट्रीय तस्करी आणि परकीय शक्तीचा हात असल्याचे दिसून येत आहे. या बाबी प्रामुख्याने तपासल्या गेल्या तर एक फार मोठे षडयंत्र उघडकीस येण्याची शक्यता नाकारली जाऊ शकत नाही. जवळपास मागील दोन वर्षांपासून मणिपूरमध्ये संघर्षाची आग धगधगत आहे. मुख्यमंत्र्यांच्या राजीनाम्यानंतर तेथे राष्ट्रपती राजवट लावण्यात आली आहे. मणिपूरमध्ये शांततेसाठी केंद्र सरकार सर्वोपरी प्रयत्न करीत आहे. या प्रयत्नांना अधिक तीव्र गती देण्याची आवश्यकता आहे. मणिपूरमध्ये विदेशी शक्तीची पाळेमुळे खणून सर्वप्रथम ती नष्ट करण्याची आवश्यकता आहे. या विदेशी शक्तीच्या मुसक्या आवळून त्यांची रसद कापली गेली तर मणिपूर शांत होण्यास वेळ लागणार नाही. याच विश्वासाने केंद्र सरकार पुढील वाटचाल करीत आहे. त्यावर विश्वास ठेवून जनतेनेही सरकारला पाठबळ द्यायला हवे. अन्यथा मणिपूरचे काश्मीर व्हायला वेळ लागणार नाही.

९८८१७१७८५६

## दखल

प्रबोध नरसापूरकर

# युरोप आणि भारत : वाढत्या संबंधाचे महत्त्व

युरोपियन आयोगाच्या अध्यक्षांनी नुकतेच संपूर्ण आयुक्त मंडळासह भारत दौरा केला. या दौऱ्याने भारत आणि युरोपियन युनियन यांच्यातील वाढत्या संबंधांचे महत्त्व अधोरेखित केले आहे. अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणात बदल होत असताना, ट्रान्सअटलांटिक युती, व्यापार धोरणे आणि सुरक्षा बांधिलकींमध्ये निर्माण होणाऱ्या अडचणींमुळे, भारत आणि युरोप दोघांनीही आपली भागीदारी अधिक मजबूत करण्याची गरज ओळखली आहे. भारतासाठी, युरोपियन युनियनसोबत व्यापार, सुरक्षा आणि तंत्रज्ञान संबंध दृढ करणे म्हणजे आर्थिक स्थिरता, धोरणात्मक विविधीकरण आणि चीन व अमेरिकेला भू-राजकीय प्रतिभार प्रदान करणे होय. हा दौरा सहकार्य वाढवण्याची आणि दीर्घकाळचे व्यापार आणि गुंतवणूक अडथळे दूर करण्याची संधी देणारा आहे . युरोपियन युनियनची थोडक्यात माहिती घ्यायची झाल्यास ही २७ सदस्य राष्ट्रांची एक आंतरराष्ट्रीय राजकीय आणि आर्थिक संघटना आहे, जी प्रामुख्याने युरोपमध्ये स्थित आहेत. या संघाचे एकूण क्षेत्रफळ ४२,३३,२५५ चौरस किलोमीटर (१,६३४,४६९ चौरस मैल) आहे आणि अंदाजे एकूण लोकसंख्या ४४.९ कोटींपेक्षा जास्त आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या व्हाईट हाऊसमध्ये पाच आठवड्यांपूर्वी झालेल्या पुनरागमनामुळे जागतिक राजकारणात निर्माण झालेल्या महत्त्वपूर्ण बदलांच्या पृष्ठभूमीवर व्हॉन डर लेयेन दिल्लीत दाखल झाल्या. जरी त्यांचा हा दौरा ट्रम्प यांच्या निवडीपूर्वी नियोजित केलेला असला, तरी भारतासोबतचे संबंध अधिक दृढ करण्याच्या त्यांच्या मोहिमेला आता अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. व्हॉन डर लेयेन यांनी युरोपियन आयोगाच्या अध्यक्ष म्हणून त्यांच्या दुसऱ्या कार्यकाळात भारताला पहिले आंतरराष्ट्रीय गंतव्यस्थान निवडणे, हा एक हेतुपुरस्सर घेतलेला निर्णय होता. ट्रम्प यांच्यामुळे निर्माण झालेल्या अस्थिर जागतिक परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी धडपडणाऱ्या भारतासाठी, युरोप एक महत्त्वाचा भागीदार म्हणून पुढे आला आहे. ट्रम्प यांच्या व्हाईट हाऊसमध्ये परतण्यामुळे बदललेल्या परिस्थितीमुळे, भारत आपली भू-राजकीय भूमिका अधिक मजबूत करण्याचा विचार करू शकतो. या दौऱ्याने इंडो-पॅसिफिक प्रदेशात नियम-आधारित आंतरराष्ट्रीय व्यवस्था सुरक्षित करण्याच्या सामायिक हितावर भर दिला आहे.

'धोरणात्मक स्वायत्तते'वर परंपरागत भर देऊनही, ब्रुसेल्स (ईयूचे मुख्यालय असलेले शहर) आणि दिल्ली या दोन्ही शहरांनी आपल्या जागतिक धोरणांचा आधार म्हणून अमेरिकेसोबतच्या भागीदारीवर नेहमीच अवलंबून राहिल्या आहेत. अमेरिका सोडून देणे दोघांनाही परवडणारे नसले, तरी ट्रम्प यांच्या अनिश्चित धोरणांना प्रतिसाद म्हणून भारत आणि युरोप दोघांनीही आपले संबंध अधिक मजबूत करणे आवश्यक आहे. ट्रम्प केवळ युक्रेन आणि रशियाबाबतचे अमेरिकेचे धोरण बदलत नाही आहेत तर ते दीर्घकाळच्या युतींमधूनही माघार घेत आहेत आणि जागतिक आर्थिक व्यवस्था उलथवून टाकत आहेत. त्यांच्या धोरणात रशिया आणि चीनसारख्या प्रतिस्पर्धी शक्तींशी सौदे करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. आतापर्यंत, अमेरिकेच्या धोरणातील अस्थिरतेचा सामना करण्यासाठी भारताच्या धोरणात रशियासोबतचे संबंध राखणे आणि ब्रिक्ससारख्या मॉस्को-नेतृत्वाखालील युतींमध्ये सहभागी होणे यांचा समावेश होता. तथापि, रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन ट्रम्प यांच्याशी स्वतंत्र करार करण्यास उत्सुक आहेत. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, अमेरिका, रशिया आणि चीन यांच्यातील महासत्तांचे राजकारण पुन्हा एकदा बदलत आहे. गेल्या शतकात, या तीन महासत्ता कधी मित्र, कधी शत्रू, तर कधी हितशत्रू अशा वेगवेगळ्या भूमिकांमध्ये राहिल्या आहेत. भारत कोणत्याही संबंधांना गृहीत धरू शकत नाही. या वास्तवामुळे भारताच्या धोरणात्मक भागीदारीचा विस्तार करणे आवश्यक आहे आणि युरोप हा भारताच्या धोरणात्मक नियोजनातील एक महत्त्वाचा दुवा आहे, जो अजून जोडायचा आहे. व्हॉन डर लेयेन यांच्या भेटीमुळे दिल्लीला युरोपियन युनियनसोबतचा संवाद पुन्हा सुरू करण्याची एक उत्तम संधी मिळाली आहे. युरोपियन युनियन हे अमेरिका आणि चीननंतर जगातील तिसऱ्या क्रमांकाचे मोठे अर्थकारण आहे आणि विज्ञान, तंत्रज्ञान, प्रगत उद्योग, भांडवल आणि मोठ्या ग्राहक बाजाराचा एक महत्त्वाचा स्रोत आहे.

खालील आकड्यांवरून भारत-युरोपियन युनियन संबंधांचे महत्त्व अधोरेखित होते. भारत आणि युरोपियन युनियन यांच्यातील संबंध विविध क्षेत्रांमध्ये महत्त्वपूर्ण आहेत, विशेषतः आर्थिक आणि व्यापारिक क्षेत्रात.

**आर्थिक आणि व्यापारिक संबंध** : २०२३ मध्ये भारताच्या एकूण व्यापारात युरोपियन युनियनचा वाटा १२.२ टक्के होता, जो अमेरिका आणि चीन दोघांपेक्षाही जास्त आहे. यामुळे युरोपियन युनियन भारताचा सर्वांत मोठा व्यापारी भागीदार बनला आहे. अमेरिकेनंतर (१७.६ टक्के) भारतीय निर्यातीसाठी युरोपियन युनियन हे दुसरे सर्वांत मोठे ठिकाण आहे (एकूण १७.५ टक्के), तर चीन चौथ्या क्रमांकावर आहे (३.७ टक्के). गेल्या दशकात युरोपियन युनियन आणि भारत यांच्यातील वस्तूंच्या व्यापारात जवळपास ९० टक्के वाढ झाली आहे. २०२३ मध्ये युरोपियन युनियन आणि भारत यांच्यातील सेवा व्यापार ५९.७ अब्ज युरोपर्यंत पोहोचला, जो २०२० मध्ये ३०.४ अब्ज युरो होता. २०२२ मध्ये भारतातील परकीय गुंतवणूक साठ्यात युरोपियन युनियनचा वाटा १०८.३ अब्ज युरोपर्यंत पोहोचला, जो २०१९ मध्ये ८२.३ अब्ज युरो होता, ज्यामुळे युरोपियन युनियन भारतातील एक प्रमुख परकीय गुंतवणूकदार बनले आहे. हे प्रमाण महत्त्वाचे आहे, परंतु चीन (२४७.५ अब्ज युरो) किंवा ब्राझील (२९३.४ अब्ज युरो) मधील युरोपियन युनियनच्या परकीय गुंतवणूक साठ्यांपेक्षा खूपच कमी आहे. सद्यःस्थितीत सुमारे ६,००० युरोपीय कंपन्या भारतात कार्यरत आहेत. युरोपियन युनियनकडून थेट परकीय गुंतवणूक सुद्धा (एफडीआय) लक्षणीय आहे, जी भारताच्या औद्योगिक विकासाला, रोजगार निर्मितीला आणि तंत्रज्ञान हस्तांतरणाला आधार देते.

**मुक्त व्यापार करार (एफटीए)** : भारत आणि युरोपियन युनियनने २००७ मध्ये मुक्त व्यापार करारासाठी (एफटीए) वाटाघाटी सुरू केल्या. बाजार प्रवेश, बौद्धिक संपदा अधिकार आणि गुंतवणूक संरक्षणाशी संबंधित समस्यांमुळे वाटाघाटींमध्ये काही वेळा अडथळे आले असले तरी, ईयू-भारत एफटीए हे एक महत्त्वाचे दीर्घकालीन ध्येय आहे. दीर्घकाळच्या कोंडीनंतर २०२१ मध्ये वाटाघाटी पुन्हा सुरू झाल्या, ज्यामध्ये शुल्क कपात, गुंतवणूक संरक्षण आणि नियामक एकत्रीकरणावर लक्ष केंद्रित केले जात आहे. युरोपियन युनियन भारतात अधिक बाजार प्रवेश शोधत आहे, तर भारत निर्यात आणि गुंतवणुकीला चालना देण्यासाठी व्यापार अडथळे कमी करण्याचे उद्दिष्ट ठेवत आहे.

**भारत-युरोपियन युनियन यांच्यातील महत्त्वाचे उपक्रम** : धोरणात्मक सहकार्य आणि जागतिक प्रशासन- ईयू भारत धोरणात्मक भागीदारी आणि २०२५ पर्यंतचा रोडमॅप : व्यापार, गुंतवणूक, डिजिटलायझेशन, हवामान बदल, सुरक्षा, जागतिक प्रशासन आणि हवामान लवचीकता मजबूत करणे, शाश्वत वाढ आणि तांत्रिक प्रगती सुनिश्चित करणे, स्वच्छ ऊर्जा, कनेक्टिव्हिटी आणि सुरक्षेवर लक्ष केंद्रित करणे, प्रमुख आर्थिक क्षेत्रांमध्ये भारत-ईयू सहकार्य वाढवणे.

**ईयू-भारत स्वच्छ ऊर्जा आणि हवामान भागीदारी** : शाश्वत ऊर्जेसाठी नूतनीकरणक्षम ऊर्जा, स्मार्ट ग्रिड आणि स्वच्छ तंत्रज्ञान वित्तपुरवठा यामध्ये सहकार्य वाढवणे. हवामान अनुकूलन आणि शमन यांना समर्थन.

## वाचक पत्रे

### पाकच्या पंतप्रधानांनी स्वतःचे नाव बदलावे

नुकतेच पाकिस्तानच्या पंतप्रधानांनी भारताला दिलेले आव्हान अतिशय हास्यास्पद आहे. म्हणे, येत्या काळात भारताच्या अर्थव्यवस्थतेस मागे नाही टाकले तर स्वतःचं नाव बदलून टाकीन. या महाशयाच्या विधानानंतर संपूर्ण जगातून अर्थतज्ज्ञांची आकडेवारी समोर आली. ही आकडेवारी सांगते की, जगात पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असलेल्या विशाल भारताचा जीडीपी शून्यावर आला तरी (जे कदापि शक्य नाही ) भारताला मागे टाकायला पाकिस्तानला अजून ७६ वर्षे लागतील. जे पाकच्या पंतप्रधानांच्या हयातीत शक्य नाही. त्यामुळे त्यांनी आता स्वतःचे नाव बदलण्याची प्रक्रिया सुरू करावी.

पाकिस्तानात आजच्या घडीला अन्नधान्याचा प्रचंड तुटवडा आहे. देशातील निम्मी जनता एक वेळ उपाशी असते. आणि त्या तुलनेत भारताचा विचार केल्यास देशातील धान्य कोठारे समृद्ध आहेत. भारत सरकार ८० कोटी लोकांना मोफत धान्य देते. कुठेतरी तुलना होईल का? विभाजनावेळी भारताने दिलेल्या पंचावन्न कोटी रुपयांच्या मदतीने संसार थाटणारा पाकिस्तान आज चीनच्या तुकड्यावर जगत आहे. त्यामुळे आधीच भिकेचे डोहाळे लागलेल्या पाकिस्तानने भारताला आव्हान देण्याचा हास्यास्पद प्रकार करू नये.

**अखिल देशपांडे**/अकोला

### प्रयागराजमधील गंगेच्या शुद्धीकरणावर आरोप

प्रयागराज येथील महाकुंभमेळ्यात ६० कोटींपेक्षा जास्त लोकांनी त्रिवेणी संगमात स्नान केले. महाकुंभानंतर गंगा नदीच्या शुद्धतेवर अनेक आरोप झाले, त्यापैकी काही आरोप आणि त्यातील सत्यता खालीलप्रमाणे आहे.

काही लोकांनी असा आरोप केला की, सरकारने गंगेच्या शुद्धतेचे खोटे आकडे सादर केले आहेत. प्रत्यक्षात, सरकारने गंगेच्या पाण्याची वेळोवेळी तपासणी केली आहे आणि त्याचे निष्कर्ष सार्वजनिक केले आहेत. काही लोकांच्या मते, महाकुंभामुळे गंगेचे प्रदूषण वाढले आहे आणि त्यावर सरकारचे कोणतेही नियंत्रण नाही. परंतु, सरकारने महाकुंभ काळात प्रदूषण नियंत्रणासाठी अनेक उपाययोजना केल्या होत्या. काही लोकांनी असा आरोप केला की, सरकारने गंगेच्या शुद्धतेसाठी केलेले प्रयत्न फक्त देखावा होते, प्रत्यक्षात नदीत कोणतेही बदल झाले नाहीत. परंतु, सरकारी प्रयत्नांमुळे गंगेच्या पाण्यात बऱ्याच प्रमाणात सुधारणा झाली आहे.

गंगा नदीच्या शुद्धतेसाठी सरकारने अनेक प्रयत्न केले आहेत, तसेच अजूनही त्याबद्दलचे प्रयत्न सुरू आहेत. गंगा नदीच्या पाण्यात अशी काही तत्त्वे आहेत की त्यामुळे गंगा नदीचे पाणी आपोआप शुद्ध होते व ते पाणी कितीही दिवस ठेवले तरी दूषित होत नाही, असे मत काही शास्त्रज्ञांनी व्यक्त केले आहे. महाकुंभ काळात मोठ्या संख्येने लोक एकत्र आल्यामुळे नदीचे प्रदूषण वाढले असावे असा अंदाज होता पण तसे घडले नाही. पद्मश्री पुरस्कार प्राप्त शास्त्रज्ञ डॉ. अजय सोनकर यांच्या मते आता गंगा नदीचे पाणी केवळ आंघोळ करण्यासाठीच नव्हे, तर ते पिण्यायोग्य देखील आहे. सरकारने 'नमामि गंगे' या योजनेअंतर्गत अनेक प्रकल्प सुरू केले आहेत, ज्यामध्ये सांडपाणी प्रक्रिया संयंत्रे, घनकचरा व्यवस्थापन आणि नदीकाठची स्वच्छता यांचा समावेश आहे.

औद्योगिक कचरा आणि सांडपाणी नदीत मिसळण्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारने कडक नियम लागू केले आहेत. गंगा नदीच्या शुद्धतेसाठी जनजागृती केली जात आहे. सरकारने नदीच्या शुद्धतेसाठी अनेक प्रयत्न केले आहेत. अजूनही खूप काम बाकी आहे आणि यासाठी सरकार आणि नागरिकांचे एकत्रित प्रयत्न आवश्यक आहेत.

**अनंत ताम्हणे**/९४२२६१४७६२

### अर्थसंकल्पात 'शकुंतला' आहे का?

अचलपूर ते मूर्तिजापूर अशी एकेकाळी दिवसातून तीन वेळा धावणारी नॅरोगेज रेल्वे, गेल्या सहा वर्षांपासून अचानक बंद केली. ती पुन्हा सुरू व्हावी, एवढेच नव्हे तर ब्रॉडगेज व्हावी म्हणून परिसरातील शकुंतला रेल्वे बचाव ही मोजक्या नागरिकांची समिती सरसावली. गेल्या सहा वर्षांत ३० आंदोलने केलीत. राष्ट्रपतींपासून तर केंद्रीय मंत्र्यांपर्यंत अर्ज, विनंत्या झाल्यात. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी जिव्हाळ्याने प्रश्न हाताळून त्वरितच संबंधित मंत्र्यांना ही व्यथा कळकळीने लिहून पाठविली. मात्र रेल्वे मंत्रालयाने अद्याप प्राथमिक सर्व्हे होऊन देखील दखल घेऊन डीपीआर तयार केला नाही ही खंत या परिसरातल्या शेकडो गावांची आहे. मूर्तिजापूर-अचलपूर-चांदूर बाजार व भविष्यात थेट बैतुलपर्यंत ही ब्रॉडगेज झाली तर हजारो रोजगार, व्यापार व परिसराचा अभूतपूर्व विकास होऊ शकतो. समस्या सोडविण्यासाठी शासन गंभीर नाही हे बघून संपूर्ण परिसरात बेचैनी वाढत आहे. विशेष प्रकल्प म्हणून शासनाने अग्रक्रमाने प्राधान्य देऊन शकुंतला मार्गस्थ करावी अशी आशा नागरिक करीत आहेत.

**राजा धर्माधिकारी**/परतवाडा

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## क्राईम वृत्त...

### बाजूला सरक म्हणाल्यावरून तरूणास जमावाकडून मारहाण

**सोलापूर, दि. ३ मार्च-**

बाजुला सरक म्हणाल्याच्या कारणावरून तरूणास जमावाने मारहाण करून जखमी केले. याबाबत सुनिल मल्लिकार्जुन कोळी (वय २०, रा. ७० फूट रोड, इंदिरा नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात १० ते १२ जणांविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १ मार्च रोजी दुपारी सुनिल कोळी हा त्याच्या गॅरेजमध्ये काम करीत असताना गाडीचे साहित्य आणण्यासाठी गॅरेजमधून दुचाकी घेऊन जात होता. त्यावेळी गणेश पेठेत दोन अज्ञात इसम हे गॅरेजसमोर थांबले होते. त्यावेळी सुनिल कोळी याने त्या दोघांना बाजूला सरक असे म्हणाल्यानंतर त्यांनी भांडणास सुरुवात केली. त्यानंतर अचानक १० ते १२ जणांनी येऊन सुनिल कोळी यास स्टील पट्टीने व हाताने मारहाण केली. म्हणून जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार भिमपूरे पुढील तपास करीत आहेत.

### दारूच्या नशेत महिलेला मारहाण

**सोलापूर, दि. ३ मार्च-**

दुकानात साहित्य खरेदीसाठी गेलेल्या महिलेला दारूच्या नशेत एकाने मारहाण केली. रिजवाना युसूफ इनामदार (वय ३५, रा. राहुल गांधी झोपडपट्टी, सोलापूर) असे जखमी महिलेचे नाव आहे. ३ मार्च रोजी रिजवाना या घराजावळील दुकानात साहित्य घेण्यासाठी गेल्या होत्या. तिथे दारूच्या नशेत असलेल्या इरफान चित्तापूरे याने रिजवाना यांच्या डोक्यात दगडाने मारहाण करून त्यांना जखमी केले. त्यामुळे रिजवाना यांना उपचारासाठी शासकीय रुणालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### अज्ञात वाहनाच्या धडकेत तरूण जखमी

**सोलापूर, दि. ३ मार्च-**

अज्ञात वाहनाच्या धडकेच्या अपघातात तरूण जखमी झाला. हर्षवर्धन हेमंत गायकवाड (वय २८, रा. मल्लिकार्जुन नगर, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. सोमवारी दुपारी हर्षवर्धन गायकवाड हा रुपाभवानी मंदीर ते मार्केट यार्ड या रोडवरून दुचाकीवरून जात होता. त्यावेळी शेळगी ब्रिजच्या पुढे अज्ञात वाहनाच्या धडक दिल्याने त्यात जखमी झाल्यानो हर्षवर्धन यास उपचारासाठी शासकीय रुणालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### अज्ञात कारणावरून तरूणास मारहाण

**सोलापूर, दि. ३ मार्च-**

अज्ञात कारणावरून तरूणास मारहाण करण्यात आली. योगेश शिवाजी इरकशेट्टी (वय ३४, रा. कुमार नगर, मजरेवाडी, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. २ मार्च रोजी रात्री राहत्या घराजवळ थांबला असताना अज्ञात कारणाने सिताराम ताकमोगे याने लाथाबुक्क्याने योगेश इरकशेट्टी यास मारहाण केली. यामध्ये योगेश याच्या सर्वांगास मुका मार लागल्याने उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### तरूणीचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. ३ मार्च-**

घरगुती कारणावरून तरूणीने विषारी औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. निकिता नागनाथ सालगुडे (वय १९, रा. पुरनवाडी, ता. मोहोळ) असे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या तरूणीचे नाव आहे. २ मार्च रोजी रात्री राहत्या घरी निकिता सालगुडे हिने घरगुती वादातून कोणतेतरी औषध पिल्याने तिला त्रास होऊ लागल्याने उपचारासाठी आई अनिता सालगुडे यांनी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### पूर्व वैमनस्यातून तरूणाला मारहाण

**सोलापूर, दि. ३ मार्च-**

पूर्व वैमनस्यातून एकास बांबूने मारहाण केल्याप्रकरणी एका विरूद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. ही मारहाण १ मार्च रोजी रात्री ९ वाजता झाली. विकी सुधाकर ढावरे (वय २४ रा. महात्मा फुले वस्ती मोदी, सोलापूर) असे मारहाण झालेले तरुणाचे नाव आहे. विकी हा आपल्या घरासमोर थांबला होता. तेव्हां गल्लीत राहणारा संजय रणदिवे हा तेथे आला. आठ दिवसापूर्वी झालेल्या भांडणाचा राग मनात धरून त्याने शिवीगाळ करत बांबूने डोक्यात मारून जखमी केले.संजय रणदिवे याच्या विरूद्ध गुन्हा दाखल झाला असून तपास पोलीस नाईक माडे करीत आहेत.

## घोरपडीच्या गुप्तांगाची तस्करी करणाऱ्या तिघांना दोन दिवसांची वन कोठडी

### तस्करी करणारे आरोपी बीडचे; चारचाकी गाडीसह घोरपडीचे १५१ गुप्तांग जप्त

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ मार्च -**

सोलापूर वन विभागाने घोरपडीच्या गुप्तांगाची तस्करी करणाऱ्या अटक केलेल्या तिघांना मुख्य न्यायदंडाधिकारी भंडारी यांनी दोन दिवस वन कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला. सोलापूर वन विभागाने रविवारी सोलापूर रेल्वे स्थानकावर कारवाई करीत बीड जिल्ह्यातील तीनजणांना घोरपडीच्या गुप्तांगाची तस्करी करताना अटक केली होती. घोरपडीच्या गुप्तांगास हत्थाजोड म्हणून ओळखले जात असून याचा वापर काळ्या जादूसाठी केला जातो.

विठ्ठल सुग्रीव पाटोळे (वय २९), सुग्रीव रंगनाथ पाटोळे (वय ६०, रा. दोघे रा. पिंपळा, ता. वडवणी) बाळासाहेब लक्ष्यण डोरले (वय ३४, रा. चिखली जि. बीड) अशी वन कोठडी मिळालेल्यांची नावे आहेत.

सोलापूर रेल्वे स्टेशनवर आरोपी घोरपडीचे हत्थाजोड (गुप्तांग) विक्री करण्यास येणार असल्याची गोपनीय माहिती सोलापूर वन विभागाला मिळाली होती. त्यानुसार सकाळपासून सोलापूर रेल्वे स्टेशनवर पाळत ठेवण्यात आलेली होती. संशयित आरोपी एका चारचाकी गाडीमधून घोरपडीचे हत्थाजोड विक्रीसाठी घेऊन आले होते. रेल्वे स्टेशनवर आल्यावर खबऱ्याने त्यांना ओळखले व वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी तत्काळ त्यांना पकडून ताब्यात घेतले. झडती घेतली असता त्यांच्याकडे घोरपडीचे १५१ हत्थाजोड आढळून आले आहेत.

यावेळी वन विभागाने विठ्ठल सुग्रीव पाटोळे, सुग्रीव रंगनाथ पाटोळे, बाळासाहेब लक्ष्यण डोरले यांना ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. तिघांकडून एक चारचाकी गाडीदेखील जप्त करण्यात आली.

ही कारवाई अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक डॉ. क्लेमेंट बेन, मुख्य वनसंरक्षक एन. आर. प्रवीण यांच्या मार्गदर्शनाखाली उपवनसंरक्षक महादेव मोहिते, सहाय्यक वनसंरक्षक अजितस शिंदे, वनक्षेत्रपाल रोहितकुमार गांगर्डे, वनपाल रुकेश कांबळे, इरफान काझी, शशिकांत सावंत, वनरक्षक श्रीशैल पाटील, अश्विनी सोनके, योगेश जगताप, सायली ठोंबरे, रमेश कुंभार, सुरेश कुरले, रेणुका सोनटक्के, वाहन चालक कृष्णा निरवणे यांनी केली. या कारवाईसाठी सातारा येथील मानद वन्यजीव रक्षक रोहन भाटे तसेच कराड येथील हेमंत केंजळे यांनी मदत केली.



मृत घोरपडींची हाडे

**काय आहे हत्थाजोड ?...**

हत्थाजोड हे घोरपड प्राण्याच्या नराचे लिंग असून याचा वापर जादूटोणा करण्यासाठी केला जातो. बाजारात त्याची दोन ते पाच हजार रुपयांना विक्री होते. संशयित तस्करांनी अनेक शिकाऱ्यांकडून हे हत्थाजोड जमा केले असून याची बंगळूर येथे विक्री करण्यात येणार होती. १५१ हत्थाजोडसाठी किमान पाचशे ते सहाशे घोरपडीच्या शिकारी झाल्या असाव्यात, असा पर्यावरणप्रेमींचा संशय आहे. संशयित आरोपी हे सराईत असून त्यांच्याकडून असे यापूर्वीही गुन्हे झाले असल्याचे वन विभागाच्या तपासात निष्पन्न झाले आहे. घोरपड हा प्राणी वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ अंतर्गत शेड्यूल एकमध्ये येत असून त्याला संरक्षण देण्यात आलेले आहे. घोरपडीची शिकार करणे व विक्री करणाऱ्यास दहा हजार रुपये दंड व सात वर्षे सक्तमजुरी अशी शिक्षा आहे.

मनोरमा परिवार अंतर्गत
**ट्रीन सिटी अर्बन को. ऑप. क्रेडिट सोसायटी लि., सोलापूर**
विमल कॉम्प्लेक्स, माशाळ वस्ती, विजापूर रोड, सोलापूर
**ग्राहकांच्या आग्रहास्तव खास ठेव योजना**
९० दिवसांसाठी ९.००% व्याजदर
६० दिवसांसाठी ८.००% व्याजदर
९१ महिन्यात दामदुप्पट ठेव योजना
अधिक महितीसाठी संपर्क : ०२१७२३०३३१२
दिपक सुरवसे चेअरमन (९१७५१८३६९९) | नितीन भोसले व्हा. चेअरमन (९८८१५१५५३३) | दिपमाला जाधव व्यवस्थापिका (मो.८३२९२८७३१२)

## टेम्पोचालकास मारहाण करून 15 हजारांचा ऐवज लुटला

### पाचजणांविरुध्द गुन्हा दाखल; पत्रकार भवन चौकातील सोमवारी पहाटेची घटना

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ मार्च -**

टेम्पोचालकास मारहाण करून टेम्पोतील तिघांकडून १५ हजारांचा ऐवज लुटणाऱ्या पाचजणांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना सोमवारी पहाटे पाचच्या सुरास विजापूर रोडवरील पत्रकार भवन चौकात घडली.

याबाबत सचिन नागनाथ घागरे (वय २२, रा. अभिषेक नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अनोळखी पाच व्यक्तींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पाच व्यक्तींमध्ये एक मुलगा उंच असून त्याने डोक्याचे केस वाढवलेले असून अंगात गुलाबी टी शर्ट व जांभळा बर्मुडा घातलेला होता. तर अन्य एका मुलाने पांढऱ्या निळ्या रंगाचा टीशर्ट व निळी जिन्स पॅट घातलेली होती.

३ मार्च रोजी पहाटे पाचच्या सुमारास सचिन घागरे, चालक नवनाथ विश्वनाथ बारबोले व दौलत विठ्ठल ईरकले हे एमएच ४२ बी ९०६५ क्रमांकाच्या टेम्पोतून जात होते. पत्रकार भवन चौकात अनोळखी पाच जणांनी सचिन घागरे जात असलेला टेम्पो अडवून चालक नवनाथ बारबोले व घागरे यास मारहाण केली. यावेळी पाचजणांनी घागरे, चालक बारबोले व ईरकल यास मारहाण करून त्यांच्याकडील १० हजार रुपये रोख व ४० ग्रॅम वजनाचे चांदीचे ब्रेसलेट असा १५ हजार रुपयांचा ऐवज जबरदस्तीने लुटून नेला. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक शिंदे पुढील तपास करीत आहेत.

**दुकानाचे शटर उचकटून लॉकरमधील लाखांची रोकड लंपास**

**सोलापूर -** नविन कुंभारी नाका येथील विनायक नगरजवळील दिपाली नगररातील श्री बालाजी ट्रेडर्स नावाचे दुकानाचे शटर उचकटून चोरट्याने लॉकरमधील १ लाख ११ हजार ५५० रुपयांची रोकड चोरून नेली.

याबाबत स्वप्नील मनिष भावसार (वय २६, रा. एकता नगर, डब्ल्यूआयटी कॉलेजजवळ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्वप्नील भावसार यांचे दिपाली नगरात बालाजी ट्रेडर्स नावाचे दुकान आहे. २ मार्च रोजी रात्रीच्यावेळी दुकान बंद केल्यानंतर चोरट्याने दुकानाचे शटरचे कुलूप तोडून दुकानात प्रवेश करून ऑफीसमध्ये असलेल्या लोखंडी कपाटातील लॉकर मधील १ लाख ११ हजार ५५० रुपयांची रोख रक्कम चोरून नेली. याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक चंदनशिव पुढील तपास करीत आहेत.

**माळी नगरात घरफोडी**

**सोलापूर -** शहरातील माळी नगर येथील बंद घराचा कडी कोयंडा तोडून चोरट्याने ५ ग्रॅमचे सोन्याचे दागिने व ८ तोळ्याचे चांदीचे दागिने चोरून नेले.

याबाबत सतीश धनराज राठोड (वय ३०, रा. माळी नगर भाग ३, देवराज मोटार्सच्या बाजूला, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सतिश राठोड हे १ मार्च रोजी सायंकाळी घराला कुलूप लावून परगावी गेले होते. ३ मार्च रोजी सकाळी राठोड हे घरी परत आले असता त्यांना घरामध्ये चोरी झाल्याचे दिसून आले. चोरट्याने राठोड यांच्या बंद घराचे कडी कोयंडा तोडून बेडरूममधील लोखंडी कपाटातील लॉकरमधील सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेले. यामध्ये १० हजार रुपये रोख, २ ग्रॅमची सोन्याची अंगठी, १ ग्रॅमची सोन्याची बाली, २ ग्रॅमचे सोन्याचे बदाम, ४ तोळ्याचे चांदीचे पैंजण, २ तोळ्याचे चांदीचे कडे, २ तोळ्याचा हातातील चांदीचा कडा अशा दागिण्यांचा समावेश असल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. पोलिस हवालदार उबाळे पुढील तपास करीत आहेत.

## अनुभव प्रतिष्ठानचे यशस्विनी महिला पुरस्कार जाहीर

### ९ मार्चला वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मार्च-**

अनुभव प्रतिष्ठान सोलापूर यांच्या वतीने देण्यात येणारे यशस्विनी महिला पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. रविवार दि ९ मार्च २०२५ रोजी संध्याकाळी ४:३० वाजता हा पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे, अशी माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेश भाईकट्टी यांनी दिली.

महिलादिन निमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तीमत्वाचा या पुरस्काराने गौरव करण्यात येणार आहे. रविवारी शिवस्मारक सभागृह,नवी पेठ येथे हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. पुरस्काराचे हे पहिले वर्ष आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार प्रशांत जोशी, महावितरणचे वरीष्ठ निवृत्त उपअभियंता सिद्धाराम दुधनी, सिद्धेश्वर बालक मंदिर पूर्व प्राथमिकच्या मुख्याध्यापिका शारदा हेब्बाळ, संदीप पब्लिक स्कूलचे संचालिका स्नेहा पाटील आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यास सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन अध्यक्ष महेश भाईकट्टी, गणेश येळमेली, संतोष शिवशिंपी, शिवानंद नागणसुरे, गणेश कालदीप, सचिन लोणी, शिवानंद भाईकट्टी, सोमनाथ कालदीप, मंगेश कुलकर्णी, महेश कासट यांनी केले आहे.




**हे आहेत पुरस्काराचे मानकरी**

अस्मिता अंबुरे (इंजिनीयर), संगीता मुनावळी (शिक्षिका), अंबिका कनबसे (महिला पोलीस), राणी भंडारे (सरपंच, वलाडी), डॉ. उज्वला अ.लोखंडे (डॉक्टर), प्रांजली मोहिकर (समाजसेविका), आरती कुसेकर (पत्रकार), ऋतुजा लिमये (कलाक्षेत्र ), पल्लवी वाले (उद्योजिका), माधुरी मोरडे (वकील) आदी या पुरस्काराचे मानकरी आहेत. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल व पुष्पगुच्छ असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

## मराठी उद्योजकांनी निर्यात क्षेत्रातील संधींचा फायदा वेळीच घ्यावा : डॉ. दातार

**सोलापूर, दि. ३ मार्च-**

भारताची निर्यात गेल्या दशकभरात विक्रमी वाढून तिहासिक उच्चांकी पातळीला पोचली आहे आणि पुढील दशकातही हा वेग टिकून राहण्याची चिन्हे आहेत.भारतात व विशेषतः महाराष्ट्रात निर्यातीस अनुकूल अशा महत्त्वाच्या घडामोडी घडत असून त्या संधींचा फायदा मराठी व्यावसायिक व उद्योजकांनी वेळीच घ्यावा,असे आवाहन दुबईस्थित 'अदील ग्रुप ऑफ सुपर स्टोअर्स'चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मसालाकिंग डॉ. धनंजय दातार यांनी नुकतेच येथे केले.'मिती ग्रुप'तर्फे आयोजित 'महाराष्ट्र बिझनेस एन्क्लेव्ह २०२५' परिषदेत प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. या यशस्वी उपक्रमाचे हे तिसरे वर्ष आहे. माटुंग्यातील 'वेलिंगकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट'मध्ये झालेल्या या कार्यक्रमाला महाराष्ट्रातील उद्योग-व्यवसाय क्षेत्रातील नामवंत तसेच नवउद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## छत्रपती संभाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे स्ट्रक्चर ऑडिट करा

### संभाजी ब्रिगेडची महापालिका आयुक्तांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ मार्च -**

सोलापूर शहराचे प्रवेशद्वार असलेले छत्रपती संभाजी महाराज चौक (जुना पुणे नाका) येथील छत्रपती संभाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे स्ट्रक्चर ऑडिट करणे अत्यंत गरजेचे असून तातडीने ते करण्यात यावे अशी मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने सोलापूर महानगरपालिकेचे नूतन आयुक्त सचिन ओंबासे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

सोलापूर शहराचे प्रवेशद्वार असलेले छत्रपती संभाजी महाराज चौकामध्ये विविध कार्यक्रम प्रसंगी अभिवादन करताना महाराजांच्या पुतळा किंचित (व्हायब्रेट) हलल्या सारखे शिवशंभु प्रेमींना जाणवले होते. राज्याभिषेक दिना दिवशी सोलापूरच्या आयुक्त शितल तेली उगले या प्रमुख पाहुणे म्हणून आले असताना त्यांना ही गोष्ट निदर्शनास आणून दिली होती. त्यामुळे सदर पुतळ्याचे स्ट्रक्चर ऑडिट करणे चे काम गांभीर्याने १४ मे छत्रपती संभाजी महाराज जयंतीच्या आत करण्यात यावे, तसेच छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास नव्याने रंगकाम करण्यात यावे, या परिसरामध्ये सुशोभीकरणाचे काम मोठ्या प्रमाणात करण्यात आले होते त्याची योग्य पद्धतीने स्वच्छता व निगा राखली जावी यासाठी कर्मचाऱ्यांची नेमणूक करावी, छत्रपती संभाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास विविध कार्यक्रमानिमित्त पुष्पहार घालण्यासाठी उंच असल्या कारणाने अनेक वेळा अडचण येते काही वेळा पुष्पहार अर्पण करण्यासाठी पुतळ्यावर चढावे लागते त्यामुळे शिवशंभू प्रेमींना अभिवादन करण्यासाठी दोन्ही बाजूने एल टाईप मजबूत लोखंडी शिडी तयार करण्यात यावी, त्याचबरोबर येथे असलेला कारंजा २४ तास सुरू ठेवण्यात यावेत, पुतळा परिसरातील सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करावी, काही ठिकाणी किरकोळ कामे राहिलेली आहेत ती कामे करून घेण्यात यावी अशी मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने करून आयुक्तांना निवेदन देण्यात आले.

यावेळी पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले, शहराध्यक्ष शिरीष जगदाळे, संपर्कप्रमुख छत्रगुण माने, शहर उपाध्यक्ष संतोष सुरवसे, शहर कार्याध्यक्ष प्रशांत देशमुख, दिलीप निंबाळकर, गोवर्धन गुंड, सलीम शेख, शहर महिला उपाध्यक्ष माधुरी चव्हाण आदी उपस्थित होते.



महानगरपालिकेत सोमवारी जनता दरबार आयोजन करण्यात आले होते. वरच्या मजल्यावर वरील जागा अत्यंत कमी असल्याकारणाने आणि जनता दरबारात नागरिकांची अडचणी मांडण्यासाठी व निवेदन देण्यासाठी अनेक संघटना व नागरिक आल्या कारणामुळे जागा अपुरी पडत होती.शिवाय जेष्ठ नागरिकांना वरच्या मजल्यावर जाणं येणं अत्यंत कठीण जात होतं ही बाब संभाजी ब्रिगेडच्या निदर्शनास आल्यावर त्यांनी आयुक्त यांना जनता दरबार किंवा आपलं कार्यालय खाली तळमजल्यावर करण्यात यावे, जेणेकरून नागरिकांना त्याचा त्रास होणार नाही अशी विनंती केली. याची दखल घेऊन आयुक्तांनी लवकरात लवकर आपले कार्यालय तळ मजल्यावर आणू असे आश्वासन दिले.

Classifieds

**पाहिजे**
सोलापूर तसेच आसपासच्या जिल्ह्यात कॉम्प्रेसरच्या सेल्स, सर्व्हिससाठी, प्रतिनिधी हवा आहे. स्वराज न्युमॅटीक्स, सोलापूर
फोन : ८३८००५०४८३

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

**लवाद अधिकारी अ‍ॅड. तनपुरे गोविंद दशरथ**
(मल्टिस्टेट को-ऑप सोसायटीज अ‍ॅक्ट २००३ आणि आर्बिट्रेशन अ‍ॅन्ड कौन्सिलेशन अ‍ॅक्ट अन्वये)
जा. ८७८० क दि. २५/०२/२०२५
रेणूका भवन, २रा मजला गर्वे नं ३५/२अ*२ब पुष्पक हॉटेल जवळ, पाईप लाईन रोड सावेडी अ.नगर, अहमदनगर ४१४००३

**जाहीर नोटीस**

श्री. रेणुकामाता मल्टिस्टेट को-ऑप अर्बन केडिट सोसायटी लि., अहमदनगर -- अर्जदार
विरुध्द

| लवाद अर्ज क्रमांक | सामनेवाला क्रमांक | सामनेवाला यांचे नाव व पत्ता |
|---|---|---|
| ४७३८/२०२५ | | **कर्जदार श्री/श्रीमती जतन वसंत गवळी** रा. वसंत गवळी सावळे चाळ सोलापूर रोड बार्शी ता बार्शी जि सोलापूर **जामीनदार श्री/श्रीमती अपेक्षित सत्यवान कापसे** रा. मार्केट यार्ड तुळजापूर रोड बार्शी ता बार्शी जि सोलापूर **जामीनदार श्री/श्रीमती किरण उमेश दहिहांडे** रा. ३८४० रामेश्वर मंदिर कुडूवाडी रोड बार्शी ता बार्शी जि सोलापूर |
| ४७३९/२०२५ | | **कर्जदार श्री/श्रीमती - सुरेखा राजेंद्र बोकेफोडे** रा. विश्वशांती नगर जामगाव रोड लोकमान्य मिलजवळ जामगाव रोड बार्शी ता बार्शी जि सोलापूर **जामीनदार श्री/श्रीमती प्रशांत नागनाथ सोनवणे** रा. जयशंकर चाळ जामगाव रोड बार्शी ता बार्शी जि सोलापूर **जामीनदार श्री/श्रीमती हिरामण कुमार क्षीरसागर** रा. जामगाव मार्ग जयशंकर चाळ बार्शी ता बार्शी जि सोलापूर |
| ४७४०/२०२५ | | **कर्जदार श्री/श्रीमती रवींद्र राजेंद्र घोलप** रा. मल्लपा धनशेट्टी रस्ता बार्शी ता बार्शी जि सोलापूर **जामीनदार श्री/श्रीमती रोहित रामदास आवटे** रा.३०१ जामगाव आवटे वस्ती अगलगाव ता बार्शी जि सोलापूर **जामीनदार श्री/श्रीमती गणेश विष्णू पाडुळे** रा. ९८ जामगाव मारुती मंदिरा मागे जामगाव अगलगाव ता बार्शी जि सोलापूर |
| ४७४६/२०२५ | | **कर्जदार श्री/श्रीमती विनोद ज्ञानेश्वर भालेराव** रा. जामगाव रोड लोकमाय चाळ बार्शी ता बार्शी जि सोलापूर **जामीनदार श्री/श्रीमती रवींद्र रमेश माने** रा. जामगाव रोड २५५३/७३ लोकमान्य चाळ ता बार्शी जि सोलापूर **जामीनदार श्री/श्रीमती राजेश नागेश चौधरी** रा. जामगाव रोड लोकमान्य चाळ बार्शी ता बार्शी जि सोलापूर |

सदर नोटीसद्वारे तुम्ही वरील सर्व सामनेवालें यांना कळविण्यात येते की अर्जदार यांनी तुमचेविरुध्द वर नमूद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केलेला आहे. सदर लवाद अर्ज चौकशीच्या कामी आपण दिनांक ०८/०३/२०२५ रोजी ठिक सकळी ११.०० वा.लवाद कार्यलयात न चुकता हजर रहावे. तुम्ही जर हजर न राहिल्यास तुमच्या विरुध्द लवाद अर्जाचा एक्स पार्टी / एकतर्फी हुकुम करण्यात येईल याची नोंद घ्यावी सदर नोटीस माझ्या सही व शिक्यानीशी दिले असे.

सही/-
अ‍ॅड. तनपुरे गोविंद दशरथ
लवाद अधिकारी

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### चॅम्पियन्स चषक उपांत्य सामन्यासाठी पंचांची नावे



**दुबई** : मंगळवार दुबई येथे भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील चॅम्पियन्स चषक उपांत्य सामन्यात न्यूझीलंडचे ख्रिस गॅफनी आणि इंग्लंडचे रिचर्ड इलिंगवर्थ मैदानी पंच म्हणून काम पाहतील. इंग्लंडचे मायकेल गॉफ हे तिसरे पंच असतील, तर झिम्बाब्वेचे ॲण्डी पायक्रॉफ्ट हे सामना पंच म्हणून काम पाहतील, अशी घोषणा आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने केली आहे. इलिंगवर्थ हे रविवारी न्यूझीलंड विरुद्ध भारत सामन्यानंतर काम पाहतील, तर गॅफनी २५ फेब्रुवारी रोजी रावळपिंडी येथे गट ब मध्ये ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिकेच्या सामन्यात पंच म्हणून काम पाहणार होते, तर पावसामुळे सामना रद्द झाला. लाहोर येथे दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड यांच्यातील दुसऱ्या उपांत्य सामन्यात श्रीलंकेचे कुमार धर्मसेना ऑस्ट्रेलियाचे पॉल रीफेल यांच्यासोबत मैदानी पंच म्हणून काम पाहतील.

### दोन्ही संघांवर समान दबाव : रोहित श र्मा

दुबई : चॅम्पियन्स चषक स्पर्धेत उपांत्य सामना जिंकण्याचा दबाव केवळ भारतावरच नव्हे, तर ऑस्ट्रेलियावरसुद्धा असेल, असे मत भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्माने व्यक्त केले. उपांत्य फेरीत ऑस्ट्रेलियाविरुद्ध भारतावर अतिरिक्त दबाव असेल ही कल्पना कर्णधार रोहित शर्माने फेटाळून लावली . २०११च्या विश्वचषक उपांत्य फेरीत विजय मिळवल्यापासून भारताने आयसीसीच्या बाद फेरीच्या सामन्यांमध्ये ऑस्ट्रेलियाला हरवलेले नाही. रोहितने मंगळवारी येथे होणाऱ्या उपांत्य सामना काही चुरशीचा होणार असल्याचा इशाराही दिला.

मध्यभागीही आम्हाला काही चिंताग्रस्त वेळा अपेक्षित आहेत. पण आजकाल खेळ असाच खेळला जात आहे. त्यामुपळे उपांत्य सामना जिंकण्यासाठी दोन्ही संघांवर दबाव असेल, असेही तो म्हणाला.

### खेलो इंडिया हिवाळी क्री डा गुलमर्गमध्ये ९ मार्चपासून

**श्रीनगर** : बर्फवृष्टीमुळे पुढे ढकलण्यात आलेल्या खेलो इंडिया हिवाळी क्रीडा स्पर्धांच्या (केआयडब्ल्यूजी) पाचव्या आवृत्तीचा दुसरा टप्पा आता ९ ते १२ मार्च दरम्यान होणार आहे. जम्मू-काश्मीरच्या गुलमर्गमध्ये लक्षणीय बर्फवृष्टी झाली आहे. या दुसऱ्या टप्प्यात स्की माऊन्टेनियरिंग, अल्पाइन स्कीइंग, स्नोबोर्ड आणि नॉर्डिक स्कीइंग असे चार बर्फवृष्टी खेळांचा समावेश आहे, सुरुवातीला २२ ते २५ फेब्रुवारी दरम्यान गुलमर्गमध्ये होणार होता, परंतु गुलमर्गच्या स्की उतारांवर कमी बर्फवृष्टी झाल्यामुळे अधिकाऱ्यांनी हा कार्यक्रम पुढे ढकलण्याची घोषणा केली. गत सात दिवसांत स्की रिसॉर्टमध्ये चांगली बर्फवृष्टी झाली आहे आणि सोमवारीही गुलमर्गमध्ये बर्फवृष्टी सुरू असताना जमिनीवर पाच ते आठ इंच ताजी बर्फवृष्टी झाली आहे. ही स्पर्धा आता ९ मार्च रोजी सुरू होईल आणि १२ मार्च रोजी संपेल. देशभरातून ३०० हून अधिक खेळाडू अल्पाइन स्कीइंग, नॉर्डिक स्कीइंग, स्की माउंटेनियरिंग, स्नोबोर्डिंग आणि आइस हॉकी सारख्या स्पर्धांमध्ये भाग घेतील. पाचव्या खेलो इंडिया हिवाळी खेळांच्या व्यवस्था आधीच अंतिम झाल्या आहेत,

### गतविजेत्या मॅन्चेस्टर युनायटेडचा पराभव

**मॅन्चेस्टर** : एफए चषक फुटबॉल स्पर्धेत ओल्ड ट्रॅफर्ड येथे खेळल्या गेलेला नाट्यमय पाचव्या फेरीतील सामना अतिरिक्त वेळेत १-१ ने बरोबरीत राहिल्यानंतर फुलहॅमचा गोलरक्षक बर्न्ड लेनोने दोन पेनॉल्टी वाचवल्या आणि त्यांनी एफए चषक विजेत्या मॅन्चेस्टर युनायटेडचा पेनॉल्टी शूट-आऊटमध्ये ४-३ असा पराभव करून उपांत्यपूर्व फेरीत आपले स्थान निश्चित केले.

पूर्वार्धातील शेवटी स्टॉपेज टाइममध्ये फुलहॅमसाठी कॅल्विन बासीने केलेल्या सलामीच्या गोलनंतर युनायटेडच्या ब्रुनो फर्नांडिसने उत्तरार्धात बरोबरी साधल्यानंतर सामना पेनॉल्टी शूट-आऊटवर गेला.

अतिरिक्त वेळेत गोलरहित राहिल्यानंतर, लेनोने व्हिक्टर लिंडेलोफची पेनॉल्टी वाचवली, ज्यामुळे युनायटेडच्या जोशुआ झिरकझीला त्यांच्या आशा जिवंत ठेवण्यासाठी गोल करावा लागला. तरीही त्याने थेट लेनोवर आपला प्रयत्न केला ज्यामुळे फुलहॅमचा जल्लोष झाला.

# भारत अंतिम फेरी गाठण्यास उत्सुक

### आयसीसी चॅम्पियन्स चषक



रोहित शर्मा



स्टीव्ह स्मिथ

**भारत-ऑस्ट्रेलिया उपांत्य सामना**
**स्थळ** : दुबई आंतरराष्ट्रीय स्टेडियम, दुबई
**वेळ** : दुपारी २.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

◆ **दुबई, ३ मार्च**
आयसीसी चॅम्पियन्स चषक क्रिकेट स्पर्धेत मंगळवारी भारत आणि ऑस्ट्रेलियादरम्यानदरम्या न महत्त्वपूर्ण पहिला उपांत्य सामना खेळला जाणार आहे. दोन मजबूत संघ आमने-सामने उभे ठाकणार असून भारताला अंतिम फेरी गाठण्यासाठी आपल्या शक्तीशाली फिरकी गोलंदाजीचा प्रामुख्याने वापर करावा लागेल तसेच परिस्थितीशी परिचित असणे आवश्यक आहे.

तथापि, हे सोपे काम होणार नाही, कारण पॅट कमिन्स, जोश हेझलवूड आणि मिचेल स्टार्कच्या प्रमुख खेळाडूंशिवायही ऑस्ट्रेलियन संघ जागतिक स्पर्धांमध्ये एक मजबूत संघ आहे. काही दिवसांपूर्वी लाहोरमध्ये इंग्लंडविरुद्ध ऑस्ट्रेलियाने ३५२ धावांचा जबरदस्त पाठलाग केला होता.

२०११च्या विश्वचषक उपांत्यपूर्व सामन्यात भारताने आयसीसीच्या बाद फेरीत ऑस्ट्रेलियाविरुद्ध शेवटचा विजय मिळवला होता. २०१५ च्या वन-डे विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत व २०२३ च्या वन-डे विश्वचषकाच्या जेतेपदाच्या लढतीत भारताचा पराभव झाला आणि त्यानंतर २०२३ मध्ये जागतिक कसोटी अजिक्यपदाच्या अंतिम फेरीत भारताला पराभव पत्करावा लागला.

आता भारतीय संघ गत १४ वर्षांतील हे चित्र बदलवण्यास आणि नवीन इतिहास रचण्यास उत्सुक असेल . संघातील काही अव्वलर फिरकीपटूंच्या उपस्थितीमुळे भारताला हे लक्ष्य गाठण्याची आशा आहे. स्पर्धा प्रारंभ होण्याच्या पूर्वी भारतीय संघात पाच फिरकीपटूंची निवड करण्याच्या निर्णयावर सर्वत्र टीका झाली होती, परंतु आता दुबईतील संथ खेळपट्ट्यांवर हा एक मास्टरस्ट्रोक ठरत आहे.

भारतीय फिरकीपटूंच्या वर्चस्वाचे सर्वात सोपे स्पष्टीकरण म्हणजे दुबईमध्ये भारतीय संघाचे सर्व सामने खेळण्याची व्यवस्था करण्यात आली होती व त्यामुळे संघाला येथील वातावरणाची जाणीव आहे.

या खेळपट्टीवर गोलंदाजी करताना जादूपेक्षा संयम हाच महत्त्वाचा घटक आहे, असे वरुण चक्रवर्तीने स्पष्ट केले आहे.

येथील खेळपट्टी एकदम चेंडूला वळण देणारी नाही, असा अंदाज क्रिकेट तज्ज्ञ लावत होते, परंतु हा अंदगाज थोडा खरा होता, परंतु खेळपट्टी थोडीशी विचलित होत होती,.त्यामुळे आता गोलंदाजांना संयमाने खेळावे लागणार आहे, असे चक्रवर्ती म्हणाला.

चक्रवर्ती, कुलदीप यादव, रवींद्र जडेजा आणि अक्षर पटेल या भारतीय फिरकी गोलंदाजांनी न्यूझीलंडचे ९ गडी बाद केले, परंतु त्यांनी सातत्याने दबावाचा वापर करून त्यांचे बक्षीस मिळवले.

दुसरीकडे, ऑस्ट्रेलियाकडे ॲडम झम्पा म्हणून केवळ एकच खरा फिरकी गोलंदाज आहे, तर अर्धवेळ गोलंदाज ग्लेन मॅक्सवेल व ट्रॅव्हिस हेडकडून चांगली कामगिरी होईल अशी अपेक्षा आहे.

मॅथ्यू शॉर्टला पायाच्या दुखापतीमुळे स्पर्धेतून बाहेर काढण्यात आले आहे आणि त्यामुळे आधीच वाईट झालेल्या ऑस्ट्रेलियन गोलंदाजांना एक सोयीस्कर फिरकी गोलंदाजीचा पर्याय मिळाला आहे.

त्यामुळे, विराट कोहली, रोहित शर्मा, श्रेयस अय्यर आणि शुभमन गिलसारखे खेळाडू येथे आपल्यावर पूर्ण ताकद लावण्यास उत्सुक असतील. त्यांना या संथ खेळपट्ट्यांवर फलंदाजीचा लय सापडला आहे. कर्णधार रोहितलाही अशीच आशा होती.

हा एक चांगला सामना होणार आहे. आयसीसी स्पर्धांमध्ये ऑस्ट्रेलियाचा चांगला खेळण्याचा समृद्ध इतिहास आहे. आता, आपण गोष्टी योग्यरित्या करणे आवश्यक आहे. त्या दिवशी आपल्याला काय करायचे आहे यावर आपल्याला लक्ष केंद्रित करावे लागेल, असे रोहित म्हणाला.

हेड व कर्णधार स्टीव्ह स्मिथ यांच्याकडून कोणतेही अर्थपूर्ण योगदान न घेता ऑस्ट्रेलियाने ३५० पेक्षा जास्त धावांचे लक्ष्य गाठले तेव्हा त्यांच्याकडे किती फलंदाजी असू शकते हे त्याला माहिती नसेल. भारत निश्चितच त्यांना लवकरात लवकर बाहेर काढू इच्छित असेल, विशेषतः हेड कारण तो अलिकडच्या काळात संघाचा शत्रू आहे. रोहित आणि त्याच्या कंपनीसाठी अहमदाबादमध्ये २०२३ च्या विश्वचषक अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाकडून झालेल्या पराभवाचे अजूनही कायमचे दुःख कमी करण्याची ही एक संधी आहे. (वृत्तसंस्था)

### जखमी शॉर्टच्या जागी कॉनोली



चॅम्पियन्स चषकाच्या बाद फेरीसाठी दुखापतग्रस्त मॅथ्यू शॉर्टची जागा सोमवारी युवा फिरकी गोलंदाज कूपर कॉनोलीने घेतली आहे. शुक्रवारी अफगाणिस्तानविरुद्धच्या सामन्यादरम्यान पायाच्या दुखापतीमुळे पाकिस्तान आणि दुबईमध्ये होणाऱ्या आयसीसी स्पर्धेतून अव्वल फळीतील फलंदाज शॉर्टला वगळण्यात आले. गत वर्षी इंग्लंडमध्ये वन-डे पदार्पण करणाऱ्या २१ वर्षीय कॉनोलीला सुरुवातीला या स्पर्धेसाठी प्रवासी राखीव खेळाडू म्हणून नाव देण्यात आले होते. आयसीसीच्या स्पर्धा तांत्रिक समितीने सोमवारी सकाळी ऑस्ट्रेलियन संघात त्याच्या समावेशाला मान्यता दिली आहे. कॉनोलीने आतापर्यंत ऑस्ट्रेलियासाठी सहा आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत, त्यापैकी तीन वन-डे सामने आहेत. तो डावखुरा फलंदाज असून तो डावखुरा फिरकी गोलंदाजी सुद्धा आहे.

# वरुण चक्रवर्तीला संधी देण्याची ही योग्य वेळ : शास्त्री





◆ **दुबई, ३ मार्च**
वरुण चक्रवर्तीने न्यूझीलंडविरुद्ध उत्कृष्ट गोलंदजी केली. आता ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या उपांत्य सामन्यासाीही त्याचा भारतीय संघात समावेश करायला हवा, त्याला संधी देण्याची ही योग्य वेळ आहे, असे मत भारतीय संघाचे माजी प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी व्यक्त केले.

रविवारी येथे झालेल्या अंतिम गट अ साखळी सामन्यात न्यूझीलंडविरुद्धच्या भारताच्या ४४ धावांच्या विजयात चक्रवर्तीने ४२ धावांत ५ बळी घेत महत्त्वाची भूमिका बजावली.

वरुण चक्रवर्तीच्या कामगिरीने मी खूप प्रभावित झालो. योग्य निवड केल्याबद्दल संघ व्यवस्थापनाचे अभिनंदन, अशा शब्दात त्यांनी चक्रवर्तीचे कौतुक केले.

वरुण मधल्या षटकांमध्ये तुम्हाला विकेट मिळवून देईल. त्याला संधी देण्याची ही योग्य वेळ आहे. त्याने पाच बळी घेऊन सामन्याचा कल भारताच्या ब ाजूने वळवला, असे शास्त्री यांनी इंस्टाग्रामवर पोस्ट केलेल्या आयसीसी व्हिडीओमध्ये म्हटले आहे. जर तुम्ही त्याचा सध्याचा फॉर्म पाहिला असेल आणि मी नेहमीच सध्याच्या फॉर्मवर विश्वास ठेवतो. त्याची देहबोली, त्याचा आत्मविश्वास आणि त्याची स्वतःची क्षमता पाहता आणि या स्पर्धेत उरलेल्या न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका सारख्या प्रतिस्पर्धी संघांकडे पाहता तेव्हा बहुतेक संघांनी त्याला जास्त खेळवले नाही किंवा त्याला पुरेसे पाहिलेले नाही, असेही ते म्हणाले.

रविवारी दुबईच्या संथ खेळपट्टीवर न्यूझीलंडविरुद्ध भारताने चार खेळाडूंच्या फिरकी हल्ल्याची निवड केली आणि न्यूझीलंडविरुद्ध खेळलेला हाच अंतिम एकादश ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या सामन्यासाठी कायम ठेवावा, असेही ते म्हणाले.

त्याच अकरा खेळाडूंसह उतरावे, टर्नअराउंड वेळ ४८ तासांपेक्षा कमी आहे. सध्या मैदान थोडे थकले आहे, लोक दुसऱ्या दिवशी वापरल्या जाणाऱ्या खेळपट्टीवर धावले आहेत, त्यामुळे खेळपट्टी फिरकीपटू अनुकूल असेल, असे म्हणाले. (वृत्तसंस्था)



# खुल्या गटात हर्ष हलमल्ली अजिंक्य

### जगन्नाथ शिंदे चॅम्पियन चषक बुद्धिबळ स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ मार्च-**
जगन्नाथ शिंदे चॅम्पियन चषक बुद्धिबळ स्पर्धा मालिका दोनमधील पहिल्या स्पर्धेत तेरा वर्षाखालील खेळाडू हर्ष हलमल्ली याने चमकदार कामगिरी करत खुल्या गटात शेवटपर्यंत अपराजित रहात या विजेतेपद पटकावले.

ऑल इंडिया केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त ही स्पर्धा श्री रमा जगदीश बहुद्देशीय महिला उत्कर्ष संस्थेच्या वतीने व सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनच्या सहकार्याने आयोजित केली होती. या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ सुशील कुमार शिंदे भा.वि. प्रशालेचे अध्यक्ष संतोष पैकेकरी, सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनचे सचिव शरद नाईक, प्रा.महेश करंजकर, गुरुदत्त पाटील, विशाल पटवर्धन, चंद्रशेखर बसर्गीकर, समीर शिंदे, चंद्रकांत पवार, बिळेणीसिद्ध बिराजदार यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. सर्व विजयी खेळाडूंचे श्री रामा जगदीश संस्थेचे अध्यक्ष मधुकर नाईक व सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनचे अध्यक्ष अर्जुन कदम, खजिनदार नीता तांबोळकर, शिरीष नाईक, राजू राजपूत, प्राध्यापक शैलेंद्र नाईक यांनी कौतुक करीत अभिनंदन केले आहे.

**गुणानुक्रमे विजयी खेळाडू : आठ वर्षाखालील** : नयन कंदीकटला, राजवर्धन देशमुख, नमन रंगरेज, पार्थ भांगे, स्वामी विवेक, सिद्धार्थ शेळके, प्रज्ञेश काबरा.

**नऊ वर्षाखालील** : पृथा ठोंबरे, प्रतीक हलमल्ली, प्रथम मुदगी, प्रज्ञेश महाडकर, नैतिक होटकर, उत्कर्षा लोखंडे, हिमांशू व्हनगावडे.

**दहा वर्षाखालील** : वेदांत पांडेकर, निरंजन ओम, श्रेयस इंगळे, विहान कोंगारी, समरजीत देशमुख, कंदीकटला श्रेयस, श्लोक चौधरी

**अकरा वर्षाखालील** : देवदत्त पटवर्धन, आदित्य कसबे, आयुष्य जानगवळी, वेद मोहोळकर, श्रीरंग पैकेकरी, अर्णव जोशी, रणविजय रायकर.

**१४ वर्षाखालील** : वेद आगरकर, शिवम अंबरकर, साईराज घोडके, कदम तन्मय, अथर्व बसर्गीकर, विवेक स्वामी, स्वानंद तापकिरे, जमादार सानिध्य, सुकन्या बिराजदार, आदित्य भिंगारे.

**१९वर्षाखालील गट** : श्रेया संदूपटला, स्वराली हातवळणे, ओम गायकवाड, गणेश घोरपडे, श्रीपाद पाटील, लिमकर वरद, प्रथमेश शेटे, गौरांग दासरी, बोबडे श्रेयस, शेख फराह.

**खुला गट** : हर्ष हलमल्ली, रणवीर पवार, शिंदे अमर, विशाल कल्याणशेट्टी, चंद्रकांत पवार, चंद्रशेखर बसर्गिकर,निनाद कुलकर्णी, महादेव भोरे, तनिष्क शहा, पवन जल्लीपल्ली.

**उत्तेजनार्थ** :अद्विक ठोंबरे, शिवतेज मोटे, रेवा गांधी, श्रवण शेंडगे, स्वस्तिका सगम ,रामकृष्ण बडवणे,अधिराज कारंजे, परम शहा.

# सोलापूरच्या महिलांचा परभणीवर दणदणीत विजय

### वरिष्ठ महिला गट आमंत्रित क्रिकेट: वाघमोडे, माशाळे,देवकते चमकल्या



साक्षी वाघमोडे



पूनम माशाळे



विभावरी देवकते

**सोलापूर, दि. ३ मार्च-**
जयसिंगपूर येथे सुरू झालेल्या महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या आंतर जिल्हा महिलांच्या वरिष्ठ गटाच्या एकदिवसीय मर्यादित षटकांच्या क्रिकेट स्पर्धेत साक्षी वाघमोडेच्या अष्टपैलू खेळाच्या जोरावर सोलापूरच्या महिलांनी परभणी संघावर ७ गडी राखून दणदणीत विजय मिळविला. साक्षीबरोबरच पूनम माशाळे, विभावरी देवकते सोलापूरच्या विजयाच्या शिल्पकार ठरल्या.

नाणेफेक जिंकून परभणी संघाने प्रथम फलंदाजी स्वीकारली. ऋतुजा गिलबिले (६१) वगळता अन्य खेळाडूला सोलापूरच्या पूनम माशाळे (३३/३ बळी), विभावरी देवकते (२५/३ बळी) यांनी टिकू दिले नाही. भक्ती पवार, साक्षी लामकाने स्नेहा शिंदे साक्षी वाघमोडे यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. परभणीचा डाव ४६.१ षटकात १७८ धावांत गुंडाळला. विजयी लक्ष्य गाठताना सोलापूरच्या साक्षी वाघमोडेने ८७ धावा (९० चेंडू १३ चौकार) केल्या. स्नेहा शिंदे हिने ३८ धावा केल्या. ३५.३ षटकात ३ गड्यांचे मोबदल्यात सोलापूरने १७९ धावा केल्या.



# शिवांश काळे, ऋतुजित मोरे दुहेरीचे मानकरी

### श्री स्पोर्टस अकादमी व आस्था सामाजिक संस्थेची बाल मैदानी स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मार्च -**
श्री स्पोर्टस अॅकॅडमी व आस्था सामाजिक संस्थेच्या बाल मैदानी स्पर्धेत शटल रन व ५० मीटर धावण्याच्या शर्यतीत नर्सरी गटातून शिवांश काळे व दुसरी गटातून ऋतुजित मोरे यांनी अव्वल स्थान पटकावित दुहेरी मुकुटाचा मान मिळविला.

शरदचंद्र पवार प्रशाला अवंती नगर या मैदानावर श्री स्पोर्टस अॅकॅडमी व आस्था सामाजिक संस्थेच्या वतीने बाल मैदानी स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले. आस्था सामाजिक संस्थेचे अध्यक्ष आनंद तालिकोटी, प्रसिद्धी प्रमुख सुहास छंचुरे, वेदांत तालिकोटी, अनिल कपाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत बक्षिस पात्र खेळाडूंना प्रमाणपत्र व पदक देऊन गौरवण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशिक्षक अतुल सोनके यांनी मानले. स्वप्नाली सोनके यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहाय्यक मार्गदर्शक आकाश भरडशेट्टी, शौनक गलगली यांनी परिश्रम घेतले.

**बक्षिस पात्र विद्यार्थी (अनुक्रमे प्रथम, द्वितीय तृतीय व उत्तेजनार्थ)**

**शटल रन** - नर्सरी गट : शिवांश काळे , राघव चौबे, ध्वज ताटे, अविनाश शिंदे. लहान गट : कैवल्य भोसले , रिधान राका, रेवांश जाधव, आरुष धूत, मिश्री मर्दा. मोठा गट: श्रीतेज जाधव, अन्वी भट्टड, लासविका टेणका, कबीर गवळी,विहान निकंबे. पहिली गट : श्रीशा थोरात, स्पृहा पवार, धनुष नवले, शिवन्या पाटणे, आनंदी व्यवहारे, स्मरण नागणे. दूसरी गट: ऋतुजित मोरे ,प्रियांश लड्डा, राधिका भोसले. तिसरी व चौथी गट : सिद्धार्थ वेद, हर्ष कोटमाळे, मनस्वी सोनके, राहीशा निकंबे, जय भगत. पाचवी ते सातवी : रणजीत मोरे, सिद्धी उमाप, अर्पिता व्यवहारे, भावण्या उंडेली,आर्या बाबर.

**५० मीटर धावणे**-नर्सरी गट : शिवांश काळे, समंथा नवले, ध्वज ताटे, अथर्व जाधव शिवम देशमुख. लहान गट : रेवांश जाधव, रिधान राका, आरुष धूत, कैवल्य भोसले, आर्यांश गवळी. मोठा गट : अन्वी भट्टड, ईरा शेळके, ऋत्विक कांबळे, श्रीतेज जाधव, हर्षवर्धन जाधव. पहिली गट : धनुष नवले, स्मरण नागणे, आनंदी व्यवहारे, श्रीपाद जोशी, दुसरी गट : ऋतुजित मोरे, अथर्व बाबर, राधिका भोसले. तिसरी व चौथी गट : मनस्वी सोनके, सिद्धार्थ वेद ,शिवरुद्र कारंडे. पाचवी ते सातवी गट: सिद्धी उमाप, भावण्या उंडेल्ली, रणजीत मोरे, अर्पिता व्यवहारे.

# धाराशिव, वेळापूर व किरण स्पोर्टस सोलापूरची विजयी घोडदौड

### कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे मामा यांच्या जयंतीनिमित्त विभागीय निमंत्रित पुरुष खो-खो स्पर्धा



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३ मार्च-**
कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे मामा यांच्या १२२व्या जयंतीनिमित्त सुरु असलेल्या पुरुष गटाच्या विभागीय निमंत्रित खो-खो स्पर्धेत पुरुष गटात अ गटातून धाराशिवचे छत्रपती व्यायाम प्रसारक मंडळ व सोलापूरचे किरण स्पोर्टस् क्लबने प्रत्येकी दोन सामने जिंकत विजयी घोडदौड कायम ठेवली आहे.

शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या कर्मवीर मैदानावर सुरू असेलल्या या स्पर्धेत ब गटातून वेळापूरच्या अर्धनारी नटेश्वर क्रीडा मंडळाने दोन सामने जिंकत आघाडी घेतली आहे तर धाराशिवचे तुळजाभवानी क्रीडा मंडळ व साताराच्या स्वराज्य या संघानी प्रत्येकी एक सामने जिंकले आहेत.

मंगळवारी या स्पर्धेचा समारोप असून बार्शीच्या श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव पी. टी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आणि सहसचिव अरुण देबडवार व बार्शीचे पोलिस निरीक्षक बालाजी कुकडे यांच्या हस्ते या स्पर्धेतील प्रथम तीन संघास बक्षिस वितरण करण्यात येईल. या संघाना अनुक्रमे २१, १५ व ११ हजार व वैयक्तिक खेळाडूंना अष्टपैलू, आक्रमक व संरक्षकाचे प्रत्येकी २ हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात येईल.

**रविवारी रात्री व सोमवारी सकाळी झालेल्या साखळी सामन्याचे निकाल**

- अर्धनारी नटेश्वर क्रीडा मंडळ वेळापूर विजयी विरुद्ध श्री. तुळजाभवानी क्रीडा मंडळ, धाराशिव १८-१६ (२ गुण व ३० सेकंद राखून विजयी).
- किरण स्पोर्टस् सोलापूर विजयी विरुद्ध शिवप्रतिष्ठान मंगळवेढा १७-१५ (२ गुणांनी विजयी)
- किरण स्पोर्टस् सोलापूर विजयी विरुद्ध ओगलेवाडी स्पोर्टस् क्लब सातारा २१-१५ (६ गुणानी विजयी)
- छत्रपती व्यायाम प्रसारक मंडळ धाराशिव विजयी विरुद्ध शिवप्रतिष्ठान मंगळवेढा १३-१२ (८.३० मि. राखून).
- अर्धनारी नटेश्वर क्रीडा मंडळ वेळापूर विजयी विरुद्ध उत्कर्ष क्रीडा मंडळ सोलापूर ९-८ (१ डाव १ गुणांनी विजयी).
- स्वराज्य संघ सातारा विजयी विरुद्ध उत्कर्ष क्रीडा मंडळ सोलापूर १७-१४ (३ गुणांनी विजयी).
- तुळजाभवानी क्रीडा मंडळ धाराशिव विजयी विरुद्ध स्वराज्य क्रीडा मंडळ सातारा १६-११ (१ डाव ५ गुणांनी विजयी).

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


## संक्षिप्त वृत्त

### अध्यात्माचा प्रचार, प्रसार केल्याने शांती लाभते : शांतलिंगराध्य महास्वामी

**अक्कलकोट, दि. ३ मार्च-**

भारतीय संस्कृती पाश्चिमत्य देशाप्रमाणे नसून त्यागावर आधारलेली आहे. महाराष्ट्र ही संताची भूमी असून विविधतेत एकता ही भारताची संस्कृती आहे. त्यासाठी सर्वांनी अध्यात्माचा प्रचार व प्रसार केल्याने मनुष्याला शांती लाभणार आहे. या जन्मात सत्कर्म करून परमेश्वराचे नामस्मरण केले पाहिजे, असे मौलिक विचार श्रीक्षेत्र हिरेजेवरगी व अक्कलकोट्या श्री शांतलिंगेश्वर हिरेमठाचे मठाधिपती श्री.ष. ब्र.जयगुरु शांतलिंगराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांनी केले. येथील आझाद गल्ली मधील श्री अक्कमहादेवी मंदिर प्रतिष्ठापनाच्या सहाव्या वर्धापन दिनाच्या सांगता सम रंभात आयोजित करण्यात आलेल्या महादासोही कलबुरगी श्री शरणबसप्पा



चरित्रावरील दहा दिवशीय श्री मृगेंद्र शास्त्री यांच्या अमृतवाणीने आणि संगीत-वीरपाक्ष्यच्या गौडगाव, तबला- बसवराज आळंद यांच्या सहकार्याने पुराण समाप्ती निमित्त आयोजित धर्मसभेत महास्वामीजी बोलत होते. अध्यक्षस्थानी श्री म.नि.प्र. बसवलिंग महास्वामीजी हे होते. व्यासपीठावर नरोणाचे श्री महांत महास्वामीजी, माजी आमदार सिध्दाराम म्हेत्रे, माजी नगराध्यक्षा शोभाताई खेडगी, बसलिंगप्पा खेडगी, मिलन कल्याणशेट्टी, महेश हिंडोळे, रेखा पाटील, समाजसेविका मल्लम्मा पसारे, महादेवी कवटगी उपस्थित होते. अध्यक्षीय भाषण श्री बसवलिंग महास्वामीजी यांनी केले. यावेळी अक्कमहादेवी मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष श्रीशैल भरमशेट्टी, सर्व पदाधिकारी व विश्वस्त मंडळ, माजी नगरसेवक मल्लिनाथ स्वामी शशिकांत भकरे, रामचंद्र समाने, शुभांगी मेंदर्गीकर, नितीन शेंडगे, सत्यजित लोके, संध्या बिराजदार, स्नेहा नरके, चंद्रकांत कालिबत्ते, संजय हारकुड, विजयकुमार लिंबितोटे, माजी सैनिक अनिल हत्ते, धुळप्पा भजे, मलप्पा कुंभार, शिवप्पा कुंभार उपस्थित होते. सूत्रसंचालन लक्ष्मण समाने यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आझाद गल्ली, माळी गल्ली,बसवेश्वर नगर, राजीव नगर,शिवसम्राट चौक मधील कार्यकर्ते -सेवेकरींनी परिश्रम घेतले.

### रिजनल टीचर्स ऑर्गनायझेशनच्या अध्यक्षपदी वर्षा खटके-पाटील

**टेंभुर्णी, दि. ३ मार्च-**

रिजनल टिचर्स ऑर्गनायझेशन दापोली या संघटनेत वर्षा संजय खटके पाटील यांची रत्नागिरी जिल्हा अध्यक्षपदी निवड करण्यात आली. रिजनल टिचर्स ऑर्गनायझेशन दापोली ही शिक्षण क्षेत्रात काम करणारी राष्ट्रीय संस्था आहे. संघटनेचे अध्यक्ष प्रा. संजय काशिद यांनी वर्षा खटके-पाटील यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांची रत्नागिरी जिल्हा अध्यक्षपदी निवड करण्यात आली असून वर्षा खटके या म



ळ सोलापूर जिल्ह्यातील सापडणे (टें) तालुका माढा, गावच्या कन्या असून विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक बाळासाहेब ढवळे यांची पुतणी आहे. त्यांच्या या निवडीबद्दल बाळासाहेब ढवळे, सचिन जगताप, दत्तात्रय ढवळे, कृषी अधिकारी संजय पाटील, कृषी अधिकारी आनंद ढवळे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## निधन वृत्त...

### मच्छिंद्र भोरे-साळुंखे



**सांगोला, दि. ३ मार्च-**

वासुद (ता. सांगोला) येथील केदारवाडीचे रहिवासी माजी सैनिक मच्छिंद्र शंकर भोरे-साळुंखे (वय-९०) यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, पाच विवाहित मुले, जावई, नातवंडे असा परिवार आहे. शिवसेनेचे तुषार इंगळे यांचे ते आजोबा होत.

### बसवराज दामा



**सोलापूर, दि. ३ मार्च-**

बसवराज भीमाशंकर दामा (वय ८१, रा. वडगाव, ता. द. सोलापूर) यांचे सोमवारी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी शेतामध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा यांचे ते वडील होत.

### अंबादास गुन्नाल



**सोलापूर, दि. ३ मार्च-**

पूर्व भागातील दत्त नगर - कुचन नगर बालाजी मंदिराच्या मागे असलेल्या अंबाल रेसिडेन्सी मधील अंबादास सिद्राम गुन्नाल (वय ७८) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, जावई, नातू असा परिवार आहे.

### अरुण पाणीगार



**सोलापूर, दि. ३ मार्च-**

पोलीस हेडक्वार्टर परिसरातील अरुण दत्तात्रय पाणीगार (वय ६५) यांचे सोमवारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे. ते निवृत्त जिल्हा परिषद कर्मचारी तर महाराष्ट्र कोळी समाज वधू-वर सूचक संघाचे अध्यक्ष राजेश पाणीगार यांचे ते थोरले बंधू होत.

### जगदेवी वस्त्रद

**पानमंगरूळ, दि. ३ मार्च-**

अक्कलकोट तालुक्यातील पानमंगरूळ येथील श्रीमती जगदेवी अप्पाय्या वस्त्रद (स्वामी) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, सूना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांची अंत्यविधी उद्या (मंगळवार) सकाळी १० वाजता राहत्या घरापासून निघणार आहे. पानमंगरूळचे वेदमूर्ती कल्लय्या वस्त्रद यांचे मातोश्री होत.

# अध्यात्म व तंत्रज्ञानाचा उपयोग समाज विकासासाठी

## कुलगुरू प्रकाश महानवर यांचे प्रतिपादन

### पंढरपुरात पत्रकारांसाठी राज्यस्तरीय कार्यशाळा



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३ मार्च -**

अध्यात्म व तंत्रज्ञान समाजाच्या विकासासाठी उपयोगी ठरतात असे प्रतिपादन कुलगुरू प्रकाश म हानवर यांनी केले. सोलापूर विद्यापीठ, पंढरपूर प्रेस क्लब व स्वेरी महाविद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय पत्रकारांच्या कार्यशाळेत प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

कुलगुरू महानवर म्हणाले, नशिबाला काम ाची साथ असेल तर चांगल्या गोष्टी घडतात. यामुळे भूतकाळात आपण जे काय केले त्याची आठवण नेहमी ठेवली तर पुढील वर्तन चांगले घडून आपला विकास होण्यास मदत होते. सध्या डिजिटल टेक्नॉलॉजीचे युग आलेले आहे. यामुळे सर्व घटनेची माहिती तात्काळ मिळते आहे.मात्र समाज माध्यमांवर (सोशल मीडियावर) येत असलेल्या मजकुराची (पोस्टची) खात्री करूनच त्या पुढे पाठविणे गरजेचे आहे नाहीतर अनुचित घटना घडण्याचा प्रकार घडतो. त्यामुळे केंद्र व राज्य शासनाने सोशल मिडियावर लक्ष केंद्रित केले आहे. सोशल मीडियावर येणाऱ्या पोस्टचा जागरुक नागरिक म्हणून जरुर विचार करणे गरजेचे आहे. तंत्रज्ञानापेक्षा आपले आई-वडील ज्येष्ठ मार्गदर्शक होते हे विसरून चालणार नाही. आई-वडिलांनी आपणास बोलण्यास शिकविले आहे. संस्कार केले आहेत यामुळेच आपण मोठे झालो आहोत याची जाण प्रत्येकाने ठेवणे गरजेचे आहे. सध्या माहिती तंत्रज्ञानाचे युग असले तरी देवाच्या दर्शनासाठी तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी तोबा गर्दी होत असल्याचे दिसून येत आहे. यामुळे अध्यात्म व तंत्रज्ञान समाजाच्या विकासासाठी उपयोगी ठरतात हे दिसून येत आहे. यावेळी बोलताना एबीपी माझाचे संपादक राजीव खांडेकर म्हणाले, सध्या राज्यात, देशात विविध प्रकारच्या घटना घडत असल्याची माहिती आपणास समाज माध्यमांवर काही सेकंदात वाचावयास, पहावयास मिळत आहे. समाजात जातीभेद वाढला आहे. जसे तंत्रज्ञानाचा चांगल्या गोष्टीसाठी वापर केला जात आहे तसाच वाईट गोष्टीसाठी सुद्धा याचा जास्त उपयोग केला जात आहे. तंत्रज्ञानाचा उपयोग करून सर्वसामान्य नागरिकांचे आयुष्य उंचावले गेले आहे. ठाण्यातील एका तरुणाने तंत्रज्ञानाचा अवलंबन करून शेकडो कोटी रुपयांची उलाढाल आपल्या कंपनीच्या माध्यमातुन केली आहे. या बरोबरच जळगाव जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील एका मुलाने गाण्याच्या आवडीतून तंत्रज्ञानाच्या मदतीने गाण्याला गवसणी घातली आहे. विशेष म्हणजे या मुलाचे गाणे जगातील पन्नास गाण्यांमध्ये आज गणले जात आहे. हे सर्व घडले ते केवळ तंत्रज्ञानामुळेच घडले आहे. त्यामुळेच तंत्रज्ञान हे मानवी विकासाच्या जीवनातला अविभाज घटक बनला आहे असे सांगुन याच तंत्रज्ञानाचा उपयोग चांगल्या कामासाठी केला गेला पाहिजे असे देखील संपादक खांडेकरांनी सांगितले.

### तंत्रज्ञानाचा सुयोग्य कार्यासाठी उपयोग करावा : डॉ. बी.पी. रोंगे

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी राज्यस्तरीय कार्यशाळा ठेवण्या पाठीमागचा उद्देश सांगितला या बरोबरच पत्रकार आणि पत्रकार पुढची आव्हाने याविषयी देखील यावेळी त्यांनी उहापोह केला. तंत्रज्ञानामध्ये आज आपण प्रगती करत असलो तरी या तंत्रज्ञानाचा चांगल्या कामासाठी, कार्यासाठी उपयोग केला गेला पाहिजे अशी देखील अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

# बार्शीत प्रथमच तृतीयपंथी झाले 'संगांयो'चे लाभार्थी

## सचिन वायकुळेंच्या पुढाकाराने मिळाला लाभ

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३ मार्च-**

गेल्या अनेक दिवसांच्या पाठपुराव्यानंतर बार्शीच्या इतिहासात प्रथमच येथील तृतीयपंथी संजय गांधी निराधार पेन्शन योजनेचे लाभार्थी झाले असून त्यांना आता शासनाचे मासिक मानधन मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. तहसीलदार एफ.आर. शेख यांच्या सहकार्याने व तृतीयपंथी मार्गदर्शक सचिन वायकुळे यांच्या पुढाकाराने तृतीयपंथीयांना प्रथमच या योजनेचा लाभ मिळाला आहे.

निराधारांसाठी शासनाने संजय गांधी निराधार पेन्शन योजना सुरु केली. अनेक निराधार याचे लाभार्थी झाले. तृतीयपंथी समुदाय यामध्ये समाविष्ट नव्हता. तृतीयपंथी समुदायाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तहसील कार्यालयाच्या मदतीने तहसीलदार एफ.आर. शेख यांच्या उपस्थितीत सचिन वायकुळे यांनी या समुदायाची बैठक घेऊन आवश्यक ती कागपत्रे जमा केली. यानंतर यासंबधीचे प्रस्ताव तहसील कार्यालयाला सादर केले. कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर संजय गांधी योजनेच्या समितीची बैठक घेऊन पहिल्या टप्प्यात ४ तृतीयपंथीयांना ही पेन्शन योजना तहसील कार्यालयाने मंजूर केली. यासाठी संजय गांधी योजनेचे काम पाहणारे राजेंद्र मुंढे तसेच मंडलाधिकारी प्रशांत कोरके, तलाठी महेश गरड यांनीही वेळ काढून सहकार्य केले. तत्पूर्वी निवासी नायब तहसीलदार संजीवन मुंढे यांच्या सहकार्याने तृतीयपंथी मतदान नोंदणी अभियान यशस्वी झाले होते.दरम्यान, बार्शीत प्रथमच तृतीयपंथीयांना संजय गांधी पेन्शन योजनेचा लाभ मिळाला असून त्यांना आता मासिक म नधन सुरु झाले आहे. तृतीयपंथी समुदायाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी वायकुळे यांनी गेल्या आठ वर्षापासून या समुदायासाठी समर्पित काम केले आहे. याचा परिणाम म्हणून आता शासकीय याजनेचे ते लाभार्थी ठरले आहेत.

### तृतीयपंथी समुदायाला मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न

तृतीयपंथी समुदायाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला पाहिजे यासाठी प्रशासकीय अधिकारी म्हणून आपण कर्तव्य पार पाडत आहोत. बार्शीतील तृतीयपंथीयांना संजग गांधी योजनेचा लाभ मिळवून देणे याचाच भाग आहे. हा समुदाय मुख्य प्रवाहात यावा यासाठी यापुढच्या काळातही आपले प्रयत्न असतील.

**- एफ.आर. शेख, तहसीलदार, बार्शी**

### प्रशासनाने दखल घेतल्याने आत्मविश्वास वाढला

तृतीयपंथी समुदाय आजवर अनेक योजनांपासून वंचित राहिला आहे. आम्हाला सामाजिक प्रतिष्ठा मिळावी शासकीय योजनांचा लाभ मिळावा यासाठी आमचे मार्गदर्शक सचिन वायकुळे यांनी सतत पाठपुरावा केला. तहसील कार्यालयाने मोलाचा सहकार्यभाव ठेवला. यानिमित्ताने प्रशासनाने आमची दाखल घेतली. यामुळे आमचा आत्मविश्वास आता वाढला आहे.

**- किरण वघिरे (मस्तानी) तृतीयपंथी, बार्शी**

### तृतीयपंथी यांना सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देण्याचा प्रयत्न

वंचितलेल्या पलीकडे असलेला हा तृतीयपंथी समुदाय आहे. भारतीय संविधानाने या समुदायाला समानतेचा, सन्मानाने जगण्याचा अधिकार दिला आहे. यानुसार या समुदायाला विविध योजनांचे लाभ मिळावे, सामाजिक प्रतिष्ठा मिळावी यासाठी आठ वर्षांपासून समर्पित काम सुरू ठेवले.

**- सचिन वायकुळे, तृतीयपंथी मार्गदर्शक, बार्शी**



# सांगोला विद्यामंदिरचा वर्धापन दिन उत्साहात

**सांगोला, दि. ३ मार्च-**

सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ व सांगोला विद्यामंदिर प्रशालेचा ७३ वा वर्धापनदिन विद्यामंदिर येथे ध्वजारोहण व विविध कार्यक्रमांनी उत्साहात साजरा झाला. प्रारंभी संस्थापक अध्यक्ष कै.गुरुवर्य बापूसाहेब झपके यांच्या तैलचित्रास सेवानिवृत्त शिक्षकेतर कर्मचारी नागनाथ गवाळी, नारायण राऊत, गणपती खडतरे यांचे हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. संस्था सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संस्था अध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, खजिनदार शंकरराव सावंत, संस्था सदस्य चंद्रशेखर अंकलगी, दिगंबर जगताप, विजयसिंह चव्हाण, प्राचार्य अमोल गायकवाड, उपमुख्याध्यापिका शहिदा सय्यद, पर्यवेक्षक प्रदीप धुकटे, मच्छिंद्र इंगोले उपस्थित होते. संस्थापक अध्यक्ष कै.बापूसाहेब झपके व माजी अध्यक्षा कै.बाईसाहेब झपके यांचे अमोघ कार्य व विचार प्रमाण मानत त्याच्या कृतज्ञतापूर्वक स्मरणातून यापुढेही प्रत्येक विद्यार्थ्याला त्यांच्या स्वप्नातील देव विद्यामंदिरच्या रुपाने आदर्श पालक, प्रेमळ व गुणवत्तेचा आग्रह धरणारे शिक्षक आणि उत्तम शाळा म्हणून वेळोवेळी भेटेल, असे मत प्रा. धनाजी चव्हाण यांनी यावेळी व्यक्त केले. कार्यक्रमाचे निवेदन प्रा.डी .के. पाटील यांनी तर सूत्रसंचालन आशुतोष नष्टे यांनी केले. आभार पर्यवेक्षक सुरेश मस्तुद यांनी मानले.

# व्हॉईस ऑफ मिडियाच्या जिल्हाध्यक्षपदी बगले

**सोलापूर, दि. ३ मार्च-**

व्हॉईस ऑफ मिडिया सोलापूर जिल्हा शाखेच्या नवीन कार्यकारिणीची निवड नुकतीच पार पडली. या बैठकीत संघटनेच्या विस्तार आणि बळकटीकरणावर चर्चा झाली. अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष धनराज बगले होते. संघटनेच्या प्रदेशाध्यक्ष हर्षद लोहार यांच्या मार्गदर्शनाखाली या बैठकीत सर्वानुमते कार्यकारिणी गठीत करण्यात आली. जिल्हा उपाध्यक्षपदी तोफिक नदाफ, सचिवपदी बालाजी फुगारे, सहसचिव कार्याध्यक्षपदी पल्लवी पवार, जिल्हा संघटकपदी राजेश भोई, कोषाध्यक्षपदी सत्वाजी कोकणे आणि कार्यकारिणी सदस्य म्हणून मोनिका शिंदे यांची निवड करण्यात आली. सोलापूर शहर कार्यकारणीसाठी अध्यक्षपदी आकाश इंगळे, उपाध्यक्षपदी सचिन राठोड, सहसचिव कार्याध्यक्षपदी भावना मंगलपल्ली आणि दत्तात्रय केरे यांची निवड करण्यात आली. तसेच, दक्षिण सोलापूर अध्यक्षपदी दत्तात्रय संपकाळ आणि उपाध्यक्षपदी आतिफ नदाफ यांची सर्वानुम ते निवड करण्यात आली. वरिष्ठांच्या निर्देशानुसार, सर्व तालुका प्रतिनिधींना लवकरच आपापल्या तालुका शाखेच्या कार्यकारिणी गठीत करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

# सैन्य दलात दाखल झालो हे मोठे यश

## सुभेदार बाबर यांचे प्रतिपादन

### चोपडीत सेवापूर्ती सन्मान सोहळा



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ३ मार्च-**

माझ्या कुटुंबातील आम्हा तीन भावंडांपैकी कोणीतरी देशाच्या सेवेसाठी भारतीय सैन्य दलात दाखल व्हावे ही आई-वडिलांची ईच्छा होती. सैन्य दलात दाखल झाल्यानंतर प्रामाणिकपणे आपले कर्तव्य पार पाडत मोठ्या जिद्दीने देशसेवा करीत उच्चपदापर्यंत पोहोचलो व देश सेवेची १९ वर्षे पूर्ण करीत सेवानिवृत्त झालो, हे माझ्या जीवनातील मोठे यश आहे, असे प्रतिपादन सुभेदार अमोल कृष्णा बाबर यांनी चोपडी येथे सेवापूर्ती सन्मान सोहळ्यात केले.

यावेळी व्यासपीठावर माजी आ. ॲड. शहाजीबापू पाटील, सिंधु बाबर, अनुजा बाबर, माजी सैनिक पांडुरंग शिंदे उपस्थित होते. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले. कवी ज्ञानेश डोंगरे यांनी अमोल बाबर यांच्या सन्मानार्थ सैनिक जीवनावर आधारित स्वरचित कविता सादर केली. उद्योगपती सतीश पाटील यांनी प्रास्ताविक केले. यावेळी भिकाजी बाबर, वाय.एस. बाबर, पतंगराव बाबर, आर. एस. बाबर, रामचंद्र केंगार, आदेश बाबर, माजी सैनिक रविकांत मराळ यांनी मनोगत व्यक्त केले. भाजपाचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत, तालुका अध्यक्ष दुर्योधन हिप्परकर, डॉ. निकिता देशमुख, जय शिवराय कला क्रीडा व सांस्कृतिक मंडळ, भोजलिंग देवस्थान समिती रानमळा, आजी माजी सैनिक संघटना चोपडी, माजी सैनिक कल्याणकारी संस्था सांगोला, जय जवान माजी सैनिक सेवाभावी संस्था सांगोला यांनी अमोल बाबर यांचा सन्मान केला. तसेच प्रा. डॉ. संजय बाबर यांनी शिक्षण क्षेत्रातून स्वेच्छानिवृत्ती घेतली त्याबद्दल यांचाही सन्मान करण्यात आला. सूत्रसंचालन कवी सुनील जवंजाळ, राहुल बाबर यांनी तर आभार गणेश बाबर यांनी मानले.

चोपडी गावाने बुद्धेहाळ तलावाचा टेंभू योजनेत समावेश व्हावा यासाठी केलेली मागणी व घेतलेले परिश्रम त्यामुळे चोपडी गावासह बुद्धेहाळ तलाव लाभक्षेत्रातील गावांना शेतीच्या पाण्याचा लाभ मि ळाला हे खूप महत्वाचे आहे. भविष्यात बुद्धेहाळ तलावाचा तळ दिसू देणार नाही. सुभेदार अमोल बाबर यांनी भविष्यात कौटुंबिक जबाबदारी बरोबर शेती व सामाजिक कार्य अविरतपणे पुढे न्यावे.

**-ॲड. शहाजीबापू पाटील, माजी आमदार**

# बालकांसाठी डॉक्टर हे आईचे दुसरे रूप : आ. आवताडे

## राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत उपक्रम

### ८६९ विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ३ मार्च-**

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य विभागातील तपासणी करणारे डॉक्टर हे लहान बालकांसाठी दुसरे आईचे रूप असल्याचे प्रतिपादन आ. समाधान आवताडे यांनी केले. ते नूतन मराठी विद्यालयात राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत बालकांची आरोग्य तपासणी मोहिमेच्या शुभारंभप्रसंगी बोलत होते.

या मोहिमेअंतर्गत १ ते ३० मार्च या कालावधीमध्ये सर्व शाळा, अंगणवाडीतील ० ते १८ वयोगटातील सर्व बालक,विद्यार्थ्यांची सर्वांगीण आरोग्य तपासणी करण्यात येणार असून विनामूल्य उपचार,संदर्भ सेवा व विनामूल्य शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. आ. समाधान आवताडे यांनी राष्ट्रीय बाल स्वास्थ्य विभागाच्या कामाचे कौतुक करून समाधान व्यक्त केले व राज्य शासनाच्या या उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

यावेळी नगरपालिका पक्षनेते अजित जगताप, गटशिक्षणाधिकारी डॉ.बिभीषण रणदिवे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुलोचना जानकर,तालुका आरोग्य अधिकारी डॉ. भाऊसो जानकर संस्थापक रामचंद्र कुलकर्णी सचिव परशुराम महाकरी मुख्याध्यापिका सुनीता आवताडे, माध्यमिकचे मुख्याध्यापक बंडगर उपस्थित होते. शिबिरामध्ये बालरोगतज्ञ डॉ. आसावरी घोडके, दंतशल्यचिकित्सक डॉ. ऋचा वैद्य,नेत्र चिकित्सा अधिकारी अनिल यादव व तज्ञ डॉक्टर यांचे मार्फत जन्मजात आजार, हृदयरोग, दुभंगलेले ओठ, मौखिक आरोग्य, डोळे, त्वचा आदी विविध तपासण्या करण्यात आल्या. या विद्यालयातील ८६९ विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.त्यातील ४० दृष्टीदोष व इतर आजाराची २४ असे ६४ विद्यार्थ्यांना संदर्भित करण्यात आले. ८३ विद्यार्थ्यांना औषधोपचार देण्यात आला. आबासो नागणे यांनी सम ुपदेशन तर श्रीमती शिंदे यांनी रक्त तपासणी केली. जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ .श्रीकांत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या या शिबिरासाठी राष्ट्रीय बाल स्वास्थ्य विभागाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अनिल चौगुले, डॉ.शिरीष कुलकर्णी, डॉ. प्रवीण माने, डॉ. ऋतुजा गायकवाड, डॉ.स्नेहा गंदगे,ड ॉ. धनश्री केंदुळे,औषध निर्माण अधिकारी रेश्मा सरडे, अविनाश पट्टणशेट्टी,विवेकानंद कसबे,परिचारिका सुनीता सातालोलू, सुरेखा खरात,पूजा,वाहन चालक प्रवीण डांगे आदि अधिकारी कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



## संक्षिप्त वृत्त



### किरण इन्फोटेकला टॅली सोल्युशनचा प्रथम क्रमांकाचा राष्ट्रीय पुरस्कार

**सोलापूर, दि. ३ मार्च-**

टॅली सोल्युशनचा एडब्ल्यूएस, वॉटस्‌अप प्रॉडक्टवर ऑल इंडिया पुरस्कार टॅली सोल्युशनचा पुरस्कार येथील किरण इन्फोटेकला जाहीर झाला आहे. किरण इन्फोटेकचे भागीदार अरविंद पुडुर यांनी हा पुरस्कार बंगलूर येथे स्वीकारला. त्यानिमित्त त्यांचा सत्कार येथील अथर्व सांस्कृतिक व क्रीडा गणेशोत्सव परिवाराकडून करण्यात आला. त्यांचे तरुण भारतचे मुद्रक व प्रकाशक दिलीप दुलंगे व तरूण भारत परिवाराने अभिनंदन केले.



### युनियन प्रायमरी शाळेचे स्नेहसंमेलन

**सोलापूर, दि. ३ मार्च-**

युनियन प्री-प्रायमरी शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. संस्थेचे अध्यक्ष नजीर अजीज शेख यांच्या अध्यक्षतेखाली व केंद्रीय गुतचार विभागच्या अनुजा पाटील, सदर बजार पो स्टेशनच्या पीआय शिवांजली वट्टे, असि. मनमा असि. कमिशनर मनिषा मगर, उर्दू म राठीचे ज्येष्ठ साहित्यिक अय्यूब नल्लामंदू आएशा नजीर शेख, विस्तार अधिकारी दौलतबी शेख, नूर ट्रस्टचे अध्यक्ष नजीर मुन्शी, प्राचार्या नेहा शेख यांच्या प्रमुख उपस्थित दीपप्रज्वलित करण्यात आले. नंतर कुराण पठण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष नजीर अजीज शेख, नर्गिस शेख यांनी सर्व प्रमुख पाहुण्यांचे शाल व पुष्प गुच्छ देऊन स्वागत केले. यानंतर विविध स्पर्धेत यश प्राप्त बालकांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते मेडल, प्रमाण पत्र देऊन सन्मान करण्यात आले. यावेळी लहान चिमुकल्यांनी उर्दू, मराठी, इंग्रजी गीते व विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. सूत्रसंचलन जावीद काजी यांनी केले तर आभार नर्गिस शेख यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अल्ताफ जकलेर, जावीद काजी, जावेद गढवाल, तंजीला चितापुरे, बुशरा जमादार, महेर अफरोज, अफशां इनामदार यांनी परिश्रम घेतले.




### लहुजी शक्ती सेनेच्यावतीने समाजकल्याण आयुक्त सोनवणे यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. ३ मार्च-**

अक्कलकोट तालुक्यातील घरकुल योजनेअंतर्गत एससी समाजातील लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचे सोलापूर समाज कल्याण विभागाच्या नूतन आयुक्त सुलोचना सोनवणे यांनी सांगितले सोलापुर समाज कल्याण आयुक्त पदाचा पदभार सुलोचना सोनवणे यांनी स्विकारत्यानंतर लहुजी शक्ती सेनेच्या वतीने पदाधिकार्यांकडून त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी लहुजी शक्ती सेना पश्चिम महाराष्ट्राचे अध्यक्ष महादेव भोसले, जिल्हाध्यक्ष वसंत देडे, शहराध्यक्ष योगेश सोनवणे, उपाध्यक्ष अजित पवार, परशुराम कांबळे, युवती शहराध्यक्ष शुभांगी गायकवाड, अजय मोहिते उपस्थित होते

# लालपरीचा आता प्रदूषणमुक्त प्रवास!

## ●सोलापुरातील ८ आगारात उभारणार (एल.एन.जी) लिक्विफाईड नॅचरल गॅसपंप

**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**
**सोलापूर, दि. ३ मार्च-**

''एसटीचा प्रवास सुरक्षित प्रवास; यासोबतच आता ''एसटीचा प्रवास हा प्रदूषणमुक्त प्रवास'' म्हणून ओळखला जाणार आहे. त्यासाठी एसटी महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यालयाकडून नवीन प्रोजेक्ट राज्यात राबवला जाणार आहे.

सोलापूर एसटी विभागातील सोलापूर, पंढरपूर, करमाळा, कुर्डूवाडी, अकलूज, सांगोला, मंगळवेढा, अक्कलकोट या आठ आगारातील एसटी महामंडळाच्या जागेवर एल.एन.जी गॅसपंप उभारण्यात येणार आहे. लिक्विफाईड नॅचरल गॅस (एल. एन.जी.) पंप जुना पुना नाका येथील एसटी महामंडळाच्या जागेत उभारण्यात येणार आहे. ही जागा पहिल्यांदा बसपोर्टसाठी राखीव ठेवण्यात आली होती. परंतु सोलापूर बस पोर्ट हा प्रोजेक्ट आता मागे पडला आहे.`. या जागेची पाहणी किंग्ज गॅसपंप आणि एसटीच्या अधिकाऱ्यांनी केली आहे. लवकरच येथे गॅस पंप उभारणीस सुरुवात होणार आहे.यामुळे एसटी बसेसचे आयुर्मान देखील वाढणार




त्यासाठी वरिष्ठ स्तरावर करार संपन्न करण्यात आला असून लवकरच याचे कामकाज सुरू होणार आहे.

गेल्या काही महिन्यांपासून एसटी महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यालयाकडून याबाबत पाठपुरावा सुरू राज्यातील विविध एसटी विभाग आणि आगार येथे सदरचा गॅसपंप उभारण्यात येणार आहे. ज्या पद्धतीने राज्यात कम्प्रेसड नॅचरल गॅस (सी.एन.जी) पंप उभारण्यात आले आहेत. अगदी त्याचप्रमाणे राज्यातील विविध एसटी विभाग आणि आगाराम ध्ये आता त्या पुढचे व्हर्जन म्हणजेच, लिक्वीफाइड नॅचरल गॅस (एल.एन.जी) गॅसपंप कार्यान्वित करण्यात येणार आहेत. यासाठी मुंबईच्या किंग्ज गॅस कंपनीने एस टी महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यालयाशी करार केला असून, लवकरच गॅसपंप उभारण्याच्या कामाची प्रत्यक्षपणे अंमलबजावणी होणार आहे. राज्यातील प्रदूषण कमी करण्यासाठी पेट्रोल व डिझेल इंधनाला पर्याय म्हणून सी.एन.जी कार्यान्वित करण्यात आली होती. राज्यातील अनेक वाहने सी.एन. जी गॅसवर कार्यान्वित आहेत. ज्यामुळे राज्यातील वाढलेले प्रदूषण प्रमाण कमी होत आहे. हीच बाब लक्षात घेता राज्यातील विविध एसटी महामंडळाच्या बसेस मधून निघणारा धूर जो नागरिकांच्या शरीरासाठी अपायकारक ठरत आहे. त्याच पद्धतीने एसटीचे आयुर्मान कमी करत आहे. त्याला पर्याय म्हणून राज्यात आता एसटी महामंडळाकडून नवीन एल.एन.जी प्रोजेक्ट राबवण्यात येत आहे.

या नव्या एल.एन.जीमुळे एसटीचा प्रवास हा प्रदूषणमुक्त प्रवास होणार आहे. त्यासोबतच डिझेलमुळे एसटीचे घटणारे आयुर्मान वाढणार आहे. त्याचा फायदा एसटी बसेसला पर्यायने महामंडळाला होणार आहे. डिझेल ही खर्चिक बाब असल्याने सी.एन.जीमुळे डिझेलवरील अतिरिक्त ताण कमी होणार आहे. मात्र यासाठी एसटीच्या इंजिनमध्ये नक्कीच (मॉडिफिकेशन) बदल करण्यात येणार आहे. गॅसपंपचा प्रस्तावित करार कार्यान्वित झाल्यानंतर एसटी बसेसच्या इंजिनमध्ये बदल करण्यात येणार आहे.

### ●लवकरच गॅसपंप उभारण्याची अंमलबजावणी

नवीन एल.एन.जी गॅसपंप यासाठी मुंबईची किंग गॅस कंपनीच्या अधिकाऱ्यांनी पाहणी केली आहे. लवकरच गॅसपंप उभारण्याची अंमलबजावणी केली जाईल. त्यानुसार एसटीच्या इंजिन मध्ये बदल करण्यात येईल. या नव्या गॅसमुळे एसटीचे वाढणारे प्रदूषण कमी होणार आहे. तसेच बसेसचे आयुर्मान वाढवून गाड्यांना फायदा होणार आहे. डिझेल इंधनावर वाढणारा खर्च यामुळे कमी होणार आहे. मध्यवर्ती कार्यालयाकडून याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

**- अमोल गोंजारी, विभाग नियंत्रक सोलापूर एसटी विभाग**

### ●एसटी आणि किंग्ज गॅस कंपनीचा संयुक्त पाहणी दौरा

एसटी महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यालयाकडून नवीन एलएनजी गॅसपंप उभारण्यासाठी वरिष्ठ स्तरावरून हालचाली सुरू आहेत. गॅसपंप उभारणीसाठी संबंधित कंपनीच्या आणि एसटीच्या अधिकाऱ्यांनी सोलापूर एसटी विभागातील विविध आठ आगारात पाहणी दौरा केला आहे. विविध आठ आगारातील या जागेची पाहणी करून त्याचा आराखडा मध्यवर्ती कार्यालयाकडे सुपूर्द करण्यात आला आहे. या पुढील कार्यवाही मध्यवर्ती कार्यालय आणि कंपनी यांच्या माध्यमातून संपन्न होणार आहे. यासाठी काही काळ जाणार आहे. विविध प्रकारच्या परवाने काढल्यानंतर त्या कामाची प्रत्यक्षपणे अंमलबजावणी होणार आहे.

# देशाला भविष्याच्या उज्ज्वल वाटचालीचा विश्वास

**आ. कल्याणशेट्टी** यंग माईंडस अँड मशिन्स एक्सपो २०२५चे पारितोषिक वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मार्च -**

सोलापूर शहरातील विज्ञान प्रदर्शनात नव्या पिढीतील विद्यार्थ्यांमध्ये असलेली जिज्ञासा आणि नवकल्पनांचा शोध घेण्याची धडपड पाहून भविष्याच्या उज्ज्वल वाटचालीचा विश्वास वाटतो, असे प्रतिपादन भाजपा जिल्हाध्यक्ष आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी केले.

राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त भाजपा अभियंता सेल व भाजपा पदवीधर प्रकोष्ठतर्फे स्वामी विवेकानंद अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजित विज्ञान प्रदर्शनाचे पारितोषिक वितरण अक्कलकोटचे आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते झाले.

याप्रसंगी व्यासपीठावर स्वेरी शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. बी. पी. रोंगे, मराठी विज्ञान परिषद, छत्रपती संभाजीनगरचे अध्यक्ष डॉ. रंजन गर्गे, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुण्याचे सहसंचालक डॉ. किरण कुलकर्णी, डॉ. व्यंकटेश गंभीर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे राज्यपाल नियुक्त सिनेट सदस्य रोहिणी तडवळकर, सुरज म्हस्के, भाजपा सोलापूर जिल्हा सरचिटणीस सुरेखा होळीकट्टी, ग्लोबल व्हिलेज शिक्षण संकुलाच्या सचिवा संगिता शहा, जिल्हा परिषदेचे वरिष्ठ अभियंता राजेश जगताप, प्राचार्या कीर्ती भोसले उपस्थित होते. प्रा.अनिकेत चनशेट्टी म्हणाले, या विज्ञाननिष्ठ उपक्रमात शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे



लक्षणे सहभाग ही कौतुकास्पद बाब आहे. भविष्यात येथूनच देशाला मार्गदर्शक शास्त्रज्ञ घडतील. या विद्यार्थ्यांकरिता वर्षभर विविध स्पर्धांचे आयोजन करून जगाशी स्पर्धा करण्यासाठी त्यांना सज्ज करूया, असे आवाहन त्यांनी केले.

या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून अवो ऑटोमेशन सॉफ्टवेअर कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक सुमित कुदळ, बी. एफ. दमाणी प्रशालेचे माजी मुख्याध्यापिका ज्योत्स्ना मळेकर, हरिभाई देवकरण प्रशालेचे पर्यवेक्षक डॉ. शहाणे, सॉफ्टवेअर कंपनीचे टीम लीडर राकेश रामपूर यांनी काम पाहिले. पश्चिम महाराष्ट्र सहसंयोजक सुरज रोंगे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. संतोष पवार व डॉ.यशपाल खेडकर यांनी यांनी सूत्रसंचालन तर प्रा. अनिकेत चनशेट्टी यांनी आभार प्रदर्शन केले.

### स्पर्धेचा निकाल याप्रमाणे : (प्रथम तीन)

इ. ५ वी ते ७ वी : समर्थ विद्यामंदिर, ग्लोबल व्हिलेज पब्लिक स्कूल, बोरामणी, बसवेश्वर विद्यालय, विडी घरकुल.इ. ८ वी ते १0वी : इंडियन मॉडेल स्कूल, हर्षवर्धन प्रशाला, ग्लोबल व्हिलेज पब्लिक स्कूल, बोरामणी. इ. ११ वी ते १२ वी : निर्मलाताई ठोकळ प्रशाला, नालंदा कॉलेज ऑफ सायन्स, निर्मलाताई ठोकळ प्रशाला.

### ७४ शाळांमधून १६८ प्रकल्प सहभागी

भारतीय अभियंता सेल व पदवीधर प्रकोष्ठ, सोलापूर यांच्यावतीने घेण्यात आलेल्या या पहिल्याच उपक्रमासाठी सोलापूर जिल्ह्यातून उदंड प्रतिसाद मिळाला. या प्रदर्शनात सोलापूर जिल्ह्यातील ७४ शाळांमधून १६८ प्रकल्प सहभागी झाले होते. ज्यामध्ये होम ऑटोमेशन, ड्रोन, ऑब्जेक्ट ट्रॅकिंग वेहिकल, वेस्ट मॅनेजमेंट, स्मार्ट ॲग्रीकल्चर, डाँसिन्ग रोबोट, ३ प्रिंटर अशा अनेक आधुनिक विषयांनी सजलेले प्रकल्पांवरती बोलताना विद्यार्थी जणू अभियांत्रिकी महाविद्यालयात शिकणारे असल्याचे वाटत असल्याची भावना भाजपा पदवीधर प्रकोष्ठचे पश्चिम महाराष्ट्र सहसंयोजक सुरज रोंगे यांनी व्यक्त केली.

**▸ १२ वर्षांच्या मुलानं बनविली**

# सौर ऊर्जा आणि बॅटरीवर चालणारी सायकल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मार्च -**

पेट्रोल आणि डिझेलची दरवाढ झाली असतानाच अनेकजण स्वस्तातलं पर्यायी इंधन म्हणून सौर ऊर्जेकडं पाहत आहेत. तसेच इलेक्ट्रिक वाहनांचीही निर्मिती होतेय. परंतु, सोलापूरच्या एका १२ वर्षांच्या चिमुकल्यानं सोलार सायकल बनवलीये. अब्दुल्ला इम्रान मंगलगिरी असे या चिमुकल्याचे नाव असून फक्त ९ हजारांत त्यानं ही सायकल तयार केलीये. विशेष म्हणजे सौर ऊर्जेवर आणि बॅटरीवर चालणारी ही सायकल बॅटरी संपल्यावर पॅडल वापरून देखील चालवता येतेय.

अब्दुल्ला इम्रान मंगलगिरी हा १२ वर्षीय विद्यार्थी सोलापुरातील पानगल शाळेत शिक्षण घेतोय. म दिना चौकात राहणाऱ्या अब्दुल्लाला वेगवेगळे प्रयोग करण्याची आवड आहे. यातूनच त्याने सायकल आणि काही जुने साहित्य गोळा करून सोलार सायकल बनवलीये. ही सायकल बनवण्यासाठी त्याला ६ महिन्यांचा वेळ आणि ९ हजार रुपयांपर्यंत खर्च आला आहे. परंतु, त्याचा हा प्रयोग यशस्वी झाला असून त्याचे सर्वत्र कौतुक होतेय. दरम्यान, अब्दुल्ला याने अनेक चाचण्या घेतल्यानंतर ही ई-सायकल बनविली आहे. सायकलच्या हँडलजवळ सौरपॅनेल बसविले असून मधल्या पाइपजवळ त्याने बॅटरी बसविली आहे. बॅटरी पूर्णपणे चार्ज करण्यासाठी ही सायकल ५ ते ६ तास पूर्ण सूर्यप्रकाशात ठेवावी लागते. त्यानंतर ती कोणत्याही अडथळ्यांशिवाय चालते. एवढेच नव्हे तर सूर्यप्रकाश नसतानाही ती इलेक्ट्रिक सॉकेटच्या माध्यमातून चार्ज करता येते.



### सोलार सायकल का खास?

सायकलच्या हँडलवर बसवलेल्या सौरपॅनेलच्या माध्यमातून बॅटरी चार्ज केली जाते. एवढेच नाही तर सायकलमध्ये डिजिटल स्पीडोमीटर, सेंट्रल लॉक सिस्टम, जीपीएस ट्रॅकिंग, व्हॉईस कंट्रोल आणि नेव्हिगेशनसारखी वैशिष्ट्ये देखील जोडण्यात आली आहेत. ही सायकल बॅटरीवर २५ किमी आणि संपूर्ण दिवस सौरऊर्जेवर चालू शकते. विशेष म्हणजे त्याने ही संपूर्ण सायकल फक्त ९ हजार रुपयांत तयार केलीये.

# विज्ञान, तंत्रज्ञानाच्या वापराने शेतीत प्रगती करा

## पद्मश्री डॉ. शिवराम भोजे यांचा सल्ला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ मार्च -**

शेती हा गावांचा कणा आहे. भारतातील सुमारे ५0% लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. शेतकरी मशागतीसाठी यंत्रे वापरत नाहीत, त्यामुळे जमिनीचे प्रति युनिट उत्पादनही कमी आहे. त्यामुळे शेतीत विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या वापराने प्रचंड प्रगती करावी लागेल, असा सल्ला पद्मश्री डॉ.शिवराम भोजे यांनी व्यक्त केली.

पद्मश्री डॉ. भोजे हे इंदिरा गांधी अणु संशोधन केंद्र (तमिळनाडू) माजी संचालक आहेत. सिंहगड संस्थेच्या पुढाकाराने सोलापुरात प्रथमच विकसित भारताच्या स्वप्नपूर्तीसाठी ३ ते ५ मार्च असे तीन दिवसीय राष्ट्रीय स्तरावर मल्टिमेगा कार्यक्रम एनबी नवले सिंहगड इन्स्टिट्यूटमध्ये पार पडत आहे. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन दृकश्राव्य माध्यमातून पद्मश्री भोजे यांच्या हस्ते झाले. यावेळी सिंहगडचे कॅम्पसचे डायरेक्टर संजय नवले, सिंहगड सीआरटीडीचे संशोधक संचालक डॉ. एस. एच. पवार, प्राचार्य डॉ. शंकर नवले, डॉ. राजीव जोशी (कर्नाटक केंद्रीय विद्यापीठ, गुलबर्गा) एनआरसीपीचे संचालक डॉ. राजीव मराठे, एनआरसीपीचे वरिष्ठ वैज्ञानिक डॉ. नीलेश गायकवाड, सोलापूर विद्यापीठाचे डॉ. बी. जे. लोखंडे, सिंहगडचे उपप्राचार्य डॉ. शेखर जगदे, डॉ. रवींद्र व्यवहारे यांची उपस्थिती होती. राजीव गांधी सायन्स अँड टेक्नॉलॉजी कौन्सिल प्रकल्पाचा शुभारंभ कॅम्पस डायरेक्टर नवले यांच्या हस्ते झाला. मान्यवरांच्या हस्ते स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. सेव्ह एनर्जी, सेव्ह लाईफच्या घोषणा देत विद्यार्थ्यांनी प्रभात फेरी काढली. पद्मश्री भोजे यांनी शेतीत खते आणि कीटकनाशकांचा जास्त वापर चिंता व्यक्त केली.

यावेळी डॉ. राजीव मराठे म्हणाले, २०४७ मध्ये विकसित भारताच्या स्वप्नपूर्तीसाठी युवा, गरीब, महिला व शेतकरी या चार महत्त्वपूर्ण स्तंभाच्या भागीदारी आणि विकासावर लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे. तरूणांना शेती क्षेत्रात विपुल संधी आहेत. त्यांनी वैज्ञानिक शेतीची कास धरुन कृषी आधारित उद्योग केले पाहिजेत. शेतात वापरल्या जाणाऱ्या रासायनिक खतांच्या भडिमारावर चिंता व्यक्त केली.

सूत्रसंचालन प्रा. शशीकांत हिप्परगी यांनी तर आभार एनआरसीपीचे वरिष्ठ वैज्ञानिक डॉ. नीलेश गायकवाड यांनी आभार मानले. राष्ट्रगीतने पहिल्या सत्राच्या समारोप झाला.



### तीन दिवसांत काय होणार :

या तीन दिवसीय कार्यक्रमात विविध विषयांवर तज्ज्ञांची व्याख्याने, शोध प्रबंधाचे सादरीकरण, विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा, प्रश्न मंजुषा, विज्ञान प्रदर्शन, संशोधकांशी थेट संवाद, शेतकऱ्यांसाठी कार्यशाळा व नव उद्योजकांसाठी मार्गदर्शन असे भरगच्च कार्यक्रम होत आहेत. विद्यार्थी, शिक्षक, संशोधक व शेतकऱ्यांना उपस्थित राहण्याचे आवाहन सोलापूर येथील सिंहगड संस्थेच्या वतीने करण्यात येत आहे. छत्रपती शिवाजी विद्यापीठाची रेशीम उद्योगाची फिरती प्रयोगशाळा ही विद्यार्थ्यांसाठी आकर्षण राहत आहे.






# पी. एन. गाडगीळ आणि सन्स आता ठाण्यात; सुवर्ण परंपरेचा नवा अध्याय

**ठाणे, दि. ३ मार्च-**

सोन्या, चांदीच्या व्यवसायातील प्रतिष्ठित आणि विश्वसनीय नाव पी. एन. गाडगीळ आणि सन्स यांनी ठाणेकर ग्राहकांसाठी भव्य दालनाचे उद्घाटन केले.

श्रुष्टि प्राईम, गोखले रोड, ठाणे येथे या नव्या दालनाचे उद्घाटन पी. एन. गाडगीळ आणि सन्स चे प्रवर्तक आणि संचालक अजित गाडगीळ यांच्या हस्ते करण्यात आले. ते म्हणाले ''ठाणेकर ग्राहक आमच्यासाठी नेहमीच खास राहिले आहेत. ठाण्यात दालन सुरू करण्याबाबत सतत विचारणा होत होती. आम्ही गेल्या अनेक वर्षांपासून आम्हाला ग्राहकांच्या विश्वासाला प्राधान्य देतो आणि त्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा नेहमीच प्रयत्न करतो. पी. एन. गाडगीळ आणि सन्स हे केवळ दागिन्यांचे ब्रँड नसून, विश्वास आणि गुणवत्तेचे प्रतीक आहे. या नव्या दालनाच्या माध्यमातून ठाणेकरांना आमच्या उत्तम ग्राहकसेवेचा, उत्कृष्ट दागिन्यांचा आणि पारदर्शक व्यापार नीतीचा अनुभव मिळेल, याचा आम्हाला आनंद आहे. ठाणेकरांनी या सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा आणि नव्या दालनास भेट द्यावी.''

### ग्राहकांसाठी ९ मार्चपर्यंत ऑफर्स

- सोन्या दागिन्यांच्या घडणावळीवर फ्लॅट २०% सूट
- हिऱ्याच्या दागिन्यांच्या घडणावळीवर फ्लॅट ५०% सूट
- १००% शुद्धता आणि प्रमाणित दागिने
- व्यक्तिगत आणि उच्च दर्जाची ग्राहक सेवा
- अद्वितीय आणि नवनवीन दागिन्यांचा भव्य संग्रह
- पत्ताः श्रुष्टी प्राईम, गोखले रोड, ठाणे.
- संकेतस्थळः : www.pngadgilandsons.com
- संपर्कः शिवराज कणसे ८९५६४१८३३८

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर : शासकीय कार्यालयापरिसरातील कोषागार कार्यालयासमोर पडलेला कचऱ्याचा ढीगाकडे महापालिकेचे दुर्लक्ष होत आहे.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## संक्षिप्त वृत्त...



### जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण, दहा जणांविरूद्ध गुन्हा

**सोलापूर, दि. ३ मार्च -**

कुमठा नाका परिसरातील महाराणा प्रताप झोपडपट्टीत घरासमोरील कट्ट्यावर बसलेल्या तरुणास जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण केली . याप्रकरणी सात जणांविरूद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. ही मारहाण १ मार्च रोजी रात्री ९.३० वाजता झाली.याबाबत अविनाश सौदागर गायकवाड (वय २९ रा. महाराणा प्रताप झोपडपट्टी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शुभम कैय्यावाले व त्याचे दोन भाऊ (नाव नाही), अजय चौधरी, आकाश धोत्रे, पवन कैय्यावाले, शितल चौधरी, तम्मा इस्त्रीवाला, विश्वजीत कैय्यावाले व अन्य (सर्व रा. महाराणा प्रताप झोपडपट्टी) अशा १० जणांविरूद्ध अनुसुचित जाती जमाती कायदा कलमा प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे.यातील फिर्यादी घरासमोरील कट्ट्यावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त चर्चा करीत होता. त्यावेळी घराच्या परिसरात राहणारे सातजण हातामध्ये हॉकीस्टीक, काठी घेऊन तेथे आले. काहीही न बोलता जातीवाचक शिवीगाळ करून, हॉकीस्टीकने मारून व दगड फेकून जखमी केले .या गुन्ह्याचा तपास सहायक पोलीस आयुक्त यशवंत गवारी करीत आहेत.

### घरासमोर गर्दी केल्यामुळे महिलेसह तिघांना मारहाण

**सोलापूर, दि. ३ मार्च -**

घरासमोर गर्दी केलेल्या कारणातून महिलेसह तिघांना मारहाण करण्यात आली. हा प्रकार कुमठा नाका परिसरात घडला. याप्रकरणी चौघांवर विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार एक मार्च रोजी रात्री नऊ वाजता घडला. याबाबत शांताबाई सदाशिव प्रक्षाळे (वय ४२ रा. महाराणा प्रताप झोपडपट्टी, कुमठा नाका) यांनी फिर्याद दिली आहे. त्यावरून सुरज जेटीथोर, अविनाश गायकवाड, उमेश जेटीथोर, सिध्दार्थ जेटीथोर (सर्व रा. कुमठा नाका, सोलापूर) या चौघांवर गुन्हा दाखल झाला यातील आरोपींनी महिलेस दमदाटी केली . त्यानंतर लाकडी दांडक्याने मारहाण केली. तर एकाने हातातील लोखंडी कुऱ्हाडीने एकास पाठीत व हातावर मारून जखमी केले. दरम्यान धीरस शिवशरण हा भांडण सोडविण्यासाठी आला होता . त्यालाही लोखंडी कोयत्याने व दुसऱ्याने लोखंड पाईपने मारून जखमी केले. दरम्यान महिला समजावून सांगण्याचा प्रयत्न करत असताना एकाने शिवीगाळ करीत जातीवाचक गुन्हा दाखल करतो अशी धमकी दिली. तपास हवालदार गायकवाड करीत आहेत.

### दुसऱ्या मंडळाच्या मिटींगला गेल्यामुळे कोयत्याने वार

**सोलापूर, दि. ३ मार्च -**

जयंती मंडळाच्या मीटिंगला न दुसऱ्या मंडळाच्या मीटिंगला गेल्याचा राग मनात धरून एकावर कोयत्याने वार करून दुसऱ्याला मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिल्याची घटना कुमठा नाका परिसरात घडली असून या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दर्शन अच्युत भोसले (वय २९, रा. भारत नगर कुमठा नाका, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आप्पा कांबळे, शेखर सुरेकर, अभिषेक रोहिटे, एक अज्ञात इसम (रा. तक्षशिल नगर, सोलापूर) यांच्या विरोधात सदर बजार



पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी व फिर्यादीचा भाऊ रोहित असे दोघे फिर्यादीचा चहाचा गाडा बंद करून घरी येत असताना क्रीडा संकुलच्या गेट समोर फिर्यादीचे घर जवळ राहणारे यातील आरोपीने यांनी फिर्यादीस पाहून ''याला लय मस्ती आली आहे, पुण्यावरून येथे करून खायला आला आहे, आमच्या मंडळाची मिटींग सोडून तु रावण साम्राज्याच्या मिटींगला का गेला'' असे म्हणून आरोपी अप्पा कांबळे याने त्याचे हातातील कोयत्याने फिर्यादीचे डावे हाताचे कोपऱ्यावर व पाठीवर मारून जखमी केले. ''आज तू वाचला, तुला उदया खल्लास करतो'' अशी दमदाटी केली आहे तसेच फिर्यादीचे भाऊ भांडण सोडविण्यासाठी मध्ये आले असता त्यांना देखील शिवीगाळ दमदाटी केली. तपास फौजदार बनकर हे करीत आहेत.

# साडेपाच हजार शेतकऱ्यांचे १६ कोटींचे अनुदान थकीत!

## जिल्ह्यात 'ठिबक सिंचन'कडे दुर्लक्ष

**तभा वृत्तसेवा/ अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. ३ मार्च-**

जमिनीत वाफसा स्थिती कायम राहत असल्याने पिकाची वाढ जोमदार आणि सतत व्हावी, पिकाला रोजच अगर दिवसाआड अथवा गरजेनुसार पाणी दिले जाते आणि मुळाच्या कार्यक्षेत्रात पाणी, माती, हवा यांचा नेहमी समन्वय साधला जातो यासाठी ठिबक सिंचन योजना कार्यान्वित करण्यात येत असून, यातून पाण्याचीही मोठ्या प्रमाणात बचत होत असल्याने शेतकरी बांधवांचा सध्या ठिबक सिंचनाकडे मोठा कल आहे. मात्र सोलापूर जिल्ह्यातील ५ हजार ५४६ शेतकऱ्यांचे तब्बल १६ कोटी २६ लाख ३४ हजार ६७१ रूपये अनुदानच शासनाकडून येत नसल्याने शेतकरी बांधवांतून नाराजीचा सूर निघत आहे.

या ठिबक प्रणालीतून पाणी कमीत कमी वेगाने दिले जाते. त्यामुळे ते मुळाच्या सभोवती जिरते. ठिबक सिंचनाच्या या गुणामुळे पिके चांगली जोमाने वाढतात व दर्जेदार पीक उत्पादन मिळते. ठिबक सिंचनाने गरजेनुसार पाणी दिल्याने झाडांच्या हरितद्रव्य तयार करण्याच्या क्रियेत खंड पडत नाही. त्यामुळे त्यांची वाढ जलद आणि जोमाने होते. पर्यायाने उत्पादन वाढते. उत्पादनात २० ते २००% पर्यंत वाढ होते. ठिबकने ३० ते ८०% पाण्यात बचत होते. या बचत झालेल्या पाण्याचा दुसऱ्या क्षेत्रात वापर करता येतो. कमी अगर जास्त पाण्याचा ताण सोसावा लागत नाही; इतकेच नाहीतर दिवस-रात्र कधीही पिकांना पाणी देता येते. यामुळे पिकेही लवकर काढणीला येतात. त्यामुळे दुबार पिकाला फायद्याचे ठरते. सध्या ऊस पिकासाठीही ठिबकचाच आग्रह कृषी अधिकारी करू लागले आहेत मात्र अनुदान वेळेत येत नसल्याने शेतकरी बांधवांतून तीव्र नाराजी पसरत आहे.



### ठिबक सिंचनाची काय असते पध्दत?

ठिबक सिंचन म्हणजे पिकांच्या झाडाच्या मुळाशी लहानशा नळीद्वारे थेंबथेंब किंवा बारीक धारेने पाणी देण्याची आधुनिक पद्धत आहे. ही वापरताना जमिनीचा दर्जा, पिकांची जात, पिकांचे स्वरूप, बाष्पीभवनाचे प्रमाण लक्षात घेऊन नंतर त्यांच्या गरजेनुसार पॉलिथीनच्या नळ्यांचे जाळे पसरतात. पृष्ठभागावरील पद्धत, पृष्ठभागांतर्गत पद्धत, मायक्रो स्प्रिंकलर्स आणि मायक्रो जेट्स असे ठिबक सिंचनाचे मुख्यतः तीन प्रकार पडतात.पृष्ठभागावरील ठिबक सिंचनात सूक्ष्म नलिका, दाब नियंत्रण असणाऱ्या वा नसणाऱ्या तोट्या (ड्रिपर्स) असतात. लॅटरलचे आत दाब नियंत्रण ड्रिपर्स पद्धतीची (इनलाईन) गरज असते. पृष्ठभागांतर्गत पद्धतीत बायवॉल, टर्बोटेप, टायक्रुन, क्विनगील व पोटस पाईप या पद्धतींचा समावेश होतो. ठिबक सिंचन पद्धतीत मोटार व पंपसेट, मुख्य वाहिनी, उपवाहिनी, गाळण्या, नियंत्रण झडपा, ड्रिपर, लॅटरल, खत सयंत्र इत्यादी घटक असतात.

### जिल्ह्यातील तालुकानिहाय थकलेले ठिबक अनुदान

ठिबक सिंचनात महाराष्ट्र अग्रेसर असून, संपूर्ण भारताच्या ६० टक्के ठिबक सिंचन एकट्या महाराष्ट्रात केले आहे. सोलापूर जिल्ह्यातही बहुतांश बागायदार शेतकरी आपल्या फळबागा, भाजीपाला, पिकांना स्प्रिंकलर, ठिबक सिंचनाद्वारे पाणी देतात. अनुदान थकलेल्यांमध्ये अक्कलकोट तालुक्याचे ७९ शेतकऱ्यांचे २७ लाख ४३,१२४ रूपये इतके अनुदान थकले आहे. तर बार्शी १ हजार ८१७ शेतकरी- ३ कोटी २५ लाख १५ हजार ९३६ थकीत, करमाळा ६४० शेतकरी-३ कोटी २९ लाख ३२ हजार २२८, माढा ७२३ शेतकरी-२ कोटी ५७ लाख ८ हजार ९६५, माळशिरस ४२४ शेतकरी-१ कोटी ५२ लाख ९४ हजार ३८७, मंगळवेढा १०१ शेतकरी-२६ लाख ९७ हजार ३५०, मोहोळ २६८ शेतकरी-१ कोटी ३ लाख २५ हजार ३००, पंढरपूर ४१२ शेतकरी-१ कोटी ४१ लाख २९ हजार ३६२, सांगोला ३७९ शेतकरी-८३ लाख ९१ हजार ४७, उत्तर सोलापूर ४०६ शेतकरी-८१ लाख ५६ हजार ४४, दक्षिण सोलापूर २९७ शेतकरी-९७ लाख ४० हजार ९२८ असे एकूण १६ कोटी २६ लाख ३४ हजार ६७१ रूपयांचे अनुदान रखडले आहे.

### २३ कोटी ४१ लाखाची होती जिल्ह्याची मागणी

ठिबक सिंचन पध्दत सुरू करण्यापूर्वी शेतकरीदादांना सबंधित कृषी अधिकाऱ्यांकडून योग्य ते मार्गदर्शन दिले जाते. पाणी बचतीचे महत्व सांगितले जाते. शेतकऱ्यांनीही त्यांच्या जमिनीत कमी पाण्यात जास्त उत्पन्न निघू लागल्याने ठिबकला मोठ्या प्रमाणात प्राधान्य दिले आहे. सोलापूर जिल्ह्यातील तब्बल ७ हजार ६२६ नवीन शेतकऱ्यांनी आपल्या शेतात ठिबक सिंचन योजना राबविली. या शेतकऱ्यांसाठी कृषी विभागाकडून शासनाकडे २३ कोटी ४१ लाखाचे अनुदान मागणी केली होती. यातील अवघ्या २ हजार ८० शेतकऱ्यांना अनुदान मिळाले आहे. तर उर्वरित ५ हजार ५४६ शेतकऱ्यांचे १६ कोटी २६ लाख ३४ हजार ६७१ रूपये अनुदान थकीत आहे.

# सांगोल्यात टेंभू, म्हैसाळ योजनेचे आवर्तन सुरू

**शेतकऱ्यांना दिलासा** | भाजपाचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांच्या मागणीची दखल

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.३ मार्च-**

टेंभू व म्हैसाळ योजनेचे आवर्तन सुरू करण्यात आल्याने रब्बी हंगामातील पिकांना जीवदान मिळणार आहे. टेंभू योजनेचे पाणी बुद्धेहाळ तलावात सोडून पूर्ण क्षमतेने भरून घेण्यात येणार आहे. त्यानंतर टेंभूचे पाणी माण नदीत सोडून बलवडी ते मेथवडे पर्यंतचे सर्व बंधारे पूर्ण क्षमतेने भरून देण्यात येणार आहेत. टेंभू योजनेच्या रुपाने माणगंगेच्या मदतीला कृष्णामाईच धावून आल्याने सांगोल्यातील जनतेला, शेतकऱ्यांना दिलासा मिळणार असल्याचे भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी सांगितले.

सध्या सांगोला तालुक्यात विहिरी व कूपनलिकांची पाणी पातळी खालावली आहे. नदी, तलाव, बंधारे, ओढे, नाले कोरडे पडण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे शेतकरी चांगलेच धास्तावले आहेत. पाणी प्रश्न मार्गी लावण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली जात आहे. काही ठिकाणी पाण्याअभावी पिके वाळून जाण्याचा धोका निर्माण झाला आहे. स्व.बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजनेच्या शुभारंभाच्या उद्घाटनासाठी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, पालकमंत्री जयकुमार गोरे आणि माजी खा. रणजीतसिंह निंबाळकर हे चिकमहूद येथे आले होते. त्यावेळी चेतनसिंह केदार सावंत यांनी त्यांची भेट घेऊन तालुक्यातील पिकांना जीवदान देण्यासाठी टेंभू, म्हैसाळ योजनेचे आवर्तन सुरू करून माण व कोरडा नदीवरील सर्व बंधारे भरून देण्याची मागणी केली होती. या मागणीची दखल घेत ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी तत्काळ पाणी सोडण्याच्या सूचना जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या होत्या. टेंभू, म्हैसाळ योजनेचे आवर्तन सुरू झाल्याने शेतकरी सुखावला आहे.



टेंभूचे पाणी माण नदीत सोडण्यात येणार असल्याने बलवडी, वझरे, नाझरे, चिणके, अनकढाळ, वाटंबरे, कमलापूर, वासुद, अकोला, कडलास, वाढेगाव, बामणी, सावे, मांजरी, देवळे, मेथवडे या गावांसह अन्य १५ ते २० गावांना फायदा होणार असून या पाण्यामुळे सिंचनाचा प्रश्न सुटणार आहे.

**-चेतनसिंह केदार सावंत, जिल्हाध्यक्ष, भाजपा**

# शाळांची वेळे बदलण्याबाबत आज निर्णय?

## सीईओंच्या निर्णयाकडे लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मार्च,**

फेब्रुवारी महिन्याच्या सुरूवातीपासून ऊन्हाचा पारा ३० अंशाच्या वर गेल्याने दुपारच्या सत्रातील शाळांची वेळ बदलण्यात यावे , अशी मागणी पालक व शिक्षक वर्गातून होत आहे. ऊन्हामुळे विद्यार्थी व शिक्षकांना उकाडा सहन करावे लागत असल्याने अध्यापनात व्यत्यय येत आहे. म्हणून विविध शिक्षक संघटना शाळा सकाळच्या सत्रात भरविण्याची मागणी करीत आहेत. शिक्षण समितीच्या बैठकीत याबाबत निर्णय घेणार असल्याचे शिक्षणअधिकारी कादर शेख यांनी सांगितले आहे. त्यामुळे आज मंगळवारी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या उपस्थितीत शिक्षण समितीच्या होणाऱ्या बैठकीकडे जिल्ह्यातील शिक्षकांचे लक्ष लागले आहे. आज मंगळवारी ४ फेब्रुवारी रोजी सीईओ कुलदीप जंगम यांनी बैठक आयोजित केली आहे. त्या बैठकीत सकाळच्या सत्रात शाळा केव्हापासून सुरू होणार ? याचा निर्णय होणार आहे. या निर्णयाकडे जिल्ह्यातील शिक्षकांचे लक्ष लागले आहे.

जिल्ह्यात उन्हाचा तडाका वाढत आहे. पाण्याची टंचाई भासत आहे. अनेक शाळा वाडया वस्त्यावर व पाणीटंचाई असणाऱ्या भागात असल्याने त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्राथमिक शिक्षण विभागाने सकाळच्या सत्रात शाळा भरविण्याचा निर्णय जिल्हा परिषदेचे सीईओ कुलदीप जंगम हे घेणार आहेत. त्याविषयी पुढील आठवड्यात बैठक होणार आहे.



ऊन वाढल्याने तसेच अनेक शाळांमध्ये पाणीटंचाई जाणवत असल्याने राज्यातील अनेक जिल्ह्यातील शाळा एक मार्चपासून सकाळच्या सत्रात सुरू होत आहेत. जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या सर्व शाळा सकाळच्या सत्रात सुरू व्हावेत.

**- राजू राठोड, शिक्षक, मंद्रुप**

# ई-केवायसीकडे दुर्लक्ष कराल तर धान्यास मुकाल!

- जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांचा इशारा
- 'मेरा ई-केवायसी' ॲपद्वारे घरच्या घरी करा ई-केवायसी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मार्च-**

राज्यात रेशनकार्ड धारकांना लवकर ई-केवायसी करण्यासाठी केंद्र सरकारने 'मेरा ई-केवायसी ॲप' सुरू केले आहे. हा ॲप मोबाईलमध्ये डाऊनलोड केल्यावर त्यात कुटुंबातील शिधापत्रिका क्रमांक टाकल्यास ओटीपी येणार आहे. यानंतर पुढील ई-केवायसी प्रक्रिया करून घ्यावी. म्हणजेच या ॲपवरून रास्त भाव धान्य दुकानाच्या कार्डधारकांना आता घरबसल्या ई-केवायसी करता येणार आहे.

दरम्यान, आगामी आठवड्यापर्यंत सर्वांनी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण पाडावी, अन्यथा



याकडे दुर्लक्ष केल्यास धान्य मिळणार नाही, असा सुचना वजा इशारा जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी दिला आहे.

राशन कार्डसाठी ई-केवायसी शासनाने मागील सहा महिन्यांपासून सुरू केली आहे. मध्यंतरी सर्व्हर डाऊनच्या अडचणीमुळे या मोहिमेला गती येत नव्हती. यामुळे शासनाच्यावतीने वरचेवर मुदतवाढ देण्यात आली. मागील मुदतीनंतर २८ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. तरीही अजून या आठवड्यात कार्डधारकांनी ई-केवायसी पूर्ण करून घ्यावी. अनेक कार्डधारकांचे अंगठे ई-पॉस मशीनवर स्कॅन होत नव्हते; यामुळे आता या राशन कार्डधारकांचे ई-पॉस मशीनवर डोळे स्कॅन करून ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करता येत आहे. यामुळे ज्या-त्या भागातील नागरिकांनी आपल्या जवळच्या राशन दुकानात जावून तत्काळ ई-केवायसी करावी.

आता शासनाकडून वाढविण्यात आलेली ही शेवटची मुदत असणार आहे. त्यानंतर ई-केवायसी करण्यात येणार नाही, असाही इशारा सरडे यांनी दिला आहे. आतापर्यंत सोलापूर जिल्ह्यातील पंचवीस टक्के नागरिकांची ई-केवायसी अपूर्ण आहे. ज्या कार्डधारकांचे ई-केवायसी पूर्ण झाले नाही. त्यांचे रेशन बंद होणार असल्याचा इशाराही जिल्हा पुरवठा अधिकारी सरडे यांनी दिला आहे.

### दुकानात जाता नाही आले तर घरी ई-केवायसी करा

स्वस्त धान्य दुकानात जावून ई-केवायसी करायला आपल्याकडे वेळ नसेल तर आपल्या घरीच आता ई-केवायसी करता येणार आहे. केंद्र सरकारच्या वतीने 'मेरा ई-केवायसी' ॲप सुरू करण्यात आला आहे. हा ॲप डाऊनलोड करून घ्यायचा आहे. तो डाऊनलोड केल्यानंतर कार्डधारकांनी स्वतःचे आधार क्रमांक त्यामध्ये लिहायचे आहेत. त्यानंतर रेशनकार्डला जोडलेल्या मोबाईलचा क्रमांक टाकायचा आणि आपल्याला घरात बसूनही ई-केवायसी करता येते. यामुळे कार्डधारकांनी या प्रक्रियेत सक्रीय होवून आपली ई-केवायसी करून घ्यावी.

**- संतोष सरडे, जिल्हा पुरवठा अधिकारी, सोलापूर**

रमजान विशेष

# रमजाननिमित्त सजली खाऊगल्ली

- दररोज सुमारे ७५ क्विंटल खजुराची होतेय मागणी; फरदसह विविध इराणी वाणास अधिक पसंती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ मार्च-**

मुस्लिम धर्मियांचा प्रमुख सण रमजाननिमित्त शहरात खजुराला मागणी वाढली आहे. एकाच दिवशी सुमारे ७५ क्विंटल खजूर विकला गेला. यात प्रामुख्याने आखातील देशातून आलेल्या विविध ६० प्रकारच्या खजुरांचा समावेश आहे. पुढील महिनाभर रोज सरासरी ७५ क्विंटल खजूर विकला जाईल, असा अंदाज घाऊक व्यापाऱ्यांचा आहे.

दरम्यान, मुस्लिम धर्मातील पवित्र रमजान महिन्याला शनिवारपासून सुरुवात झाली. त्यासोबत मुस्लिम बांधवांचे रोजा (उपवास) सुरू झाले आहेत. यासाठी खजुराचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्यामुळे पहाटेच्या सहेरीसाठी आणि



संध्याकाळच्या इफ्तारच्या वेळी आवर्जून खजूर सेवन केले जातात. हे खजूर १०० रुपयांपासून ३००० रुपये किलोपर्यंत आहेत. यापैकी किमिया (१४० ते १७० रुपये), फरद (२४० ते ३०० रुपये), इराणी (१०० रुपये) या खजुरांना मागणी जास्त आहे.

### शरीरास आरोग्यदायी खजूर, लोह भरपूर



खजुरात विटॅमिन ए, बी, सी, सोडियम, फॉस्फोरस, कॅल्शियम, सल्फर, लोह आदी भरपूर प्रमाणात असतात. खजूरमुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढते, पचनशक्ती मजबूत होते, असे आहारतज्ज्ञ यांनी सांगितले.

### अज्वा सुमारे तीन हजार रुपये किलो

सात वर्षापूर्वी अज्वा खजूर ५००० रुपये किलोने विकला जात होता. लॉक डाऊन पूर्वी २०१९ मध्ये ३००० रुपये किलोने ते विकले गेले. २०२२- २०२३ मध्ये थेट १६०० रुपये किलोने विकले गेले. सध्या ३००० रुपये किलोने विकले जात आहेत. अज्वा खजुराचे निवडक चाहते आहेत, ते आवर्जून घेतात, अशी माहिती विक्रेत्यांनी सांगितली.

### डॉ. हर्षदा गोरे यांचे आज व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मार्च-**

जागतिक महिला दिनाचे औचित्यसाधून ईनरव्हील क्लब सोलापूरच्यावतीने खास महिलांसाठी आनंदी जीवनाच्या तत्त्वचिंतक डॉ. हर्षदा गोरे यांचे व्याख्यान मंगळवार, ४ मार्च रोजी आयोजित करण्यात आले आहे.

शिवछत्रपती रंगभवनाजवळील मेसानिक हॉलमध्ये सायंकाळी ४.३० ते ६.३० पर्यंत चालणारे हे व्याख्यान महिलांच्या जीवन प्रवासाला नवी दिशा देणारे ठरेल. हे व्याख्यान पूर्णतः खुले आणि मोफत आहे. या व्याख्यानाचा लाभ सर्व महिलांनी घ्यावा, असे आवाहन ईनरव्हील क्लब सोलापूर शाखेच्या अध्यक्षा श्रद्धा काबरा आणि सचिवा दीप्ती देसाई यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०४६

**पाउला पाउला उदकें । वर्षाकाळींही परिचोखें ।**
**निझरि कां विशेखें । सुलभे जेथ ।।**

श्रीकृष्णांनी अर्जुनाला उपदेश करण्याच्या हेतुने कर्मयोग, कर्मयोगी, ज्ञानसंन्यासयोग, सांख्ययोग, स्थितप्रज्ञ असे बरेच विषय स्पष्ट करुन सांगीतले आहेत. तरी पण अर्जुनाची जिज्ञासा वाढतच गेल्याने श्रीकृष्ण परमात्मा त्याच्या प्रश्नाप्रमाणे वेगवेगळया विषयावर स्पष्टीकरण देत आहेत. आता अर्जुनाने विचारले आहे की, योगाभ्यास करण्यासाठी नेमके स्थान कसे असावे. अशा योग्यश्रेष्ठ पुरुषाची, योगाभ्यासकाची लक्षणे अर्जुनाने यापुर्वीच जाणून घेतली आहेत.



असा योगाभ्यासु नेमके कोणत्या स्थळी व कसा बसतो किंवा कसा योगाभ्यास करतो हे अर्जुनाची जाणून घेण्याची इच्छा.आहे. अर्जुनाप्रमाणे आपणालाही हे स्थळ कसे असावे हे जाणून घ्यावे वाटत असेलच. अर्जुनाच्या विनंतीप्रमाणे श्रीकृष्ण परमात्मा योगाभ्यासाचा राजमार्ग व स्थळ कसे असावे हे सांगत आहेत. योगीजन अज्ञानाच्या अन्य आडवाटा टाकून आत्मज्ञानाच्या मार्गाने सरळ जातात. मनाची निश्चलता हीच या मार्गाची वाटचाल असते. खरे म्हणजे हा विषय केवळ ऐकण्याचा किंवा वाचण्याचा नाही तर तो अनुभव घेण्याचा आहे, हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. योगाभ्यासासाठी असे स्थान निवडावे की तेथून हालूच नये असे वाटावे आणि त्या स्थानाच्या वातावरणाने आपले वैराग्य दुप्पट वाढावे. या स्थानी संतांनी वास्तव्य केले असेल तर छानच. अशा स्थानी संतोषाची पुष्टी होते व मनाला उल्हास प्राप्त होतो. योगाभ्यासाच्या स्थानाची रमणीयता आत्मानंदाचा अनुभव प्राप्त करुन देते. अशा स्थानावरुन नास्तिक जरी जात असेल तरी त्यालाही तेथे तप करावे असे वाटू लागते. भटकणाऱ्या मनाला स्थिर करण्याची, वैराग्याला थापटी मारुन जागे करण्याची ताकद या स्थानात असते. विषयसुखभोगी विलासी पुरुषालाही असे स्थान मोहित करते आणि त्यालाही येथे निवांत पडून राहावे वाटते. अशा स्थानी साधकांची वस्ती असावी. सामान्य लोकांचे येणे जाणे येथे नसावे. सांगतांना भगवंत म्हणाले, त्या ठिकाणी मुळासकट अमृताप्रमाणे गोड असणारी सदा सर्वकाळ बहरणारी दाट झाडे असावीत. तसेच त्या स्थळी वर्षाकाळाशिवाय इतर ऋतुतही पावला पावलावर पाणी असावे, विशेषत: तेथे शुध्द पाण्याचे झरे सजहपणे प्राप्त होतील असे सुलभ असावेत. माऊलींनी योगाभ्यासासाठी स्थान कसे असावे, हे सांगतांना वृक्षाचे, पाण्याचे महत्व दाखवून दिले आहे. आज पिण्यासाठी पाणी मिळणे, सावलीसाठी वृक्ष मिळणे कठीण झाले आहेत, तर शांतता, तपासाठी अशी जागा मिळेल का ? एवढी वाईट परिस्थिती निर्माण करण्यास आपणच कारणीभुत आहेत. आपण पाणी मोठया प्रमाणावर वाहून जाऊ देतो, मोठया प्रमाणावर वृक्ष तोड करतो. आपण पाणी अडवत, जिरवत नाही, वृक्ष लागवड व वृक्ष संगोपण करीत नाही. हे सर्व सत्य असतांनाही मनाच्या शांतीसाठी योग्य स्थळाची अपेक्षाही आपण करतो. मनाच्या शांतीचा आणि वृक्ष, पाण्याचा किती जवळचा संबंध आहे. हे माऊलींनी सांगीतले आहे. आपणालाही हे निश्चितच पटत असेल. म्हणूनच आपण आनंदासाठी, मन:शांतीसाठी बागेत जातो, जिथे दाट झाडी, हिरवळ, पाणी असेल त्या ठिकाणी बसत असतो. आपण आपल्या मन:शांतीसाठी तरी पाणी अडवू जिरवू या, तसेच वृक्ष लागवड करु या.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : मंगळवार | दिनविशेष - चांगला दिवस |
| दि. ४ मार्च २०२५ | महर्षी याज्ञवल्क्य जयंती |
| विक्रम संवत् २०८०-८१ | ....राहू काल.... |
| शके - १९४६ | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| संवत्सर - क्रोधी नाम | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| मास - फाल्गुन | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| शु. पंचमी (१५.१७) | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| ऋतु - वसंत | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| नक्षत्र - भरणी (२६.३७) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| योग - ऐंद्र (२६.०६) | शनिवार : स. ९ ते १०.३० |
| करण - कौलव (२६.०१) | |

### राशीभविष्य

**मेष :** अनिश्चिततेमुळे अडचणी वाढतील. व्यापारीक वाद, मतभेद होण्याची शक्यता, जबाबदारीचे काम सांभाळून करा,

**वृषभ :** अडकलेला पैसा मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. वहान चालविताना सावधानीने चालवा.

**मिथुन:** व्यवसायाच्या विस्तारा संबंधी योजना आखाल. आरोग्याची काळजी घ्या. रोजगारात यश व फायदा मिळण्याची शक्यता. वाचनाची गोडी वाढेल.

**कर्क:** अनावश्यक चिंतापासून दूर रहा. देणे - घेणे पासून सावधानता बाळगा. लोभ - लालचे पासून दूर रहा. धंदा मध्यम राहील.

**सिंह :** व्यावहारिक अडचणी दूर होतील. विद्यार्थ्यांना आपल्या प्रगतीत वाढ होईल. प्रतिस्पर्धामुळे लाभ होण्याची शक्यता.

**कन्या :** कुटुंबात प्रसन्न वातावरण राहील. व्यापारासाठी प्रवास होण्याचा योग आहे. कामकाजात गुप्तता बाळगा, आर्थिक स्थिती चांगली राहील.

**तुळ :** आवश्यक कामांसाठी पूर्ण वेळ द्यावा. आर्थिक योग चांगला. नोकरीमध्ये उत्साह वाढेल. प्रवास जपून करा.

**वृश्चिक :** मुलांनी केलेल्या कामांमुळे प्रतिष्ठा वाढेल. काम काजाचा विस्तार होईल.

**धनु :** योजनेनुसार कामे पार पडणार नाहीत. व्यावसायिक चिंता राहील. मुलांच्या व्यवहारामुळे दु:खी व्हाल. सहयोगी मदत करणार नाहीत. खर्च कमी करण्याचा प्रयत्न करा.

**मकर :** फायद्याच्या बातम्या ऐकण्यास मिळतील. सामाजिक किंवा राजकीय प्रसिद्धी मिळेल. व्यापार चांगला चालेल. घरासंबंधी समस्या दूर होतील.

**कुंभ :** मागे केलेल्या कामाचे फळ मिळेल. धंद्यात स्वत: निर्णय घेतल्यास निश्चित फायदा. दुसऱ्यांवर विश्वास ठेवू नका.

**मीन:** कर्मा विषयी उत्साह ठेवा. बुद्धी व तर्काने कार्यामध्ये सफलता मिळण्याचे योग आहेत. व्यापारात नवीन योजनेमुळे लाभ होईल. नियंत्रण ठेवा.


# ए.जी. पाटील पॉलिटेक्निकमध्ये राष्ट्रीय विकास कार्यक्रमात २०० शिक्षकांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ मार्च-**

शांती एज्युकेशन सोसायटीच्या ए. जी. पाटील पॉलिटेक्निक, सोलापूर येथील यांत्रिक अभियांत्रिकी विभागाच्या वतीने ''ऍडिटिव्ह मॅन्युफॅक्चरिंग: संधी आणि आव्हाने'' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय स्तरावरील ऑनलाइन फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम आयोजित करण्यात आला. ही कार्यशाळा ऑनलाईन पद्धतीने पार पडली.

ऍडिटिव्ह मॅन्युफॅक्चरिंग (३ प्रिंटिंग) ही उत्पादन क्षेत्रातील क्रांतिकारी संकल्पना असून, विविध औद्योगिक क्षेत्रांमध्ये तिचा वापर मोठ्या प्रमाणावर होत आहे. आधुनिक तंत्रज्ञानासोबत जुळवून घेण्यासाठी आणि शिक्षकांना अद्ययावत ज्ञान मिळावे, यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेच्या माध्यमातून ऍडिटिव्ह मॅन्युफॅक्चरिंगच्या संधी, उद्योग क्षेत्रातील उपयुक्तता, संशोधनातील योगदान आणि भविष्यातील आव्हाने यावर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यशाळेत देशभरातील अभियांत्रिकी व पॉलिटेक्निक महाविद्यालयांतील २०० हुन अधिक शिक्षकांनी सहभाग नोंदवला.

कार्यशाळेचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष सिद्धेश्वर ए. पाटील, उपाध्यक्ष श्री. शिवानंद एस. पाटील, संस्थेचे कॅम्पस डायरेक्टर व




महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. ए. चौगुले आणि उपप्राचार्य श्री एस. के. मोहिते यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. के. पी. करुणाकरन (-बॉम्बे) हे उपस्थित होते. सदर कार्यशाळेसाठी डॉ. के. पी. करुणाकरन यांनी ऍडिटिव्ह मॅन्युफॅक्चरिंगमधील नव्या संशोधन प्रवाहांवर प्रकाश टाकला. डॉ. ए. एम. कुठे (- नागपूर) यांनी ऍडिटिव्ह मॅन्युफॅक्चरिंगच्या संशोधन संधी आणि नवीन ट्रेंड्स समजावून सांगितले. डॉ. व्ही. एस. जत्ती (बेनेट युनिव्हर्सिटी) यांनी ३ प्रिंटिंगमधील विविध तंत्रज्ञान आणि त्याचा औद्योगिक वापर याविषयी माहिती दिली तसेच श्री. शुभम गुप्ता ( , पुणे) यांनी औद्योगिक दृष्टीकोनातून व्यावसायिक संधी आणि उत्पादन विकासावरील सखोल चर्चा केली. या कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. बी. ई. नरोटे यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. जे. पी. पिंजार, प्रा. व्ही. जी. आंबीगर, प्रा. ए. आर. मळेकर यांनी विशेष मेहनत घेतली.

कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी विभागप्रमुख प्रा. आर. एस. मोटगी यांनी, आयोजक व सहभागी शिक्षकांचे आभार मानले आणि त्यांनी सांगितले की, ''या कार्यशाळेतून सर्वांना अत्यंत महत्त्वाची माहिती मिळाली असून, भविष्यात

# बाजार समितीच्या कामकाजात सुसूत्रता आणण्यासाठी समिती गठित

## राज्य शासनाला करणार विविध सुधारणांची शिफारस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ मार्च-**

राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कामकाजात सुसूत्रता आणण्यासाठी, पणन विषयक काही बाबींमध्ये सुधारणा करण्यासाठी, राज्य शासनाला शिफारस करण्यासाठी पाच सदस्यांची समिती गठीत करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघाचे व्यवस्थापकीय संचालक यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती असून या समितीमध्ये पणन संचालक, पणनचे कार्यकारी संचालक, मंत्रालयातील सहकार, पणन व वस्त्रोद्योगचे उपसचिव (पणन) हे सदस्य असणार आहेत. समितीच्या सदस्य सचिव पदाची जबाबदारी पणनच्या सहसंचालकांवर सोपविण्यात आली आहे.

पणन संचालकांच्या स्तरावरून विविध प्रकल्पासाठी नियुक्त केल्या जाणाऱ्या सल्लागारांची फी प्रकल्प अहवालाच्या किती प्रमाणात असावी याचे निकष ठरवणे, राज्यातील बाजार समित्यांमध्ये असलेल्या १९० शेतकरी भावनांच्या दुरुस्ती संदर्भात आराखडा तयार करणे, आराखडा करताना बाजार समितीचे सचिव व अध्यक्ष यांचे मत विचारात घेणे, खासगी बाजार परवाना नूतनीकरण करण्यासंदर्भात धोरण करताना विचारात घ्यावयाच्या बाबी, एकल परवाना फीमध्ये वाढ करतानां विचारात घ्यावयाचे निकष ठरविणे, मर्यादा ठरविणे, पणन मंडळाच्या अंशदानातून जमा होणारी रक्कम किती प्रमाणात असावी, सुपरविझन फीमध्ये वाढ करता येईल का? ही बाब तपासणे, बाजार समित्यांमधील कर्मचाऱ्यांसाठी ग्रुपविमा योजना लागू करता येईल का? ही बाब तपासणे, या मुद्यावरही समिती अभ्यास करणार आहे. अभ्यास करून ही समिती त्यांच्या अभिप्रायासं २० मार्चपूर्वी शासनाला अहवाल सादर करणार आहे.



# सूर्यनमस्कार स्पर्धेत दमाणी अंधशाळेची कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मार्च-**

रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थ संचलित भैरूरतन दमानीनगर येथील दमाणी अंधशाळा निवासी विद्यार्थ्यांनी सूर्यनमस्कार स्पर्धांमध्ये सामान्य मुलांसमवेत सूर्यनमस्कार घालून या सूर्यनमस्काराचे महत्त्व दिव्यांगांनी सुद्धा समाजासमोर अधोरेखित केल्याचे चित्र पहावयास मिळाले त्यांनी शंभराहून अधिक सूर्यनमस्कार घालून उपस्थितांची मने जिंकले.

नूतन मराठी विद्यालयात हे विद्यार्थी नियमित योगासने व सूर्यनमस्कार आवर्जून घालत असतात. वसतिगृहातील हा त्यांचा दैनंदिन उपक्रम आहे. या विद्यार्थ्यांना धनश्री कुलकर्णी यांनी पारितोषिके देऊन सन्मान केला. यात १२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. त्यांना अर्चना करकमकर यांनी मार्गदर्शन केले.

मुख्याध्यापक प्रकाश दर्शनाळे व सचिव संतोष भंडारे यांनी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. योग असोसिशनच्या अध्यक्षा स्नेहल पेंडसे यांनी या शाळेतील विद्यार्थ्यांना सामान्य मुलांसमवेत योगासन व सूर्यनमस्कार स्पर्धेत सहभागी होण्यासाठी उद्युक्त केले.

# मनोहर सपाटे सांस्कृतिक भवनचे लवकरच लोकार्पण : सपाटे

## वाढदिवसानिमित्त गरजू १५ विद्यार्थ्यांना सायकली वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मार्च-**

येथील मराठा समाज सेवा मंडळाच्या मनोहर सपाटे सांस्कृतिक भवन या वातानुकुलित मंगल कार्यालयाचे लवकरच लोकार्पण करणार असल्याची ग्वाही या संस्थेचे अध्यक्ष तथा माजी महापौर मनोहर सपाटे यांनी दिली.



प्रभाग क्रमांक सहा मधील मनोहर सपाटे विचार मंचतर्फे सपाटे यांच्या ७४ व्या वाढदिवसानिमित्त १५ गरजू विद्यार्थ्यांना सायकली वाटप करण्यात आल्या. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी विनायक पाटील, प्रा. महेश माने, नामदेव थोरात, ज्ञानेश्वर सपाटे, महादेव गवळी, सुजाता जुगदार, मंजूश्री पाटील, राजेंद्र आवताडे, तानाजी माने, सुनीता निकम, सीताबाई गायकवाड, नवनाथ पाटोळे प्रा. संतोष गवळी, प्रा. सचिन गायकवाड, महमद शेख, उदयसिंह पवार, महानंदा सोलापुरे, अविनाश पाटील,नागनाथ नवगिरे, आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सपाटे यांचा नागरी सत्कार करून सायकली वाटपाचा कार्यक्रम पार पडला. यासाठी मंचचे सदस्य दत्ता जाधव, लखन कारंडे, प्रशांत भगरे, सोमनाथ बचुटे यांचे सहकार्य लाभले. दरम्यान,यावेळी सपाटे यांना वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष सुधीर खरटमल, काँग्रेसचे अध्यक्ष चेतन नरोटे, राष्ट्रवादीचे युवा प्रदेश उपाध्यक्ष प्रशांत बाबर, वारकरी मंडळाचे जिल्हाध्यक्ष किरण महाराज बोधले, लक्ष्मण महाराज चव्हाण यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी हजेरी जाऊन शुभेच्छा दिल्या. यावेळी मुख्याध्यापिका जुगदार यांनी सायकली वाटपामुळे गोरगरीब विद्यार्थ्यांना लाभ होऊन त्यांच्या पालकांचीही आर्थिक बचत होईल, असा विश्वास व्यक्त केला.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दीपक डुरे-पाटील, भानुदास घंदुरे, दत्ता सुतार, संतोष अलकुंटे, श्रीपादराव जगदाळे, गणेश मुळे , सुरेश जगताप, दत्ता भोसले, विलास झरेकर आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन जयश्री साठे यांनी केले. प्राचार्य मधुकर पवार यांनी आभार मानले.

# महाबोधी महाविहाराचे व्यवस्थापन बौद्धांच्या हाती द्यावे

## भारतीय बौद्ध महासभेचा सोलापुरात शांती मार्च

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मार्च-**

बुद्धगया येथील महाबोधी महाविहाराचे व्यवस्थापन बौद्धांच्या हाती द्यावे. महाबोधी महाविहार तात्काळ मुक्त करण्यात यावे. या मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी भारतीय बौद्ध महासभा आणि समता सैनिक दलाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर शांती मार्च काढण्यात आला.

डॉ. आंबेडकर चौक येथील विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून या शांती मार्चला प्रारंभ झाला. हातात विविध मागण्यांचे फलक आणि पंचशील ध्वज घेऊन समाज बांधव सहभागी झाले होते. विविध मागण्यांच्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला. त्यानंतर जिल्हा परिषदेसमोरील पुनम गेट येथे या शांती मार्चचा समारोप करण्यात आला. त्यानंतर उपजिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. बुद्धगया येथील महाबोधी महाविहार मुक्त करण्यात यावे. बुद्धगया येथील महाबोधी महाविहार १९४९ च्या व्यवस्थापन



ॲक्ट मध्ये तात्काळ दुरुस्ती करून महाबोधी महाविहाराचे संपूर्ण व्यवस्थापन बौद्धांच्या हाती देण्यात यावे. बुद्धगया महाबोधी महाविहार येथे सुरू असलेल्या महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनातील सर्व मागण्या त्वरित मंजूर करण्यात याव्यात. जगभरातील व देशातील सर्व बौद्ध बांधवांच्या भावनेचा विचार व आदर करून तातडीने कार्यवाही करावी, आदी मागण्यांचा निवेदनात समावेश आहे. यावेळी भंते बी सारीपुत्त, भिक्षुणी धम्मचारणी आरयाजी,सोलापूर जिल्हा अध्यक्ष आण्णासाहेब वाघमारे , जिल्हा सरचिटणीस नागसेन माने, धम्मरक्षिता कांबळे, धम्मपाल माने, शाम शिंगे, दत्तात्रय सिद्धगणेश, निर्मला

# आ. कल्याणशेट्टी यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मार्च-**

अक्कलकोट विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची आमदार निवास व्यवस्था समितीच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाल्या निमित्त ईच्छा भगवंताची मित्र परिवाराच्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव यांनी हॉटेल बालाजी सरोवर येथे पाणीदार आ. सचिन कल्याणशेट्टी यांना पाणीदार आमदार नमूद असणारे मानाचा सोलापुरी फेटा बांधून हार घालून त्यांचा सत्कार केला. या सत्कार सोहळ्याप्रसंगी VVP कॉलेजचे चेअरमन अमोल चव्हाण, सचिन गुत्तेदार, निलेश कांबळे, महादेव राठोड, माणिक कांबळे, रवी नळगुंटले यांच्यासह ईच्छा भगवंताची परिवाराच्या सदस्यांची उपस्थिती होती.



आ. सचिन कल्याणशेट्टी हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अत्यंत निकटवर्तीय आहेत प्रशासनात त्यांच्या शब्दाला खूप मोठे वजन आहे. सोलापूर शहर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी महायुती सरकारच्या माध्यमातून या पुढील काळात विकासात्मक निर्णय आपण घ्याल अशी अपेक्षा देखील यावेळी किसन जाधव यांनी व्यक्त केली.

# संस्कारक्षम पिढीच देशाला चांगले नेतृत्व देवू शकेल

## पत्रकार दशरथ वडतिले यांचा विश्वास

## आयटीआयच्या श्रमसंस्कार शिबिराचे उद्‌घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मार्च-**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून तयार झालेली संस्कारक्षम तरुण तडफदार पिढीच समाजाच्या व देशाच्या सर्वांगीण विकासाला गती व सक्षम नेतृत्व देवू शकेल, असा ठाम विश्वास सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ पत्रकार दशरथ वडतिले यांनी व्यक्त केला.


विजयपूर रोडवरील महात्मा बसवेश्वर शासकीय ओद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार



शिबिराचे उद्घाटन झाले, त्यावेळी ते बोलत होते.संस्थेचे उपप्राचार्य एस. एस. यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून करमणूक कर अधिकारी तथा तहसीलदार शिल्पा ओसवाल व सामाजिक कार्यकर्त्या प्रिती उडानशिव या उपस्थित होत्या. प्रारंभी पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. एन.एस.एस कार्यक्रम अधिकारी एन. एस.म्हेत्रे यांनी पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले तर व्ही. डी.भांगे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. एस.आर.गोलेकर यांनी प्रास्ताविक केले.पी. एम. केंदळे यांनी सूत्रसंचालन केले तर बी. आर.आसरेड्डी यांनी आभार मानले. शिबिरात सहभागी झालेले विद्यार्थी श्रमदानातून मैदान व आवार स्वचछता, रंगकाम, पाईप फीटिंग, विद्युत दुरुस्ती, वृक्षारोपण, स्क्रॅप विल्हेवाट आदी कामे करणार आहेत. तसेच या शिबिरात विद्यार्थांची आरोग्य तपासणी व प्रबोधन केले जाणार जाणार असून त्यासाठी मान्यवरांना

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०).



आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.

**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक
प्रमुख राष्ट्र सेविका समिती, मो.
९९६००५३५२१

### अलक:- (६९) परिवार

सरसंघचालक श्री गुरुजी यांना एकदा एका सज्जन संघ चालकांनी विचारले की आता मी या पदावर आहे पण माझे काम काय ?

गुरुजी:- आज तुम्ही संयुक्त परिवाराचे वरिष्ठ आहात ना ?

सज्जन:- हो माझ्या परिवारात माझा मुलगा-मुलगी, भाचा भाची, नातू, नात दिर- भावजय व माझी आई आहे.

गुरुजी:- होय ना, मग वरिष्ठ म्हणून आपण काय काम करतां ?

सज्जन:- सर्वांनी सुख- शांतीने, प्रेमाने जगावे म्हणून प्रयत्न करतो. त्यांचे आपसात भांडण होऊ देत नाही.

गुरुजी:- हे सगळे जण गुणवान चरित्र वाहक बनतील याबद्दल काय कराल ?

सज्जन:- जसे आईने माझ्यावर संस्कार केले, तसे मी त्यांच्यावर संस्कार करीन, त्यांच्या भविष्याची चिंता मी तर करेनच, पण त्यांना सुद्धा त्यांच्या भविष्याची चिंता करायला शिकवीन,

गुरुजी:- म्हणजे हे तुमचे स्वाभाविक कर्तव्य आहे.

सज्जन:- हो गुरुजी,

गुरुजी:-मग तुम्ही संघचालक या नात्याने संघाला आपला परिवार माना. व तुमचे स्वाभाविक कर्तव्य बजावा. मला सुद्धा जात-पात, भाषा प्रांत, लहान-मोठे, स्वयंसेवक अधिकारी असे भेद मान्य नाहीत. आपल्या गावातील संघ परिवार एकत्र येतील असे कार्यक्रम करा. असे केल्याने गुरुजींचे वाक्य संघचालकांनीच पूर्ण केले. सज्जन म्हणाले (असे केल्याने) मला निश्चितच समाधान मिळेल.

**- क्रमशः**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### चपळगाव, बावकरवाडी ग्रामपंचायतीकडून महिला दिनानिमित्त विविध कार्यक्रम

**अक्कलकोट, दि. ३ मार्च-**

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त चपळगाव व बावकरवाडी ग्राम पंचायतीकडून आयोजित केलेल्या लिंबू चमचा, संगीत खुर्चा, रांगोळी स्पर्धा, बुक बॅलन्स व उखाणे स्पर्धासह कार्यक्रममध्ये महिला मोठ्या संख्येने सहभाग घेऊन जल्लोष साजरा केला चपळगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेसमोरील मैदानात ही स्पर्धा आयोजित केली होती. या विविध स्पर्धांचे उद्घाटन अंगणवाडीच्या अनुभवी शिक्षिका मंगल दिपक पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी सरपंच वर्षा भंडारकवठे, उपसरपंच सुवर्णा कोळी, ग्रामपंचायत सदस्य रेश्मा तांबोळी उपस्थित होते.



### विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचे संवर्धन करावे : मारुती बावडे

**अक्कलकोट, दि. ३ मार्च-**

मराठी भाषा समृद्ध करण्यासाठी विद्यार्थी व शिक्षक यांनी दैनंदिन वृत्तपत्रे, पुस्तके वाचून, रेडिओ ऐकून, सोशल मीडिया व मोबाईलच्या माध्यमातून मराठी भाषाचे ज्ञान अवगत करावे. मराठी भाषेची आवड निर्माण करावी, मराठी भाषेचा वापर जास्तीत जास्त करावा, असे प्रतिपादन आकाशवाणी वृत्तनिवेदक मारुती बावडे यांनी केले. प्रचंडे प्रशालेत मराठी भाषा गौरव दिन व उत्कृष्ट ग्रंथ वाचन पुरस्कार वितरण समारंभाच्या आयोजित कार्यक्रमात सोलापूर आकाशवाणीचे वृत्त निवेदक तथा पत्रकार मारुती बावडे बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य शंकर व्हनमाने होते. प्रारंभी प्रा. ईरण्णा धानशेट्टी व मारुती बावडे यांच्या हस्ते वि वा शिरवाडकर व एस.आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. प्राध्यापक प्रशांत नागूरे यांनी मारुती बावडे यांचा अल्प परिचय करून दिला यावेळी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्राध्यापक चिदानंद मठपती, अंजली धानशेट्टी, सुमय्या मुजावर, वैष्णवी कलशेट्टी यांनी मराठी भाषेचे महत्त्व पटवून सांगितले. याप्रसंगी ग्रंथपाल प्रमिला शिवगुंडे यांच्यावतीने पहिली ते बारावी पर्यंतच्या उत्कृष्ट वाचन करणाऱ्या विद्यार्थ्यांना चालू घडामोडीचे ग्रंथ व प्रमाणपत्र देऊन अतिथींच्या हस्ते सत्कार करण्यात आले. यावेळी प्राध्यापक अनिल इंगळे, शरणप्पा मणूरे, सहशिक्षक बसवराज धानशेट्टी, प्रीती प्रचंडे, चेन्नवीर कल्याण. सागर पोतदार उपस्थित होते.



### विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घेऊन वैज्ञानिक बनावे : कडबगावकर

**अक्कलकोट : दि ३ मार्च**

विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घेऊन वैज्ञानिक बनावे असे मत विज्ञान शिक्षिका पुजा कडबगावकर यानी व्यक्त केल्या. मसुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात थोर वैज्ञानिक सी व्ही रमण यांच्या जयंती निमित्त आयोजित विज्ञान दिवस कार्यक्रमात त्या बोलत होत्या. प्रारंभी वैज्ञानिक सी.व्ही. रमण यांच्या प्रतिमेस मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. यावेळी कु अक्षता साठे, स्मिता बिराजदार या विद्यार्थिनींनी थोर शास्त्रज्ञ सी.व्ही. रमण यांच्या विषयी माहिती दिली. यानंतर प्रश्नमंजुषा स्पर्धेत यशस्वी विद्यार्थी अतुल कारंजे, संस्कृति बिराजदार, आदिती बाणेगाव, अनमोल आडवीतोट, सुलक्ष्मी टाके यांना पारितोषिक देण्यात आले. तसेच पोस्टर प्रदर्शनात प्रीती फुलारी, लक्ष्मी किणगी, लक्ष्मी भूशेट्टी या यशस्वी विद्यार्थिनींना पारितोषिके देण्यात आली. कार्यक्रमास पर्यवेक्षक सूर्यकांत रुगे, श्रीदेवी मायनाळे, कल्पना स्वामी, शरणबसप्पा चानकोटे,सेमी विभागाचे दिगंबर जगताप, विज्ञान शिक्षक रवीकिरण दंतकाळे, सिद्रामप्पा पाटील, सागर मठदेवरू, शितल फुटाणे, विद्याश्री वाले उपस्थित होते.



### निर्भयतेचा संदेश देणाऱ्या स्वामीं चरणी प्रत्येकाने नतमस्तक व्हावे : गोऱ्हे

**अक्कलकोट, दि. ३ मार्च-**

श्री स्वामी समर्थांची अगाध लिला सर्व विश्वव्यापी आहे. 'भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे, असा निर्भयतेचा संदेश देणाऱ्या स्वामीं चरणी प्रत्येकाने नतमस्तक व्हावे असे मनोगत विधानपरिषदेचे उपसभापती व आमदार डॉ. नीलम गोऱ्हे यांनी व्यक्त केले. ते आज येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास आपल्या सहकाऱ्यांसमवेत भेट देऊन श्री.स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रथम ेश इंगळे यांनी आ.डॉ.नीलमताई गोऱ्हे व त्यांच्या समवेत असलेले प्राध्यापक ज्योतीताई वाघमारे यांचा श्रींचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देवून यथोचित सत्कार केला. यावेळी आ. डॉ. नीलम गोऱ्हे बोलत होत्या. पुढे बोलताना आ.डॉ.गोऱ्हे यांनी वटवृक्ष मंदिरातील व्यवस्थापन व पावित्र्य उत्तम आहे. महेश इंगळे हे कर्तव्यदक्ष समिती प्रमुख आहेत. यावेळी गिरीश पवार, श्रीकांत मलवे इत्यादी उपस्थित होते.

# जिल्ह्यातील शिक्षकांची गडकिल्ले पाहण्याची शंभरावी वारी

## 30 जणांच्या टीमने केले 100 गड पूर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३ मार्च-**

खरतरं शिक्षक हा वर्ग बचत करणारा, चाकोरीबद्ध आयुष्य जगणारा म्हणूनचं ओळखला जातो. पण सोलापूरच्या गुरुजींनी स्वतःची एक आगळी-वेगळी ओळखं निर्माण केली आहे. या सर्व गुरुजीनी गडकिल्ले पाहण्याची शंभरावी वारी पूर्ण केली आहे. कोणत्याही गोष्टीसाठी सुरुवात करणारा किंवा ज्योत प्रज्वलीत करणारा लागतोच.असाच या समुहात एक अवलिया शिक्षक ज्याला इतिहासाची आवड आहे. अण त्यातं शिवरायांच्या व शंभूराजांच्या इतिहासावर तर प्रचंड प्रेम असणारे गुरू डॉ. अभिजीत ननवरे यांनी आठ वर्षांपूर्वी अँन्ड्रॉईड फोन आले तेव्हा गडकिल्ले, राजेरजवाडे या फेसबूक ग्रुपला जॉईन झाले व तेथून निर्माण झाली प्रत्यक्ष इतिहास जगण्याच, इतिहासाचा जागर करण्याची वृत्ती.



कोविडमध्ये पहिला किल्ला हरिहर. अण तिथून सुरू झाला शिवरायांच्या सह्याद्रीतील गडकिल्ल्यांच्या व ऐतिहासिक स्थळांचा प्रवास करण्याचा उपक्रम. शिवजयंती दिवशी ही शतकीवारी पूर्ण करूनच संपन्न झाला. शिवरायांनी तोरणा किल्ला जिंकून स्वराज्याचे तोरण बांधले व जिल्ह्यातील शिक्षकांनी गुरुजनांनी तोचं किल्ला १०० वा म्हणून निवडून गडकिल्ले मोहिमांचे तोरण बांधून पूर्ण केले. या सर्व गोष्टी घडत असताना त्यांना साथ मिळाली त्यांच्या मित्रपरिवारातील शिक्षक मित्रांची. स्वतःच्या गाडया बऱ्यापैकी सगळ्यांकडे असल्याने आलटून-पालटून सर्व जण शनिवार-रविवारला जोडून सुट्ट्या आल्या की ही मंडळी निघतात थेट सह्याद्रीमध्येच. सोलापूरपासून सर्वच किल्ले दोनशे किलोमीटर पुढे असल्याने एका फेरीत किमान तीन ते चार किल्ले पूर्ण करतातचं. त्यामुळे यांना आपोआपच व्यायाम करणे आवश्यक होते.

आरोहन मोहिमांबरोबर गडसंवर्धन करणे. पायथ्याच्या गरीब लोकांना आर्थिक मदत करणे, असेही सामाजीक बांधीलकीचे उपक्रम हे गुरुजन करत आहेत. आता तोरण्यावर पहिले शतक पूर्ण केल्यानंतर दुसऱ्या शतकाचीही तयारी सुरू केली आहे. यामध्ये आजपर्यंत या गुरुजनांनी, लिंगणा, जीवधन, इर्षाळगड, महिपत गड, गोरखगड, हरिहर, हरिश्चंद्रगड, रतनगड, कळसूबाई, कलावंतीनगड, रायगड, राजगड, तोरणा, माहुली, चंदेरी, रांगणा असे सर्व प्रसिद्ध असे १०० गड पूर्ण केले आहेत. त्याचप्रमाणे शिवशंभूराजांच्या आयुष्यातील घडलेल्या ऐतिहासिक घटनांच्या भेटी देऊन इतिहासाचा जागरही केलेला आहे. उदा : उंबरखिंड, पावणखिंड, प्रतापवराव गुजर समाधी, हंबीरराव मोहीते समाधी, संताजीबाबांची जाळी इ. ऐतिहासिक ठिकाणच्या मोहिमेमध्ये सहभागी सदस्यांची जवळजवळ ३० जणांची टीम तयार झाली आहे.

### यांचा होता सहभाग

उपक्रमामध्ये ३० वर्षापासून ते ६० वर्षापर्यंतची शिक्षक मंडळी सहभागी आहेत. यामध्ये संजीव चाफाकरंडे, सुनील क्षिरसागर, रामकृष्ण कदम, अतुल येवले, नंदकुमार खर्द, संजय पवार, धिरज गिरमे, ज्ञानेश्वर खुणे, अमोल साखरे, विजय म ळवे, चंद्रकांत लांबकाने, नागनाथ मगर, विनोद बहिर्जे, राहुल गाडे, राहुल पाटील, ऋषी जगताप, अनिल खडाखडे, हणमंत बंडगर, नागेश वाघमोडे, सुनील राठोड, विशाल सिरसराव, रमेश घंटेनवरू, संतोष धोत्रे, दिलीप पवार, सत्यजीत भालेराव, अश्पाक शेख, सुशील लांबतुरे, सुदीत हंचाटे, विवेक जगताप, विजय लोहार, कृष्णा कांबळे, विष्णू गोडगे सदस्य सहभागी आहेत.

# मातृभूमी प्रतिष्ठानच्या इनडोअर स्टेडियमचे भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३ मार्च-**

मातृभूमी प्रतिष्ठानच्यावतीने कुर्डूवाडी-लातूर बायपास येथील पोद्दार इंग्लिश मीडियमच्या मागे उभारल्या जाणाऱ्या भूमीवर इनडोअर स्टेडियमचे भूमिपूजन सोहळा विविध मान्यवरांच्या हस्ते उत्साहात पार पडला.



कार्यक्रमास कृषीमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे खासगी सचिव संतोष पाटील, उपमुख्यमंत्र्यांचे खासगी सचिव अविनाश सोलवट, तसेच उपविभागीय अधिकारी (सोलापूर १) सदाशिव पडदुने हे मान्यवर उपस्थित होते. याशिवाय श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष नंदन जगदाळे, जनरल सेक्रेटरी प्रकाश पाटील, तसेच मंत्रालयातील कक्ष अधिकारी प्रशांत कानगुडे यांची उपस्थिती लाभली.

याप्रसंगी मातृभूमी प्रतिष्ठानचे सचिव प्रतापराव जगदाळे यांनी या प्रकल्पामागील भूमिका विषद केली. किरण देशमुख सर यांनी प्रतिष्ठानच्या माध्यमातून क्रीडा विभागाला कशा प्रकारे प्रोत्साहन देता येईल, याबाबत माहिती दिली. यावेळी संतोष पाटील यांनी या प्रकल्पासाठी आवश्यक सहकार्य आणि मदतीचे आश्वासन देऊन बहुमोल मार्गदर्शन केले. अविनाश सोलवट यांनी सरकारच्या विविध योजनांच्या माध्यमातून हा प्रकल्प जागतिक स्तरावर कसा नेऊ शकतो, याबाबत आपले विचार मांडले. या कार्यक्रमात प्रतिष्ठान पदाधिकारी, सदस्य, विविध क्षेत्रातील मान्यवर, प्रतिष्ठित नागरिक, क्रीडाप्रेमी पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येत उपस्थित होते. भूमिपूजन सोहळ्याच्या निमित्ताने क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्राच्या विकासासाठी एक नवा अध्याय सुरु झाला आहे.

# रविवारी राज्यस्तरीय वारकरी संमेलन

## भाविक वारकरी मंडळाच्यावतीने सांगोला येथे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मार्च-**

वारकरी संप्रदायातील संत विचाराचे मंथन व्हावे, वारकरी संघटन व्हावे, समाज मनाला स्थिरता मिळावी या हेतूने भाविक वारकरी मंडळ यांच्या माध्यमातून रविवार दि. ९ मार्च रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृती भवन, अंबिका मंदिर चौक, तहसील कार्यालय, सांगोला येथे राज्यस्तरीय वारकरी संमेलन आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती राष्ट्रीय अध्यक्ष हभप सुधाकर इंगळे महाराज यांनी पत्रकार परिषदेत दिली.

श्री संत नामदेव महाराज १६ वे वंशज हभप माधव महाराज नामदास (पंढरपूर) यांच्या अध्यक्षतेखाली व राष्ट्रीय अध्यक्ष सुधाकर इंगळे महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हे संमेलन होत आहे. दि. ९ मार्च (रविवार) रोजी सकाळी ९.३० वाजता अंबिका मंदिर ते हॉल पर्यंत ग्रंथ दिंडी काढण्यात येणार आहे. सकाळी १० वाजता संमेलनाचे उदघाटन होणार असून संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थान आळंदी प्रमुख विश्वस्त निरंजननाथ योगीजी महाराज हे प्रथम सत्राचे अध्यक्ष असतील. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून हभप श्रीगुरु गोपाळ अण्णा वासाकर महाराज (वासाकर फड, पंढरपूर) उपस्थित राहणार आहेत. यावेळी राष्ट्रीय उपाध्यक्ष हभप भागवत चवरे महाराज, शिवसेना अध्यात्मिक आघाडीचे प्रदेश अध्यक्ष हभप अक्षय भोसले महाराज , भाजपा अध्यात्मिक आघाडी प्रदेश अध्यक्ष आचार्य तुषार भोसले, आ. बाबासाहेब देशम ुख, आ. समाधान अवताडे, माजी आ. दिपक साळुंखे, माजी आ. शहाजी पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह सावंत, डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटना महाराष्ट्रचे संस्थापक अध्यक्ष राजा माने, तहसीलदार संतोष कणसे, मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी, पोलीस निरीक्षक भीमराव खणदाळे आदी म ान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तसेच दुपारी २ वाजता वारकरी मंडळ पदाधिकारी परिचय भेट, दुपारी २.३० वाजता महाराष्ट्रातील सर्व जिल्हाध्यक्ष व महिला पदाधिकारी मनोगत होऊन ४ वाजता समारोप करण्यात येणार आहे. सर्व वारकरी भाविकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटना महाराष्ट्र उपाध्यक्ष सतीश सावंत, प्रदेश अध्यक्ष जोतिराम चांगभले यांनी केले. या पत्रकार परिषदेस राष्ट्रीय सचिव बळीराम जांभळे, जिल्हाध्यक्ष पंढरपूर विभाग ज्ञानेश्वर भगरे, महादेव दिवसे उपस्थित होते.



# रस्ता दुभाजक जागेत वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३ मार्च-**

नगरपालिका निवडणुकीचा मुहुर्तच लवकर लागत नसल्याने प्रशासकीय राजवटीचे एकहाती कारभार आणि विकास अधिक गतीने होत आहेत. यामध्ये मार्च महिना आल्याने प्रशासकीय पातळीवर सर्वच विभागात अनेक विकास कामे हातावेगळी करण्याचा सपाटा लागतो. याला अक्कलकोट नगरपालिकाही अपवाद नाही. मात्र ऐन उन्हाळ्याच्या तोंडावर झाडे लावल्याच्या घटनेची चर्चा मात्र पर्यावरप्रेमी व नागरिकामध्ये रंगली आहे.

तीर्थक्षेत्र अक्कलकोट नगरात पंचायत समिती समोरील रस्ता ते विजय कागगार चौक पर्यंत रस्ता दुभाजक जागेत फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीस मार्च महिन्याच्या तोंडावर सूर्य आग ओकीत असताना वृक्ष लावली आहेत. अंत्यत चांगल्या हेतुने लावलेली ही झाडे ऐन उन्हाळ्याच्या मोसमात टिकुन रहावीत अशी प्रार्थना पर्यावरण प्रेमी नागरिकांतून व्यक्त केली जात आहे. मार्च महिना जवळ आला की अनेक घडामोडी पहावयास मिळतात. असाच प्रकार एक अक्कलकोटमध्ये नुकताच पहावयास मिळाला. पंचायत समिती सम ोरील रस्ता ते विजय कामगार चौक पर्यंत रस्ता दुभाजक जागेत फेब्रुवारी अखेरीस मार्च महिन्याच्या तोंडावर नुकतीच झाडे लावण्यात आली आहेत. विकास कामे होत असताना झालेली वृक्षतोड यावर पर्यावरण प्रेमी नागरिकांनी नाराजी व्यक्त केली.

# सायकल रॅलीतून पर्यावरण संवर्धनाचा संदेश

## ९ किलोमीटर सायक्लोथॉनमध्ये

## ३५० हून अधिक जणांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३ मार्च-**

माझी वसुंधरा अभियान ५ व राष्ट्रीय स्वच्छ वायू उपक्रम अंतर्गत सोलापूर महापालिका व रॉयल रायडर्स ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने सकाळी सायकल रॅली (सायक्लोथॉन २०२५) काढण्यात आली. या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.



यावेळी महापालिका उपायुक्त तैमूर मुलाणी आणि मान्यवरांच्या हस्ते रोपट्यास जल अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आले. या रॅलीमध्ये सोलापूर रॉयल रायडर्स ग्रुप व शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थिती होते. एकूण ९ किलोमीटर लांब असणाऱ्या या रॅलीत सर्वच वयोगटातून ३५० हून अधिक बालकांनी व नागरिकांनी सहभाग नोंदवला. प्रास्ताविक सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांनी केले. उपायुक्त तैमूर मुलाणी यांनी 'मिशन झिरो कार्बन' वर सोलापूर शहर २०५० पर्यंत कसे कार्बन मुक्त करता येईल यावर आपले मत मांडले. यावेळी सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, कार्यकारी अभियंता राजेश परदेशी ,पशुवैद्यकीय अधिकारी सतीश चौगुले, उद्यान अधीक्षक किरण जगदाळे, पर्यावरण अधिकारी अक्षय मोरे, पर्यावरण व्यवस्थापक, स्वप्निल सोलनकर, जनसंपर्क अधिकारी ओमप्रकाश वाघमारे, समीर मुलाणी व क्रीडा अधिकारी भूषण जाधव , रॉयल रायडर्स ग्रुपचे अभिनय भावठनकर यांच्यासह इतर अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेटफळच्या युवकाचे मोटारसायकलवर जाऊन कुंभस्नान

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ३ मार्च-**

कुंभ स्नानाची उत्कट इच्छा परंतु जाण्यासाठी अडचणी आल्याने शेटफळ तालुका करमाळा येथील युवकाने मोटार सायकलवर अडीच हजार किलोमीटरचा प्रवास करून ७२ तासात कुंभ स्नान करून घरी आला गावात आल्यानंतर त्याचे स्वागत झाले ग्रामस्थांच्या वतीने त्याचा सन्मान करण्यात आला

शेटफळ तालुका करमाळा येथील मनोज जाधव या पदवीधर युवकाचा गावात टेलरिंगचा व्यवसाय आहे अध्यात्माची लहानपणापासूनच आवड असल्याने धार्मिक ग्रंथ वाचन विविध धार्मिक कार्यक्रमाला त्याची नेहमी हजेरी असते कुंभमेळा सुरू झाल्यापासून गावात कुंभ स्नानाला जाण्याच्या चर्चा होत होत्या. गावातील काही लोक विमानाद्वारे तर काही लोक रेल्वेने प्रवास करून प्रयागराज ला जाऊन कुंभ स्नान करून गावाकडे आले मनोज आणि त्यांच्या मित्रांनी सुद्धा रेल्वेने कुंभ स्नानासाठी जाण्याचे ठरवले परंतु रेल्वे आरक्षण न मिळाल्याने त्यांचा हिरमोड झाला नंतर या युवकांनी मोटरसायकलवर प्रयागराजला जाण्याचा निर्णय घेतला परंतु मोटरसायकलवर जाण्यास घरच्या लोकांचा विरोध



असल्याने ते जाऊ शकले नाहीत. मनोजला मात्र कुंभस्नानाची उत्कट इच्छा मनात होती परंतु जाण्यासाठी गावामध्ये जोडीदार मिळत नव्हता. २४ फेब्रुवारी रोजी त्याने मनाचा निर्णय करून एकटाच प्रयागराजला म ोटरसायकलवर जाण्याचा निर्णय घेतला. घरच्या मंडळींना व मित्रांनाही न सांगता दुपारी सव्वा बारा वाजता त्याने आपल्या मोबाईलवर थेट प्रयागराजचे लोकेशन टाकले मोटरसायकलला किक मारली आणि प्रयागराजचा रस्ता धरला. बार्शी, नांदेड, यवतमाळ, नागपूर, जबलपूर, कटनी, रीवा मार्गे प्रवासाला सुरुवात केली सायंकाळी साडेनऊ वाजता ३७५ किलोमीटर चा प्रवास पूर्ण करून त्याने नांदेड व उमरखेडच्यामध्ये असलेल्या हदगाव या ठिकाणी मुक्काम केला पहाटे चार वाजताच पुन्हा प्रवासाला सुरुवात केली. सायंकाळी सात वाजता तो प्रयागराजमध्ये मोटार सायकल पार्किंगच्या ठिकाणी पोहोचला नंतर मोटरसायकल पार्क करून चालत जाऊन सायंकाळी नऊ वाजता स्नान केले. स्नानानंतर प्रयागराज पासून १२ किलोमीटर अंतरावर एका साध्या लॉजवर मुक्काम केला २६ फेब्रुवारी रोजी पहाटे त्या ठिकाणाहून निघून सायंकाळी सहा वाजेपर्यंत २४ तारखेला मुक्काम केलेल्या ठिकाणी हादगाव येथे पोहोचून त्याच ठिकाणी मुक्काम केला व २७ फेब्रुवारी रोजी दुपारी आपल्या घरी पोहोचला घरून निघाल्यापासून ७२ तासांमध्ये कुंभस्नान करून तो घरी पोहोचला. कुंभ स्नानाशिवाय त्याच्या डोक्यात दुसरा कोणताचा विचार नसल्यामुळे तो दुसरीकडे कुठेच थांबला नाही कुठे गेला नाही. मनोजच्या कुटुंबात आई वडील व छोटा भाऊ आहे. कुटुंबीयांची आर्थिक परिस्थिती फारशी चांगली नाही गावात स्वतःचे घरही नसलेल्या त्याच्या कुटुंबातील सर्वजण मोलमजुरी छोटे-मोठी कामे करून आपला चरितार्थ चालवतात मनोजची देवावर मोठी श्रद्धा आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून त्याच्या कुटुंबाची वाटचाल सुरू असली तरी जिद्द चिकाटी आणि प्रचंड कष्ट करण्याची तयारी असल्याने आणि परमेश्वरावर श्रद्धा असल्याने माझे दिवस ये नक्कीच पालटतील, असा ठाम विश्वास त्याला वाटतो.

मनोज श्रद्धाळू आहे. कुंभमेळ्याला जाण्याविषयी तो माझ्याकडे बोलला होता गावातील कोणी जाणार असेल तर त्यांच्याबरोबर जा असे मी म्हणाले होते. परंतु एकट्याला जाऊ देणार नाही हे त्याला माहीत असल्याने मला न सांगता तो गेला गावाजवळ येईपर्यंत त्याने आम्हाला सांगितले नव्हते. आम्हाला फार काळजी वाटली असती. जवळ आल्यावर मित्रांना त्याने सर्व सांगितले आता त्याला पुन्हा कधीही असा एकटा जाऊ नको असे बजावले आहे.

- विद्या जाधव, मनोजची आई

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सोपल स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**पांगरी, दि. ४ मार्च-**

स्व. शोभा सोपल सेमी इंग्लिश स्कूल पांगरी स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्सहात पार पडले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पांगरीच्या सरपंच मनीषा धस तर प्रमुख पाहुण्या पांगरीच्या केंद्रप्रमुख पंचकुला गायकवाड या लाभल्या होत्या. कार्यक्रमाचे उद्घाटन अध्यक्षांच्या प्रमुख पाहुण्यांच्या व उपस्थित निमंत्रितांच्या हस्ते करण्यात आले. या संस्थेतील उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक विनायक गरड यांनी केले तर आभार प्रदर्शन घावटे यांनी मानले.





### संक्षिप्त वृत्त...



## बार्शीत रमजाननिमित्त गरजवंत कुटुंबांना किराणा मालाच्या किटचे वाटप

**बार्शी, दि. ३ मार्च-**

'दावते इस्लामी इंडिया' संचलित गरीब नवाज रिलीफ फाउंडेशनच्यावतीने रमजानच्या पवित्र महिन्यात गरजू कुटुंबांना किराणा मालाचे किटचे वाटप करण्यात येत आहे. या उपक्रमाअंतर्गत २०० कुटुंबांना या किटचे घरपोच वाटप होत आहे. रमजान हा महिना इस्लाम धर्मात पवित्र मानला जातो. या महिन्यात दानधर्म, मदत व सामाजिक सेवेला विशेष महत्त्व दिले जाते. त्याचाच भाग म्हणून गरीब नवाज रिलीफ फाउंडेशनने गरजवंताना मदतीचा हात देऊन एक उत्तम कार्य केले आहे. दैनंदिन लागणाऱ्या किराणा मालाच्या मदतीमुळे त्यांना आर्थिक दिलासा मिळेल, त्यांचा सण हा आनंदात साजरा होणार आहे. या मदतीमुळे त्यांना गहू, तांदूळ, साखर, डाळी, तेल तसेच इतर जीवनावश्यक वस्तूचा यामध्ये समावेश आहे. गरीब नवाज रिलीफ फाउंडेशन या संस्थेच्यावतीने दरवर्षी विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात. गरजूंना शालेय शैक्षणिकदृष्ट्या मदत, अन्नधान्य वाटप व आरोग्य सेवा,अशा विविध उपक्रमामध्ये ही संस्था सहभागी असते. या उपक्रमामुळे या संस्था आणि स्वयंसेवकाचे बार्शी शहरातून कौतुक होत आहे. भविष्यातही असेच संस्थेचे उत्तम समाजकार्य होत राहो अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



## विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षण घेण्यासाठी विविध शिष्यवृत्तीची संधी : ॲड. देशमुख

**बार्शी, दि. ३ मार्च-**

येथील श्री शिवाजी महाविद्यालयात शिक्षणयात्रा एज्युकेशन टू एम्प्लॉयमेंट परदेशातील उच्च शिक्षण, प्रक्रिया आणि आव्हाने या विषयावर ॲड. दिपक चटप व ॲड. प्रणव देशमुख यांचे व्याख्यान संपन्न झाले. कार्यक्रम इंग्रजी विभाग व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र यांच्यावतीने आयोजित करण्यात आला होता. ॲड. चटप यांनी शिक्षण विभाग जिल्हा परिषद चंद्रपूर व विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमाने २६ नोव्हेंबर २०२३ ते २६ जानेवारी २०२४ संविधान दिन ते गणतंत्र दिन दरम्यान विदर्भात उच्च शिक्षणाची 'शिक्षणयात्रा' सुरु केली.

चटप व देशमुख यांनी परदेशात पदव्युत्तर शिक्षणासाठी चेव्हेनिंग, फेलिक्स, कॉमनवेल्थ आदी परदेशी शिष्यवृत्तीसह राज्य व केंद्र सरकारच्या विविध शिष्यवृत्ती उपलब्ध आहेत. युरोपात इरॅस्मस मुंडुसप्रमाणे अनेक शिष्यवृत्ती उपलब्ध आहेत. त्यातून उच्चशिक्षणाचा संपूर्ण खर्च शिष्यवृत्तीतून होतो, असे ॲड. चटप व ॲड. देशमुख सांगतात. भारतात गुणवत्ता केवळ परीक्षेतील गुणांवर ठरवली जाते. लंडनच्या विद्यापीठात पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेश मिळवताना शिक्षणाचा उद्देश काय? यांवर १००० ते १५०० शब्दांत आपली भूमिका लिहून द्यावी लागते, असेही त्यांनी स्पष्ट केले. खजिनदार जयकुमार शितोळे व प्रा.डॉ. आर.आर. कोठावळे यांनी विद्यार्थ्यांना परदेशातून शिक्षण घेण्याची संधी प्राप्त करण्यासाठी अभ्यास करावा व योग्य मार्गदर्शन घ्यावे, असे विद्यार्थ्यांना सांगितले. याप्रसंगी डॉ. अनिल कट्टे व मनीष देशपांडे हे उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. अशोक कदम यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. राहुल पालके यांनी केले तर आभार डॉ. सोमनाथ यादव यांनी मानले.



## लेबर फेडरेशनच्या संचालकपदी निवड झाल्याबद्दल रामचंद्र भैस यांचा सन्मान

**पिलिव, दि.३ मार्च-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील प्रगतशील बागायतदार रामचंद्र भैस यांची भाजपाचे विधानपरिषद सभागृह गटनेते आ. प्रविण दरेकर यांच्या अध्यक्षतेखाली व मार्गदर्शनाखाली झालेल्या निवडणुकीत मुंबई लेबर सोसायटीचे तथा मुंबई उपनगरे जिल्हा मजूर सहकारी संस्थाच्या संलग्न मजूर सहकारी संस्थेचे संस्थापक व ७ वेळा यशस्वी रित्या चेअरमनपद भूषविलेले रामचंद्र भैस-रजपूत यांची सातव्या वेळी निवड झाल्याबद्दल ग्रामस्थांच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी ग्रामपंचायतीचे माजी सदस्य राजेंद्रसिंग जामदार, मिनाक्षी रजपुत, विजया रजपूत, शिवाजी सावळजकर, दामोदर लोखंडे, सोमनाथ रजपुत, राजाभाऊ शिकारे, केरापा माने, गणेश घमिरे, अविनाश घमिरे, संतोष गाढवे, दिपक गोरड, लक्ष्मण जामदार, भारत जामदार, परशुराम गाढवे, कुमार भैस, आनंता जामदार, संतोष नरळे, डॉ. गौरी करचे, भारत जामदार, सविता जामदार, पूजा घमिरे, प्रिया घमिरे उपस्थित होते.

# आषाढी यात्रेपूर्वी टोकन दर्शन व्यवस्थेची चाचणी

## गहिनीनाथ महाराज औसेकर यांची माहिती; चैत्री यात्रेत आवश्यक नियोजन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर दि.३ मार्च-**

येथील श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या दर्शनासाठी टोकन दर्शन प्रणाली सुरू करण्याचे प्रस्तावित असून, त्याची आषाढी यात्रेपूर्वी टोकन दर्शन व्यवस्थेची चाचणी घेण्याबाबत तसेच श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर जतन व संवर्धन् कामाबाबत पुढील आठवड्यात जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आल्याची माहिती मंदिरे समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

श्री विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवास येथे सोमवारी (ता.३) मंदिर समितीची सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. या बैठकीस सदस्या



शकुंतला नडगिरे, डॉ.दिनेशकुमार कदम, भास्करगिरी बाबा, संभाजी शिंदे, ज्ञानेश्वर देशमुख-जळगांवकर, ॲड. माधवी निगडे, हभप प्रकाश जवंजाळ, शिवाजीराव मोरे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, लेखा अधिकारी मुकेश अनेचा तसेच वास्तुविशारद तेजस्विनी आफळे, जतन संवर्धन कामाचे ठेकेदार रमेश येवले तसेच टिसीएस कंपनीचे प्रोजेक्ट मॅनेजर भीमा सेखर व विविध खात्याचे खाते प्रमुख उपस्थित होते.

याशिवाय, श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या दर्शनासाठी टोकन दर्शन प्रणाली सुरू करण्याचे प्रस्तावित असून, त्यांचा आषाढी यात्रेपूर्वी चाचणी घेण्यासाठी व मंदिर समितीचे कार्यालयीन कामकाज गतीमान करण्याच्या दृष्टीने विविध प्रकारच्या संगणक प्रणाली सेवाभावी तत्वावर मोफत उपलब्ध करून देण्याची मंदिर समितीची विनंती टिसीएस कंपनीने मान्य केली आहे. त्यामध्ये ऑनलाईन डोनेशन, भक्तनिवास बुकींग, पूजा बुकींग, लाईव्ह दर्शन व इतर अनुषंगीक बाबींसाठी संगणक प्रणालीचा समावेश आहे.

इत्यादीबाबत निर्णय घेण्यात आल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी यावेळी सांगीतले. प्रतिवर्षी चैत्र शुध्द ११ कामदा एकादशी दिवशी चैत्री यात्रा भरते. यावर्षी चैत्री एकादशी ४ एप्रिलला संपन्न होत असून, यात्रेचा कालावधीत दिनांक २ ते १२ एप्रिल असा आहे. या यात्रा नियोजनाचा आढावा घेण्यात आला. त्यामध्ये या यात्रेला येणा-या भाविकांना आवश्यक सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगीतले.

### वॉटरप्रुफींगची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याच्या सूचना

बैठकीत मंदिर जतन व संवर्धन कामाचा आढावा घेण्यात आला, त्यामध्ये सध्या गाभारा, बाजीराव पडसाळी, सभामंडप व इतर अनुषंगीक ठिकाणी सुरू असलेली सर्व कामे आषाढी यात्रेपूर्वी पूर्ण करून घेण्यात येणार असून, दगडी कामास कोटींग करणे व वॉटरप्रुफींगची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याबाबत सूचना करण्यात आल्या.



## सराटी येथे अखंड हरिनाम सप्ताह सुरू

**अणदूर, दि. ३ मार्च-**

सराटी (ता. तुळजापूर) येथे श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताह सद्गुरु शिवराम बुवा महाराज दिंडेगावकर, गुरुवर्य हभप ज्ञानेश्वर महाराज दिंडेगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या सुरू आहे.

दि. २ ते ८ मार्च या कालावधीत प्रवचनकार हभप बलभीम जाधव, अशोक जाधव, रामचंद्र कुंभार, जोडभावे, विष्णुपंत मुंढे, अविनाश पाटील, संजय जाधव यांच्या प्रवचनाचा कार्यक्रम होणार असून, कीर्तनकार हभप राजदीप आंधळे महाराज, हभप प्रसाद काष्टे, नितीन जगताप,श्रीराम चवले, हभप देविदास हौळ, हभप गुरुवर्य ज्ञानेश्वर दिंडेगावकर महाराज यांच्या किर्तनाचा कार्यक्रम होणार आहे तर ८ मार्च रोजी हभप वैभव महाराज कानेगांव यांच्या काल्याच्या किर्तनाने व हभप ज्ञानेश्वर महाराज दिंडेगावकर यांच्या हस्ते पसायदान व काला वाटप करण्यात येणार आहे.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी चंद्रकांत कलकोटे, विनायक यादव, आण्णा भरगंडे, मोहन घोडके, विकी घोडके, बंडू घोडके, प्रकाश कुंभार, दिगंबर घोडके, राजदीप कुंभार, अमोल मुळे, नानासाहेब जेवळे, राम काळे, अजित शेख, सचिन कुंभार, नीलकंठ घोडके, रवींद्र घोडके, तमा हाराळे, हरिश्चंद्र कुंभार, बसवेश्वर मुळे, कल्लाप्पा जेवळे, मकरंजन पाटील, राजेंद्र हिंगमिरे, मल्लिनाथ चिकणे, बाबुराव व्हंड्रे, मल्लिकार्जुन कुंभार, गहिनीनाथ हिंगमीरे, शिवाजीभरगंडे, अमोल घोडके, रवी कुंभार, शंकर कुंभार यांनी पुढाकार घेतला.

# जळभावी गावठाण टँकरमुक्त

## सरपंचासह सदस्यांची भूमिका; तलावातील बेकायदेशीर पाणी उपसा बंद

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. ३ मार्च-**

तलावातून होत असलेला बेकायदेशीर पाणी उपसा बंद करण्याचा निर्णय आजी माजी सरपंचासह सदस्यांनी घेतल्यामुळे फेब्रुवारी महिन्याच्या सुरवातीस गावास टंकरने पाणीपुरवठा करावा लागत होता तो आता बंद झाला असून अद्यापही पाणी पुरवठा विहिरीस पाणी असल्याने जळभावी गावठाणामधील नागरिकांचा पाण्याचा प्रश्न अद्याप तरी सुटला आहे. मात्र वाड्यावस्त्यावरील नागरिकांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे.

जळभावी हे तालुक्याच्या पश्चिम भागातील गाव असून या गावाला सातत्याने दुष्काळाचा सामना करावा लागतो. येथील शेती क्षेत्र हे पूर्णता पावसावर अवलंबून आहे. या गावास रस्त्याच्या कडेला असलेल्या तलावा मधील विहिरी वरून पाणी पुरवठा केला जातो. परंतु सततच्या दुष्काळी परिस्थितीमुळे हा तलाव अनेक वर्षापासून १०० टक्के भरला नाही. पावसाळ्यात काही प्रमाणात आलेले तलावातील पाणी शेतकरी पिकासाठी उपसत असल्याने हा तलाव जानेवारी महिन्यापूर्वीच कोरडा पडत होता. त्यामुळे पाणी पुरवठा विहीर कोरडी पडत असल्याने गावठाणातील ग्रामस्थांना टंकरने पाणी पुरवठा करावा लागत होता वाड्यावस्त्यावर पाणी असायचे परंतु गावठाणामधील नागरिकांना पाणी नसायचे परंतु गावातील माजी सरपंच किसन राऊत, माजी सरपंच पुष्पा शिंदे, सरपंच रतन कोळेकर, ग्रामविकास अधिकारी प्रदीप काळे व आजी माजी सदस्य व गावातील प्रतिष्ठीत यांनी या तलावातील पाणी कोणालाही उपसू द्यावयाचे नाही, असा निर्णय घेतला तसा ग्रामपंचायत ठरावही केला. पाणी उपसा करण्यासाठी असलेल्या मोटारी काढून टाकल्या त्यामुळे पाणीपुरवठा विहिरीचे पाणी टिकून राहिले व नागरिकांचा पाण्याचा प्रश्न सुटला. याही वर्षी पावसाळ्यात सुद्धा या परिसरात पाउस कमी झाला तलावात केवळ ३५ ते ४० टक्केच पाणी साठा झाला. परंतु पाणी उपसा बंद केल्याने आजही तलावात १५ टक्के पाणी साठा असल्याने पाणी पुरवठा विहिरीस पाणी आहे. गावठाणासाठी असलेला पाणी पुरवठा सुरु आहे. मे महिन्यापर्यंत तरी पाणी टिकून राहील. आजी माजी सरपंच, आजी माजी सदस्य, ग्रामविकास अधिकारी, शेतकरी यांनी घेतलेल्या निर्णयामुळे व शेतकऱ्याच्या सहकार्यामुळे जळभावी गावठाण टँकर मुक्त झाले. गाव टँकरमुक्त करून गावकऱ्यांनी इतरा समोर आदर्श निर्माण केला आहे.



गावातील सदस्यांनी, शेतकऱ्यांनी व प्रशासनाने केलेल्या सहकार्यामुळे तलावातील पाणी टिकून राहिले आहे. त्यामुळे गावठाणामधील नागरिकांचा पाण्याचा प्रश्न सुटला आहे.अपुऱ्या पावसाने तलाव भरला नाही तरी सुद्धा मे अखेर जळभावी गावठाणामधील नागरिकांना पाणी मिळू शकेल. **- रतन कोळेकर,** सरपंच



तलावातील पाणी उपसा बंद करण्याकरिता शेतकऱ्यांनी सहकार्य केले तसेच प्रशासकीय अधिकारी यांनीही सहकार्य केले त्यामुळे तळ्यात पाणी टिकून राहिले.त्यामुळे नागरिकांची पाण्याची सोय झाली

**- प्रदीप काळे,** ग्रामविकास अधिकारी

## पं. जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सवाची सांगता

### राग धनकोनी, हंसध्वनी मारुबिहाग आणि तबलावादनाचा श्रवणीय कलाविष्कार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३ मार्च -**

पंढरपूर तरंगणी सांस्कृतिक प्रतिष्ठान, आरती साऊंड सिस्टिम मनमाडकर परिवार आणि नादब्रह्म कला फाउंडेशन करकंब यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय पं. जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सवाची सांगता झाली.

या संगीत महोत्सवामध्ये दुसऱ्या दिवशीच्या प्रथम सत्रांमध्ये अमर ओक यांचे बासरी वादन संपन्न झाले. त्यांनी राग हंसध्वनी सादर करत आलाप, जोड, झाला, सादर करत अधिक रंगत वाढवली बाजे रे मुरलीया बाजे, माझे माहेर पंढरी या दोन अभंगाने वातावरण भक्तीमय करत रसिकांना मंत्रमुग्ध केले. यावेळी त्यांना तितकीच सुंदर साथ तबला पांडुरंग पवार, पखवाज कृष्णा साळुंखे यांनी दिली. त्यानंतर पं.राजा काळे यांच्या गायनाला सुरुवात झाली त्याआधी नादब्रह्म कला फाउंडेशनच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या स्मरणिकेचे प्रकाशन योगी निरंजन नाथजी, पं.राजा काळे,वसंत मराठे, ज्ञानेश्वर वीर यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आली. त्यानंतर पं. राजा काळे यांनी राग मारू बिहाग विलंबित तीनतालात सादर करत लगेच बंदिश सादर करत अभ्यास पूर्ण गायकीचं दर्शन घडवलं. बोलावा विठ्ठल पहावा विठ्ठल, पंढरीचे सुख नाही त्रिभुवनी, तुझी सेवा करीन मनोभावे असे अतिशय सुंदर अभंग सादर करत सर्वात या भैरवीने कार्यक्रमाची सांगता केली. त्यांना साथसंगत पांडुरंग पवार, हार्मो नियम उदय कुलकर्णी, पखवाज ज्ञानेश्वर दुधाणे, स्वर साथ अभेद अभिषेकी आणि शाम जोशी, टाळ वैभव केंगार यांनी करत कार्यक्रमात अधिक रंगत आणली. सूत्रसंचालन संकेत कुलकर्णी आणि आरती मनमाडकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शुभांगी मनमाडकर, धनंजय मनमाडकर, वैभव केंगार, माऊली खरात, गौरी अंमळनेरकर, माधुरी जोशी, पारुल परमार, स्वानंदी काणे, सुदर्शन कुंभार, रामेश्वर जाधव यांनी परिश्रम घेतले.



# उन्हापासून संरक्षणासाठी सावली अन् पाण्याची सोय

### तहसीलदारांची संवेदनशीलता; नागरीकांमधून कौतुक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मार्च-**

फेब्रुवारी महिन्यात ऊन्हाची तीव्रता वाढल्याने नागरीकांना ऊन्हाचा चटका सहन करावे लागत आहे. शासकीय कार्यालयात नागरीकांसाठी विश्रामकक्ष असला तरी ऊन्हाचा उकाडा सहन करावे लागते. विविध शासकीय कामांसाठी आलेल्या नागरीकांसाठी दक्षिण सोलापूर तहसीलदार कार्यालयाच्या आवारात गर्दी होते. सध्या उन्हाचा पारा वाढत असून, उन्हापासून संरक्षण मिळावे यासाठी तहसील कार्यालय प्रशासनाने नागरिकांसाठी मंडप तसेच बसण्यासाठी बाकड्यांची सोय केली आहे. प्रशासनाने केलेल्या सोयीनंतर नागरिकांतून समाधान व्यक्त होत आहे.

दक्षिण सोलापुरात तहसील कार्यालयात संजय गाधी, इंदिरा गांधी व श्रावणबाळ या निराधार योजनांसह पुरवठा शाखेकडील नवीन शिधा पत्रिका काढणे, बंद शिधा पत्रिका सुरू करणे, युनिट कमी करणे किंवा वाढवणे व तसेच रुग्णाला उपचारासाठीचे दाखले देणे यासह, अभिलेख कक्ष आदी कामांसाठी सोलापूरला यावे लागते. नागरिकांची मंद्रुपच्या अप्पर तहसील पेक्षा येथेच वर्दळ अधिक आहे. दक्षिणचे तहसीलदार किरण जमदाडे यांनी कार्यालय आवारात दोन ठिकाणी कापडी मंडप मारून बसण्यासाठी बाकडयांची सोय केली आहे.

या कार्यालयाच्या परिसरातील आवारात फक्त एक झाड आणि बैठकीसाठी कट्टा आहे. त्याची सावली अपुरी पडत असल्याचे लक्षात आल्याने तालुक्यातील नागरिकांसाठी तहसीलदार कार्यालयाच्या प्रशासनाने संजय गांधी व अभिलेख कक्षासमोर गर्दी असल्यामुळे पाहून याच कार्यालयासमोर मंडप मारून सावलीची सोय केली आहे. तसेच बसण्यासाठी बाकडेही बसवण्यात आलेली आहेत. एरव्ही, प्रशासनाच्या विरोधात तक्रार करणारे नागरिक येथील तहसीलदार कार्यालयाच्या प्रशानाकडून सामान्य नागरिकांसाठी करण्यात आलेली सावली व बसण्यासाठी बाकड्यांची सोय केल्याने नागरिकांमधून प्रशासनाचे कौतुक होत आहे.



यंदा फेब्रुवारी महिन्याअखेर पासूनच उन्हाचा पारा ३८ अंशावर गेला आहे. कार्यालयात कामांसाठी आलेल्या नागरिकांना ऊन्हाचा त्रास होऊ नये म्हणून, कार्यालयातील ज्या विभागासमोर गर्दी जास्त असते तेथे सावली आणि बसण्यासाठी बाकड्यांची सोय केली आहे. **- किरण जमदाडे,** तहसीलदार, दक्षिण सोलापूर.

### प्रशासनाचे कार्य कौतुकास्पद

ऊन्हामध्ये बसण्यासाठी सावली व पाणी गरजेचे आहे. विविध शासकीय कामांसाठी दूर अंतरावरून आलेल्या नागरीकांसाठी दक्षिण तहसील प्रशासनाने सावलीसाठी मडप, बसण्यासाठी बाकडे व पिण्यासाठी थंड पाण्याची सोय केल्याने त्यांचे कार्य कौतुकास्पद आहे.

**- सोमनिंग विरदे,** नागरिक, भंडारकवठे

धाराशिव
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## शिवसैनिकांनी सदस्य नोंदणी करावी : प्रा. रवींद्र गायकवाड

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.३ मार्च -**
शिवसेनेचे मुख्य नेते तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशान्वये शिवसेना पक्षाच्या वतीने राबवण्यात येत असलेले शिवकार्य-शिवसेना सदस्य नोंदणी अभियाना संदर्भात शिवसेना मध्यवर्ती कार्यालय लोहारा येथे मा.खा.प्रा. रवींद्र गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत



तालुक्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक घेण्यात आली.
बैठकीत गायकवाड यांनी शिवसेना पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी तसेच तालुक्यातील प्रत्येक गाव खेड्यांतील कानाकोपऱ्यांमध्ये शिवसेनेचा भगवा फडकवणे या उद्देशाने 'शिवकार्य शिवसेना' सदस्य नोंदणी अभियान राबवावे असे आवाहन केले. यावेळी या बैठकीस किरण गायकवाड, मोहन पणुरे, वैशाली खराडे, जगन पाटील, अमीन सुंबेकर, रितू गोरे, सर्व नगरसेवक, तालुका प्रमुख, विभागप्रमुख, गणप्रमुख, युवासेना, महीला आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते.


https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## संक्षिप्त वृत्त...



### प्रवीण कोकणेंचा शिवसेनेच्या वतीने सत्कार

**तेरखेडा, दि.३ मार्च -**
वाशी तालुक्यातील जाणकापूर येथील सुपुत्र देश रक्षक भारतीय सैन्य दलाचे हवालदार या पदावर १६ वर्ष देशाची सेवा करून सेवानिवृत्त झाल्याबद्दल जानकापूर व पारगाव ग्रामस्थांच्या वतीने सेवानिवृत्त प्रवीण सखाराम कोकणे यांची जंगी मिरवणूक पारगाव व जानकापूर गावांमध्ये काढण्यात आली. यावेळी पारगाव व जाणकापूर येथे ठिकठिकाणी प्रवीण सखाराम कोकणे यांचे औक्षण करून स्वागत करण्यात आले. यावेळी शिवसेना परिवाराच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी शिवसेनेचे विकास तळेकर, सविता विकास तळेकर, अंजली मोटे, समाधान मोटे, राजा कोळी, चेतन तातूडे, दीपक आखाडे, बाबासाहेब हारे, महेश कोकणे, अशोक जाधव, बाळासाहेब अहिरे आदी शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व गावातील नागरिक उपस्थित होते.




### अनिकेत हुंबेचे परीक्षेत यश

**तुळजापूर, दि.३ मार्च -**
जवाहर नवोदय विद्यालय धाराशिवचा १२वीचा विद्यार्थी अनिकेत अंकुश हुंबे याने नोव्हेंबर २०२४ मध्ये दिल्लीतील इंटरनॅशनल ऑलिम्पियाड फाऊंडेशनद्वारे घेण्यात आलेल्या कॉम्प्युटर सायन्स ऑलिम्पियाड परीक्षेत पश्चिम विभागात पहिला क्रमांक पटकावला. प्राचार्य के.वाय. इंगळे यांच्या हस्ते यांच्या हस्ते चषक, पदक व प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. अनिकेतला त्याचे संगणक शिक्षक यश पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमास क्रीडा अध्यापक आर.एम. अलसेट उपस्थित होते. कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.



### भाविकांसाठी सिमेंट बाकडे भेट

**नळदुर्ग, दि.३ मार्च -**
नळदुर्ग येथील माजी सैनिक मानसिंह ठाकुर यांनी आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधुन आपल्या आईच्या स्मरणार्थ शहरातील अंबाबाई मंदिरात भाविकांना बसण्यासाठी सिमेंटचे बाकडे भेट दिले आहेत. त्यांच्या या उपक्रमाचे कौतुक होत आहे. आपल्या आईच्या स्मरणार्थ येथील अंबाबाई मंदिरात भाविकांना बसण्यासाठी सिमेंटचे बाकडे भेट दिले आहेत. यावेळी विनायक अहंकारी, दशरथसिंग ठाकुर, सरदारसिंग ठाकुर, दत्तात्रय वाघमारे, देवस्थान ट्रस्टचे सुरेश गायकवाड, राजेंद्र गोगाव, अंकुश जाधव आदिजण उपस्थित होते. यावेळी अंबाबाई देवस्थान ट्रस्टच्यावतीने ठाकुर यांचा सत्कार करण्यात आला.



### भाग्यश्री सुरवसे यांची पोलिस दलात निवड

**धाराशिव, दि.३ मार्च -**
उंबरेगव्हाण (ता. धाराशिव) येथील वारकरी कुटुंबातील कन्या भाग्यश्री सुरवसे यांनी कठोर परिश्रम आणि जिद्दीच्या जोरावर मुंबई पोलीस दलात स्थान मिळवले आहे. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष शिक्षण महर्षी सुभाष कोळगे यांच्या हस्ते भाग्यश्री सुरवसे व त्यांच्या आई-वडिलांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी माजी जि.प. सदस्य रामदास कोळगे, राजनारायण कोळगे, प्राचार्य जयप्रकाश कोळगे, प्राचार्य संतोष कपाळे, प्रा. भोसले, पर्यवेक्षक डोंगरे के.ए., प्राध्यापक, विद्यार्थी व इतर मान्यवर उपस्थित होते.

# हिंगळजवाडीत शेतकऱ्याचा खून

## संतप्त ग्रामस्थांचे रास्ता रोको आंदोलन...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ मार्च -**
धाराशिव तालुक्यातील हिंगळजवाडी येथे शेळ्या चोरण्याच्या प्रयत्नाला अडथळा ठरलेल्या शेतकऱ्याचा चोरट्यांनी दगडाने ठेचून निघृण खून केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमुळे गावात संतापाची लाट उसळली असून, संतप्त ग्रामस्थांनी आज रास्ता रोको आंदोलन करत आरोपींवर तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी केली.



याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, मृत तानाजी भगवान मुळे (वय ६५, रा. हिंगळजवाडी) यांच्या शेतशेडमध्ये २ मार्चच्या मध्यरात्री काही अज्ञात चोरटे घुसले. त्यांनी शेळ्या चोरण्याचा प्रयत्न केला, मात्र शेळ्या ओरडू लागल्याने मुळे यांना जाग आली. त्यांनी चोरट्यांना रोखण्याचा प्रयत्न केला असता चोरट्यांनी त्यांच्यावर बेदम हल्ला केला. दगडाने त्यांच्या डोक्यावर वार करत त्यांचा जागीच खून केला. या अमानुष घटनेमुळे हिंगळजवाडीतील ग्रामस्थ संतप्त झाले आहेत. आज (३ मार्च) सकाळी शेतकऱ्यांनी मुख्य रस्त्यावर उतरून रास्ता रोको आंदोलन केले. शेतकऱ्यांचा जीव



असुरक्षित आहे, पोलिस प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, अशी मागणी करत ग्रामस्थांनी घोषणा दिल्या. या प्रकरणी संजय राजेंद्र पवार, जितेंद्र प्रभू पवार (रा. तेर, धाराशिव), अमोल ईश्वर काळे आणि ईश्वर रामा काळे (रा. हिंगळजवाडी, धाराशिव) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी सध्या फरार असून, त्यांचा शोध घेण्यासाठी विशेष पथक तैनात करण्यात आले आहे.
या घटनेमुळे गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आरोपींना अटक करावी आणि शेतकऱ्यांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक हजारे करत आहेत.

## महात्मा फुले समता परिषदेच्या प्रदेश चिटणीसपदी स्नेहा सोनकाटे यांची निवड



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३ मार्च -**
वंचित बहुजन आघाडीच्या नेत्या तसेच ओबीसी नेत्या स्नेहा सोनकाटे यांची अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या प्रदेश चिटणीसपदी निवड करण्यात आली असुन त्यांच्या निवडीचे सर्व स्तरातुन स्वागत होत आहे.
१ मार्च रोजी नाशिक येथील भुजबळ फार्म कार्यालयात अखिल भारतीय महात्मा फुले समता परीषदेच्या झालेल्या राज्य कार्यकारीणीच्या बैठकीत वंचित बहुजन आघाडीच्या, तसेच ओबीसी नेत्या सोनकाटे यांची अखिल भारतीय महात्मा फुले समता परीषदेच्या प्रदेश चिटणीसपदी निवड करण्यात आली आहे. माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते सोनकाटे यांना नियुक्ती पत्र देण्यात आले आहे.

## शहरातील ६ बेकायदेशीर कत्तलखाने उध्वस्त करण्याची गोरक्षकांची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ मार्च -**
धाराशिव शहरात मोठ्याप्रमाणात गोवंशाच्या रक्ताचे वाहणारे पाट थांबवावेत आणि आई तुळजाभवानीच पावित्र्य प्रशासनाने राखावे. यासाठी खिरणी मळ्यात नव्याने तयार झालेले बेकायदेशीर कत्तलखाने व पिंपरी गावातील बेकायदेशीर कत्तलखाने, हाडांचे कारखाने तातडीने उध्वस्त करण्यात यावेत. म्हणून जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांना महाराष्ट्र शासनाचे मानद पशुकल्याण अधिकारी शिवशंकर स्वामी आणि गोरक्षक दिनेश धनके यांनी निवेदन देऊन तक्रार केली आहे.
यावेळी जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांशी सकारात्मक चर्चा झाली.लवकरच योग्य कायदेशीर करू, असे आश्वासन त्यांना दोन्ही अधिकाऱ्यांनी दिले असल्याचे गोरक्षक दिनेश धनके यांनी सांगितले.

## पानबुडी मोटर चोरीप्रकरणी आरोपी पोलिसांच्या ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ मार्च -**
धाराशिव जिल्ह्यातील रामवाडी शिवारात झालेल्या पानबुडी मोटर चोरी प्रकरणाचा छडा लावण्यात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला यश आले आहे. या प्रकरणी आरोपीला अटक करून एकूण ९ लाख २५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदर्शन कासार आणि त्यांच्या पथकाने तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास करत पोस्टे मुरुड (जि. लातूर) येथे कारवाई केली.



**स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई...**

या कारवाईत आरोपी आकाश पप्पू कसबे (रा. दत्तनगर, मुरुड, जि. लातूर) याला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली. त्याच्याकडून ०२ पानबुडी मोटर (किंमत ३५ हजार रुपये), चोरीसाठी वापरलेले चार चाकी वाहन (किंमत ८ लाख रुपये) आणि दुचाकी (किंमत ९० हजार रुपये) असा एकूण ९ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.
सदर गुन्ह्याची नोंद पोलीस ठाणे ढोकी येथे गु.र. नं. ७५/२०२५ भारतीय दंड संहिता कलम ३०३(२) अंतर्गत करण्यात आली आहे.
आरोपीसह मुद्देमाल ढोकी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला आहे.
सदर कारवाई पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार, सपोनि. सुदर्शन कासार, पोह.शौकत पठाण, प्रकाश औताडे, जावेद काझी, फहरान पठाण, चालक रत्नदिप डोंगरे आणि नितीन भोसले यांच्या पथकाने केली.

## महिलेवर लैंगिक अत्याचार; गुन्हा दाखल

**कळंब, दि.३ मार्च -** कळंब पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गावात ३७ वर्षीय महिलेवर गावातीलच ३५ वर्षीय तरुणाने लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. दि.२७ फेब्रुवारी २०२४ रोजी दुपारी १.३० ते २४ डिसेंबर २०२४ रोजी रात्री १० वाजेपर्यंतच्या काळात, महिला घरी एकटी असताना आरोपीने तिच्या एकटेपणाचा गैरफायदा घेतला. तसेच, फोनवरील संभाषणाची रेकॉर्डिंग व्हायरल करण्याची धमकी देत जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केला. पीडितेने १ मार्च २०२५ रोजी कळंब पोलीस ठाण्यात तक्रार दिली. या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## आलूर येथे महाशिवरात्रीनिमित्त गुरुपादेश्वर मंदिरात रथयात्रा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.३ मार्च -**
प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी आलूर येथे महाशिवरात्रीनिमित्त श्री. गुरुपादेश्वर मंदिराच्या परिसरात रथयात्रा संपन्न झाली. सुरुवातीला पुरवंतांच्या साक्षीने अग्नि प्रवेश कार्यक्रम झाला. त्यानंतर वेदमूर्ती महांतय्या स्वामी यांच्या हस्ते रथाची पुजा करुन रथ ओढण्याचा कार्यक्रम संपन्न झाला.
संध्याकाळी प्रतीवर्षाप्रमाणे श्री. सोमेश्वर मंदिरात अनुभव मंटप आलूरच्यावतीने सामुहिक इष्टलिंग पुजा करण्यात आली. दि.२७ मार्च रोजी यात्रेनिमित्त जंगी कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले होते. २,१०० रु.ची कुस्ती स्व. पांडुरंग दत्तात्रय पोतदार तर १,१११रु ची कुस्ती आलूरचे प्रथम माजी सैनिक कै. शिवणप्पा हणमंतप्पा शंके यांच्या स्मरणार्थ ठेवण्यात आली होती. धाराशिव, बादोला, अक्कलकोट, वागदरी, जामगा, कर्नाटकातील पैलवान कुस्त्या खेळण्यासाठी आले होते.
कार्यक्रम यशस्वीतेसाठी योगेश स्वामी, सागर उमशट्टे, प्रशांत काशेट्टी, मोनेश्वर सुतार, सिद्धप्पा पाटील तर कुस्ती स्पर्धा यशस्वी करण्यासाठी उपसरपंच जितेंद्र पोतदार, परमेश्वर मुळजे, संतोष भाकरे, सिद्धप्पा कुंचगे, आणप्पा बोळदे, सुरेश कुंचगे, निखिल पाटिल, युवराज हावळे, राम कुंचगे, अविनाश बोळदे, सतीश बोळदे आदींनी प्रयत्न केले.

## शेतकऱ्यांचे विविध प्रश्न आणि ड्रग्ज प्रकरणातील कारवाईसाठी काँग्रेसचा ट्रॅक्टर रॅली मोर्चा

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३ मार्च -**
केंद्रातील व राज्यातील महायुती सरकारच्या विरोधात जिल्हा काँग्रेस कमिटीची ट्रॅक्टर रॅली मोर्चा आंदोलन दि.३ मार्च रोजी काढण्यात आला.
विधानसभा निवडणुकीत महायुती सरकारने कर्जमाफी सारखे अनेक आश्वासन दिली. परंतु प्रत्यक्षात सत्तेत आल्यावर विसर पडलेला दिसत आहे.
शेतकऱ्यांचा ७/१२ कोरा करणार होते त्याचे काय झाले? मागेल त्याला सौर पंप अनेक शेतकऱ्यांनी नोंदी केल्या प्रत्यक्षात अजुन एकालाही मिळाला नाही. रोजगार हमी योजनाची कामे चालू कधी होणार ती तातडीने चालू करावीत. तुळजापूर, तमालवाडी ड्रग्स प्रकरणात सखोल चौकशी करून पकडलेल्या आरोपीचे सी.डी. आर. तपासून कारवाई करावी. ठिबक, तुषार सिंचन चे अनुदान अनेक वर्षापासून प्रलंबित आहे ते देण्यात यावे.
कृषी विभागा अंतर्गत अनुदानावर वाटप होणारे बी-बियाणे व औषधे हे ठेकेदारा मार्फत खरेदी न करता शेतकऱ्यांचा स्वतः खरेदी करण्याची परवानगी मिळावी.
महायुती सरकारच्या साक्षीने नंबरप्लेटच्या माध्यमातून इतर राज्याच्या तुलनेत महाराष्ट्रात सर्वात जास्त म्हणजे तिप्पट पट वाढ करण्यात आलेली आहे. ती वाढ कमी करून वाहनधारकाना दिलासा देण्यात यावा.
अश्या अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत त्याकडे शासन दुर्लक्ष करत आहे. या कारणास्तव शेतकऱ्यामधे प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. सोमवार दि.३ मार्च पासून राज्य




शासनाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होत आहे. या अधिवेशनामध्ये शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यात यावे या मागणीसाठी ट्रॅक्टर रॅली मोर्चा काढण्यात आला त्यानंतर तहसीलदारांना या सर्व मागणीची निवेदन देण्यात आले.
यावेळी काँग्रेसचे अमोल कुतवळ, धीरज पाटील, रणजीत इंगळे, भाऊ भांजी, यांच्यासह काँग्रेसचे सर्व पदाधिकारी, कार्यकत, सदस्य यांची उपस्थिती होती.

## हुतात्मा स्मारकातील बाबुंची झाडे वाळली; नळदुर्ग नगर पालिकेचे दुर्लक्ष!

**तभा वृत्तसेवा / विलास येडगे**
**नळदुर्ग, दि.३ मार्च -**
नळदुर्ग नगरपालिकेच्यावतीने हुतात्मा स्मारकात लावण्यात आलेले बांबुची झाडे केवळ पाण्याअभावी वाळुन गेली आहेत. संपुर्ण शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या नगरपालिका प्रशासनाला हुतात्मा स्मारकातील झाडांना पाणी का देता आले नाही? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.
आज शासन झाडे लावा, झाडे जगवा यावर कोट्यावधी रुपये खर्च करत आहे. निसर्गाचा समतोल टिकवुन ठेवण्यासाठी वृक्ष लागवड करुन त्याची



जोपासना करणे ही आज काळाची गरज बनली आहे. कारण आज मोठ्या प्रमाणात वृक्ष तोड झाल्यामुळे निसर्ग असंतुलित झाला आहे. त्यामुळे सरकारने वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घेतला आहे. नळदुर्ग नगरपालिकेनेही शहरातील विविध भागात वृक्ष लागवड करुन वृक्ष जोपसण्याचे काम केले आहे. मात्र येथील हुतात्मा स्मारकात लावण्यात आलेली झाडे केवळ झाडांना पाणी मिळाले नाही म्हणुन झाडे वाळुन गेली आहेत. ही अतिशय दुर्दैवाची बाब आहे.
हुतात्मा स्मारकात प्रवेशद्वार ते स्मारकातील हुतात्मा स्तंभा पर्यंत नगरपालिकेच्यावतीने बांबुची झाडे लावण्यात आली आहेत. ही बांबुची झाडे अतिशय चांगल्या प्रकारे आल्याने हुतात्मा स्मारकात प्रवेश केल्यानंतर ती हिरवीगार बांबुची झाडे पहिल्यानंतर मन प्रसन्न होत होते. मात्र सध्या केवळ या झाडांना पाणी मिळाले नाही म्हणुन ही बांबुची झाडे वाळुन गेली आहेत.
नगरपालिकेचे मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांनी या प्रकरणी तात्काळ लक्ष घालुन हुतात्मा स्मारकातील झाडांना पाणी कसे उपलब्ध करून देता येईल हे पाहण्याची गरज आहे. हुतात्मा स्मारकापासुन थोड्याच अंतरावर राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौकात नगरपालिकेची बोअर असुन या बोरअला मुबलक पाणी आहे. हे पाणी जलवाहिनीद्वारे हुतात्मा स्मारकात पोहचवुन तेथील झाडांना देता येऊ शकते.

**झाडांना पाणी देण्याची वृक्षप्रेमीची मागणी...**

जी नगरपालिका संपुर्ण गावाला पाणीपुरवठा करते त्या नगरपालिका प्रशासनाला हुतात्मा स्मारकातील झाडांना पाणीपुरवठा का करता येत नाही असा प्रश्न नागरीकांमधुन विचारला जात आहे. आजही या बांबुच्या झाडांना पाणी मिळाले तर ते पुन्हा पुर्वीसारखे हिरवीगार होण्याची शक्यता आहे.

## मनपासमोर काँग्रेसचे विविध मागण्यांसाठी आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड ,दि. ०३ मार्च**

राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनच्या पहिल्याच दिवस राज्यभरासह नांदेड मध्ये देखील शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने खा. रवींद्र चव्हाण यांच्या विशेष उपस्थितीत व उत्तर जिल्हाध्यक्ष बी.आर.कदम, दक्षिण जिल्हाध्यक्ष हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार यांच्या नेतृत्वात ग्रामीण व शहरी समस्येविरोधात सोमवार (ता.३) रोजी मनपा समोर तीव्र आंदोलन करण्यात आले.



शेतकऱ्यांना कर्जमाफी द्या, शेतमालाला हमीभाव द्या, शेतीला अखंडीत वीजपुरवठा करा. पीकविमा त्वरित शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करा आदीसह नांदेड शहरातील मुलभूत सुविधा द्या. कचरा, रस्ते, पाणी, विद्युत पुरवठा आदी सुरळीत सुरू असाव्यात अशी मागणी यावेळी करण्यात आली. खा. रवींद्र चव्हाण यांनी शेती प्रश्न आणि शहरातील मुलभूत सुविधा आदी समस्येकडे लक्षवेधत केंद्र व राज्य सरकारवर जोरदार प्रहार केला. यावेळी आंदोलनाचे प्रस्तावित व सुत्रसंचालन कार्याध्यक्ष बालाजी चव्हाण यांनी केले. यावेळी अनेकांनी विचार मांडले. खा. रविंद्र चव्हाण, उत्तर जिल्हाध्यक्ष बी. आर. कदम, दक्षिण जिल्हाध्यक्ष हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार, डॉ. श्रावण रेपनवाड, ॲड. सुरेंद्र घोडसकर, राजेश पावडे, केदार पाटील सांळुखे, एकनाथ मोरज, जयश्री पावडे, शमिम अब्दुला, प्रफुल्ल सावंत, शेर अल्ली, मुसुद खान, अब्दुल गफार, महेश देशमुख तरोडेकर, अजिज कुरेशी, संजय शेळगावकर, विठ्ठल पावडे, विलास पावडे, सुरेश हटकर, सतिश देशमुख तरोडेकर, सत्यपाल सावंत, मुन्ना अब्बास, गंगाधर सोनकांबळे, डॉ. रेखा चव्हाण, बालाजी गाडे, अतुल पेदेवाड, शंकर शिंदे, डॉ. करुणा जमदाडे, बापूसाहेब पाटील, मुन्तजिब, रहिम खान, प्रताप देशमुख, संदिप देशमुख, माधव पवळे, गणेश पाटील, ज्योती कदम, नसिम पठाण, संतोष कांबळे, दिपकसिंग हजुरीया, गगन यादव, संजय वाघमारे, अभिलाष पावडे, अनिल ठाकूर, अनिल कांबळे, अनिल चिमेगावकर, प्रा. वानोळे, उद्धव लांडगे, महेश शिंदे, अंबादास रातोळे, गोविंद पाटील, धनंजय उमरेकर आदीसह इतर पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'स्वारातीम' विद्यापीठाच्या प्र-कुलगुरुपदी डॉ. अशोक महाजन रुजू

**तभा वृत्तसेवा**
**नविन नांदेड,दि. ०३ मार्च**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्र-कुलगुरूपदी डॉ. अशोक महाजन हे दि. ३ मार्च रोजी रुजू झाले आहेत. डॉ. महाजन हे विद्यापीठाचे पाचवे प्र-कुलगुरू म्हणून रुजू झाले आहेत. यापूर्वी डॉ. एस.एस. ऊके, डॉ. जे.एन. शिंदे, डॉ. जे.एन. बिसेन आणि डॉ. माधुरी देशपांडे (प्रभारी) यांनी या पदावरील कामे पाहिले आहेत.



डॉ. महाजन यांना अध्यापन, संशोधन आणि शैक्षणिक प्रशासन यामधील कामाचा ३७ वर्षापेक्षाही अधिक अनुभव आहे. इलेक्ट्रॉनिक विषयांमध्ये डॉक्टरेट असणारे डॉ. महाजन यांनी जळगाव येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात २२ वर्षे अध्यापन केलेले आहे. त्यापैकी पाच वर्षे विद्यापीठ प्रशासनातील प्रमुख अशा 'कुलसचिव' पदावर त्यांनी काम केले आहे. त्यापूर्वी नांदेड जिल्ह्यातील धर्माबाद येथील लालबहादूर शास्त्री महाविद्यालयांमध्ये जवळपास १५ वर्षे त्यांनी अध्यापन व संशोधन केले आहे. जगभरातील जवळपास २९ देशांना त्यांनी शैक्षणिक कमानिमित्त भेटी दिल्या आहेत. असा प्रदीर्घ शैक्षणिक, संशोधकीय आणि प्रशासकीय अनुभव असणारे डॉ. महाजन यांचा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाला निश्चितच फायदा होईल, अशी अपेक्षा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी व्यक्त करून त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. या शिवाय विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. डी.डी. पवार, अधिष्ठाता डॉ. एम.के. पाटील, डॉ. पराग खडके, डॉ. चंद्रकांत बाविस्कर, डॉ. डी. एम. खंदारे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, वित्त व लेखाधिकारी मोहमद शकील, डॉ. शैलेश वाढेर, डॉ. जगदीश कुलकर्णी, डॉ. सूर्यप्रकाश जाधव, क्रीडा विभागाचे संचालक डॉ. भास्कर माने, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम यांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## संक्षिप्त वृत्त



### मोमीन शेख निसार महेबूब यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा

**मुखेड**-तालुक्यातील अशोक विद्यालय एकलारा येथे गेल्या ३ दशकांपासून माध्यमिक सहशिक्षक गणित विज्ञानाचे विषयाचे विशेष शिक्षक म्हणून मोमीन शेख निसार महेबूब यांनी विद्यार्थ्यांना अध्यापनाचे धडे दिले.शेख सर यांचा प्रदिर्घ सेवेनंतर ते वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. सेवानिवृत्ती निमित्त संस्थेच्या वतीने निरोप समारंभ व गौरव सन्मान सत्योकार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेच्या मुख्याध्यापिका चिंतेवार मॅडम यांच्या सह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सेवानिवृत्ती निमित्त विशेष सत्कार करून कार्यक्रमाची सुरुवात केली उपस्थितांनी आपल्या मनोगतातून मोमीन सरांच्या शैक्षणिक व सामाजिक योगदानाची प्रशंसा केली व त्यांच्या सेवानिवृत्त जीवनासाठी शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमास आजी - माजी विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुवर्य शिक्षकांच्या आठवणींना उजाळा दिला कार्यक्रमाच्या शेवटी मोमीन शेख सरांनी सर्व सहकाऱ्यांसह विद्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांचे अभार मानले. यावेळी अशोक विद्यालयाचे मुख्याध्यापीका सौ.कविता चिंतेवार मॅडम, म्यानेवार सर, वाघमारे सर, बिरादार सर, शेख सर,कागणे सर, पुरमवार सर ,वडजे मॅडम, तांबोळी सर, सोनकांबळे सर यांच्या सह कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अशोक सोनकांबळे यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश



**नांदेड**-लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे विकासाभिमुख लोकप्रिय आमदार तथा नांदेड जिल्ह्याचे माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या खंबीर नेतृत्वावर विश्वास ठेवून काल दि.२ मार्च रविवार रोजी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या नांदेड येथील साई सुभाष निवासस्थानी राष्ट्रवादी अजित दादा पवार गटात जाहीर प्रवेश केला. यावेळी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी अशोक सोनकांबळे यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात शाल श्रीफळ पुष्पहार घालून स्वागत करून पक्ष प्रवेश केला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी आंबेडकरी चळवळीचे युवा नेते रवि गायकवाड, लोहा नगर परिषदेचे माजी नगरसेवक भास्कर पाटील पवार, शिक्षण जिल्हा पतपेढीचे चेअरमन अशोक पाटील मारतळेकर, उपाध्यक्ष सुहास मुळे, सचिन पवारसह मित्रपरिवार उपस्थित होता.

### कासराळीच्या कु. आएशा या चिमुकलीचा पहिला रोजा पूर्ण

**आदमपूर**-बिलोली तालुक्यातील कासराळी येथील सध्या नायगांव येथे वास्तव्यास असलेले सेवानिवृत्त एसटी वाहक शहा मैनोदीन हुसेनीशहा यांची मुलगी कु.शहा आएशा कासराळीकर हिचा रमज़ान मासारंभ मधील पहिला रोजा संपन्न झाला. कु.आयशा या चिमुकलीने आपल्या बाल आयुष्यातील पहिला रोजा(उपवास) ठेवल्याने सर्व मुस्लिम समाज बांधवांनी तिचे विशेष कौतुक केले आहे. आयशा ही आठ वर्षाची आहे. ती नायगांव येथील ब्लू बेल्स इंग्लिश शाळेत इयत्ता दुसरीत शिकत आहे. वडील सेवानिवृत्त वाहक शहा मैनोद्दिन,शहा अहेमद टेलर,महसूल सहाय्यक शहा अजिमोद्दीन, बँक सहाय्यक महमदरफी मदार,माजी बँकर फक्रूशा मदार, शेख गौस,शहा उस्मान, कवी, गीतकार जाफर आदमपूरकर आदींनी कु.आएशाचे विशेष अभिनंदन केले आहे.



## वादग्रस्त सायफळ वाळू घाट पुन्हा काढला खोदून

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. ०३ मार्च**

तालुक्यातील पैनगंगा नदी पात्राजवळील अतिदुर्गम भागात असलेल्या सायफळ वाळू घाटावरून वाळू चोरी करण्याचा प्रयत्न सुरु असून, यापूर्वी एकदा खोदलेला वाळू घाट वाळू तस्करांनी बुजवून रस्ता बनवत वाळू चोरी करण्याचा प्रयत्न होत असल्याची माहिती मिळाल्याने सहाय्यक जिल्हाधिकारी मेघना कावली, तहसीलदार किशोर यादव यांच्या आदेशाने नायब तहसीलदार कैलास जेठे यांनी मध्यरात्रीला सदरील ठिकाणी जाऊन पोलीस बंदोबस्तात तो वादग्रस्त सायफळ घाट पुन्हा एकदा खोदून काढत वाळू तस्करीचा रस्ता बंद केला.

त्यांच्या या धडक कारवाईचा जबरदस्त धसका घेऊन वाळू तस्करांमध्ये भागमभाग माजली असल्याचे दिसून येत आहे.

नुकतेच पडसा येथे कर्मचाऱ्यांना वाळू तस्करांनी धमकी दिली तर कालच अनमाळ ते हडसणी रस्त्यावर वाळू तस्करांनी महसूल पथकाला ६ किलोमीटर पळवत गुंगारा देऊन ट्रॅक्टर घेऊन पोबारा केल्याची घटना घडल्यानंतर यावर खबरदारी म्हणून 'ना रहेगा बास ना बजेगी बांसुरी' या उक्तीप्रमाणे वाळू चोरीसाठी रस्ताच राहू नये या उद्देशाने नायब तहसीलदार कैलास जेठे यांनी दि.०२ व ०३ च्या मध्यरात्री सायफळ घाटावर खंदक खोदण्याची धडक कारवाई केली.

या कारवाईवेळी पोलीस पाटील हेमंत गावंडे पाटील, सपोउपनी संजीवन त्र्यंबकराव सानप, होमगार्ड पुरुषोत्तम नेवारे, होमगार्ड वसीम पठाण सोबत होते.

## विविध मागण्यांसाठी उद्या एकदिवसीय धरणे आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**नरसी,दि. ०३ मार्च**

एसबीसी अन्याय निवारण कृती समिती व विणकर सेवा संघ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने विविध मागण्यासाठी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर साखळी उपोषण व धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनाला पाठींबा म्हणून युनायटेड पद्मशाली संघटनेच्या वतीने उद्या दि. ५ मार्च रोजी जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. तरी पद्मशाली समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन युनायटेड संघटनेचे प्रदेशाध्यक्ष रोहीत अडकटलवार यांनी केले आहे.



वैद्यकीय, अभियांत्रिकी व इतर उच्च शिक्षणात विशेष मागास प्रवर्गासाठी (एस.बी. सी.) २ टक्के स्वतंत्र आरक्षण २०२५ च्या सत्रापासून लागू करावे. विशेष मागास प्रवर्गासाठी राज्यात १० आश्रम शाळा सुरू कराव्यात. विशेष मागास प्रवर्गासाठी २ टक्के राजकीय आरक्षण लागू करावे. विद्यार्थीना जात पडताळणी प्रमाणपत्र तत्काळ दयावे, विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना राज्य शासनाच्या योजना साठी एस.बी.सी. व केंद्र शासनाच्या योजनासाठी ओ.बी.सी. प्रमाणपत्र द्यावे, विशेष मागास प्रवर्गासाठी स्वतंत्र आर्थिक महामंडळ स्थापन करावे, एसबीसी विद्यार्थी साठी स्वतंत्र वस्तीगृह सुरू करावे, एसबीसी कर्मचाऱ्यांना शासकीय व निमशासकीय सेवेत पदोन्नती दयावी व विणकरांचे प्रश्न सोडविण्यासाठी विणकर आर्थिक महामंडळावर विणकरांची नियुक्ती करून लवकरात लवकर काम सुरू करावे. यासाठी एसबीसी अन्याय निवारण कृती समिती व विणकर सेवा संघ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने विविध मागण्यासाठी साखळी उपोषण व धरणे आंदोलन पुणे येथे जिल्हाधिकारी कार्यालयात बुधवार दि. ५ ते ९ मार्च दरम्यान आंदोलन करण्यात येणार आहे. पुणे येथे होणार आंदोलनाला पाठींबा देण्यासाठी काल दि. २ मार्च रोजी अखिल भारत युनायटेड पद्मशाली संघम संलग्न महाराष्ट्र राज्य युनायटेड पद्मशाली संघम व मराठवाडा युनायटेड पद्मशाली संघम सर्व प्रौढ युवक व महिला नांदेड जिल्हा व तालुका युनायटेड पद्मशाली संगमची महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष रोहित अडकटलवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. यावेळी पुणे येथील आंदोलनाला पाठींबा म्हणून नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दि. ५ मार्च रोजी सकाळी १० ते ५ वाजेपर्यंत धरणे आंदोलन करण्यात येणार आहे तरी समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन अडकटलवार यांनी केले आहे.

## कुंडलवाडीत अज्ञात चोरट्याने फोडली दोन दुकाने

**तभा वृत्तसेवा**
**कुंडलवाडी,दि. ०३ मार्च**

शहरात दि.२ मार्च रोज रात्री दोन दुकाने चोरट्यांनी फोडल्यामुळे शहरात भीतीचे वातावरण पसरले असून या प्रकरणी कुंडलवाडी पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपी विरूध्द गुन्हा दाखल झाला आहे.



कुंडलवाडी येथील मुख्य बाजार पेठेतील मैनोद्दिन मगदूम शेख व बाबा चुडीवाले यांनी नेहमी प्रमाणे आपली दुकाने उघडण्यासाठी दि.३ मार्च रोजी सकाळी आले असता चोरी झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. घटनेची माहिती मिळताच पोलिस निरक्षक ज्ञानेश्वर शिंदे यांनी यांनी भेट देऊन दोन्ही दुकानाची पाहणी केली. शेख मैनोद्दीन मगदूमसाब भूसार दुकान यांनी काऊंटरमधील पन्नास हजार रूपये नगदी चोरट्यांनी नेले असल्याची तक्रार कुंडलवाडी पोलिस ठाण्यात दिली. तसेच रहीम किराणा दुकानातून चोरट्यानी नगदी (चिल्लर)आठ हजार रूपये चोरल्याचे तक्रार बाबा यांनी केले त्या वरून कुंडलवाडी पोलिस ठाण्यात अज्ञात इसमा विरुध्द गुन्हा दाखल केला असून पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे पुढील तपास करीत आहेत.

## दिलेल्या शब्दाप्रमाणे कर्जमाफी जाहीर करा : कलंबरकर

**तभा वृत्तसेवा**
**मुक्रमाबाद,दि. ०३ मार्च**

राज्यातला शेतकरी आर्थिक संकटात आहे. शेतीचा खर्च वाढला पण शेतीमालाचा भाव वाढला नाही.त्यामुळे शेतकऱ्यांवर कर्जाचा डोंगर वाढला.कालच्या विधानसभा निवडणूकीत सत्ता आली तर शेतकऱ्यांची पूर्ण कर्जमाफी करू,शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करू (कर्जमुक्त करू) अशी घोषणा मा.देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडून करण्यात आली होती.त्यामुळे शेतकऱ्यांनी मोठ्या अपेक्षेने महायुतीला सत्ता दिली.आणि मा.देवेंद्रजी मुख्यमंत्री झाले. आता दिलेल्या शब्दाप्रमाणे पूर्ण कर्जमाफी जाहीर करावी अशी मागणी मा.ना.मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्याकडे मा.तहसीलदार राजेश जाधव यांच्यामार्फत शेतकरी संघटनेचे शिवशंकर पाटील कलंबरकर यांनी दिनांक ३ मार्च रोजी निवेदनातून केली आहे. दिलेल्या शब्दाप्रमाणे ३ मार्च पासून सुरु झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात चालू व थकीत शेतकऱ्यांची पूर्ण कर्जमाफी जाहीर करावी. दरवेळी थकीत शेतकऱ्यांची कर्जमाफी होते.त्यामुळे चालू शेतकऱ्यांवर अन्याय होतोय.कर्जमाफी झाली तर शेतकऱ्यांच्या डोक्यावरचा कर्जाचा डोंगर कमी होईल.शेतकऱ्याला मोकळा श्वास घेता येईल. सरकारने दिलेल्या शब्दाप्रमाणे कर्जमाफी केली नाही तर शेतकरी सरकारच्या शब्दावर विश्वास ठेवणार नाही आणि भविष्यात शेतकरी कर्जमाफीसाठी रस्त्यावर येईल.म्हणून सरकारने दिलेल्या शब्दाप्रमाणे पूर्ण कर्जमाफी जाहीर करावी अशा इशारा निवेदनात दिला आहे.

## मुदखेड येथील बौद्ध धम्म परिषद उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. ०३ मार्च**

मुदखेड शहरात दर वर्षी प्रमाणे याही वर्षी तिसरी अखिल भारतीय बौध्द धम्म परिषद दि. ०२ मार्च रोजी मोठ्या उस्ताहात साजरी करण्यात आली.



सर्व प्रथम सकाळी ठिक ८:३० वाजता भिख्खू संघाच्या हस्ते पंचशील ध्वजारोहण करण्यात आले. समता सैनिक दलाच्या वतीने पंचशील ध्वजास सलामी देत जय भीम चे आणि बौद्ध धम्माचा विजय असो अशा घोषणा देत ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न झाला. यानंतर ९:३० वाजता बौद्ध धम्म रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये समता सैनिक दलाचे पथसंचलन बौद्ध प्रशिक्षण केंद्र येथून भीम नगर,जुने पोलीस स्टेशन मराठा गल्ली, गुजरी मोहल्ला,मोंढा भागातून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या नियोजित पुतळ्याच्या ठिकाणी या बौद्ध धम्म रॅलीची सांगता करण्यात आली आहे. यानंतर दुपारी १२:३० वाजता तथागत भगवान गौतम बुद्ध व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून तिसऱ्या धम्म परिषदेचे उद्घाटन डॉ. उपगुप्त महाथेरो पुर्णा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ खेम धम्मो महाथेरो मूळावा, डॉ सत्यपाल महाथेरो संभाजीनगर, पययानंद थेरो लातूर, डॉक्टर इंदवंश महाथेरो औरंगाबाद, भिकुनी चारुशीला थेरी नांदेड, शीलरत्न थेरो नांदेड, पयारतन थेरो, महाकाशप थेरो,भिख्खू गगनबोधी मुदखेड, यांनी उपासक उपासिकांना धम्मदेसना दिली.

रात्री ८:०० वाजता प्रा. नितेश कराळे, कवि दंगलकार नितीन चंदनशिवे, समता सैनीक दलाचे मार्शल सारीपुत यांची व्याख्याने झाली. या धम्म परिषदे निमित्ताने त्यांनी युवकांना मार्गदर्शन केले. आणि सांगीतले आहे कि आजच्या युवकांनी आंबेडकर चळवळ जिवंत ठेवली पाहिजे आणि चळवळीचा रथ पुढे घेऊन गेला पाहिजे, युवकांनी व्यसनाच्या आहारी न जाता आय पी एस सी, यूपीएससी, याची तयारी केली पाहिजे.

असे प्रमुख व्याख्याते यांनी उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी भिमनगर, अशोका नगर, नविअबादी, लुबिंनी नगर, समता नगर, रेल्वे कॉलोनी,भिख्खू संघ बौद्ध तालुक्यातील व शहरातील उपासक,उपासिका, बालक बालिका, जेष्ठ नागरीक व युवकांची मोठ्या संख्येने उपस्थीती हाती.

## पंकज नगरात घरफोडी; रोख ५ हजार रूपयांसह लाखोंचे दागिने लंपास

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. ०३ मार्च**

पंकज नगर येथे चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून घरातील रोख ५ हजार रुपयांसह सुमारे लाख रुपयांचे दागिने चोरून नेले. ही घटना २८ फेब्रुवारीच्या मध्यरात्री घडली . १ मार्च रोजी दुपारी साडेचार वाजेचेदरम्यान, पंकजनगर धनेगाव घडली असून, याप्रकरणी नांदेड ग्रामीण ठाण्यात ३ मार्च रोजी गुन्हा नोंदविण्यात आला.

नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पंकजनगर, धनेगाव येथील रहिवासी राहूल गोणे तसेच त्यांचे कुटुंबीय २८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी साडेपाच वाजेदरम्यान, माळाकोळी येथे गेले. दरम्यान, राहूल गोणे यांच्या घरातील सर्व मंडळी घराला कुलूप लावून बाहेरगावी गेल्याची संधी साधून अज्ञात चोरट्यांनी २८ फेब्रुवारीच्या रात्री ते १ मार्च रोजी दुपारी साडेचार वाजेदरम्यान, गोणे यांच्या घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश मिळवला. त्याचवेळी चोरट्यांनी गोणे यांच्या घरातील पलंगाच्या बॉक्समध्ये ठेवलेल्या डब्यातील रोख ५ हजार रुपयांसह सोन्या-चांदीचे दागिने असा एकूण १ लाख रूपये किंमतीचा ऐवज चोरून नेला असल्याची माहिती पोलीस ठाणे अंमलदार शंकर नलबे व मदतनीस अंमलदार तुकाराम नागरगोजे यांनी दिली.

या प्रकरणी राहूल पुंडलिक गोणे यांच्या तक्रारीआधारे नांदेड ग्रामीण ठाण्यात ३ मार्च रोजी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांचे मार्गदर्शनाखाली बीट अंमलदार हरीश मांजरमकर व त्यांचे सहकारी कर्मचारी या प्रकरणाचा तपास करीत आहेत.

## हिंदु मंदीरांतील हजारो कोटी रुपये शासनाच्या तिजोरीत : देवकीनंदन ठाकूर

**तभा वृत्तसेवा**
**कंधार,दि. ०३ मार्च**

हिंदूस्थानातील बहुंताश मंदिरे शासनाच्या अधिकाराखाली आहेत या मंदीरावर शासनाचा कब्जा असुन मंदिरातील जमलेले हाजारो कोटि रुपये शासनाच्या तिजोरीत जमा होत आहेत परंतु ह्या रुपयाचा फायदा हिंदूना होत नसुन हा ईतरत्र वापरला जात आहे शासनाने सनातन बोर्ड स्थापन करुन मंदीरातील पैसा या बोर्डाच्या माध्येमातुन हिंदु समाजाच्या प्रगती करीता वापरला जावा असे प्रतिपादन् आंतरराष्ट्रीय कथाकार देवकीनंदजी ठाकुर यांनी श्री क्षेत्र उमरज येथील येथील कार्यक्रमात हाजारो भाविकभकांना संबोधताना केले . श्री क्षेत्र उमरज येथे १०८ कुंडी यज्ञ व कलशारोहण कार्यक्रमा निमित्त दिनांक २७ फेब्रुवारी रोजी पासुन आंतराष्ट्रीय कथाकार देवकीनंदजी ठाकुर यांच्या मधुर वाणीतुन भागवत कथेस प्रारंभ झाले आज दिनांक ३ फेब्रुवारी रोजी कथेच्या पाचव्या दिवशी हाजारो जनसमुदायांना संबोधताना पुढे असे म्हणाले कि हिदुस्थान मध्ये हिंदु धर्मावर शासनाकडून अन्याय होत आहे देशातील हिंदु मंदिरातील प्रत्येक दिवशी ५ हजार कोटि रुपये शासनाच्या तिजोरीत जमा होत आहेत याचा उपयोग शासनाने सनातन बोर्ड स्यापन करुन या बोर्डाच्या मार्फत फक्त हिंदु समाजातील मुला मुलीच्या शिक्षण , आरोग्य ,युवकांचा उद्योग निर्मिती साठी झाला पाहीजे.



सनातन बोर्ड सनातन संस्कृतीचे रक्षण करेल आणि येणाऱ्या पिढ्यांसाठी उपयुक्त ठरेल. वक्फ बोर्ड असू शकतो, तर सनातन बोर्ड का होऊ शकत नाही ?असा सवाल शासनाला ठाकुर यांनी केला .जो मदिरा दारु पीतो.जुवा खेळतो तो अशा लोकांची जो संगत करतो तो कदापि सनातनी आसु शकत नाही .तुम्ही धर्माची रक्षा धर्म तुमची रक्षा करेल .या कार्यक्रमाला आलोट जनसमुदाय उपस्थितीत होता .

श्रीक्षेत्र उमरज येथे महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा भा.ज.पा.चे राज्यसभेचे खासदार अशोकराव चव्हाण हे या कार्यक्रमात बोलताना असे म्हणाले नामदेव महाराज देवस्थान श्री क्षेत्र उमरज चे मठाधीपती एकनाथ महाराज यांनी खुप मेहनतीने मंदीराचे काम पुर्ण केले या नामदेव विठ्ठल मंदिराला पाहिल्या नंतर आयोध्यातील राममंदीराची आठवण झाली .केंद्रातील सरकार व राज्ये सरकार आमचेच आहे त्यामुळे या देवस्थान ला ब दर्जा मिळवुन देण्यास कट्टिब्दध आहे .असे चव्हाण म्हणाले यावेळी मठाधीपती एकनाथ महाराज ,एकनाथ दादा पवार आमदार प्रतापराव पाटिल चिखलीकर यांच्या अर्धागंणी प्रतिभाताई चिखलीकर ,भा.ज.पा.चे जिल्हाअध्यक्ष संतुकराव हंबर्डे ,संतोष पांडागळे ,चंद्रसेन पाटिल ,यांच्यासह आदि कार्यकर्त्ते उपस्थितीत होते.

## छत्रपती शिवाजी हायस्कूल सगरोळीची राज्यस्तरीय स्वच्छतेत चमकदार कामगिरी!

**तभा वृत्तसेवा**
**सगरोळी,दि. ०३ मार्च**

संस्कृती संवर्धन मंडळ संचालित छत्रपती शिवाजी हायस्कूल, सगरोळीच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छतेचा नवा आदर्श निर्माण करत संपूर्ण राज्यात आपल्या शाळेचे नाव उज्ज्वल केले आहे. 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा टप्पा २' या राज्यस्तरीय उपक्रमांतर्गत आयोजित 'स्वच्छता मॉनिटर' स्पर्धेत उल्लेखनीय यश मिळवत राज्यातील टॉप २५ शाळांमध्ये स्थान मिळवले आहे.विद्यार्थ्यांनी ४८६ व्हिडिओ आणि पोस्ट्स अपलोड करत तब्बल ११,८३७ गुण प्राप्त केले आणि राज्यभरात आपला दबदबा निर्माण केला आहे. विशेष म्हणजे, या स्पर्धे च्या पहिल्या टप्प्यात छत्रपती शिवाजी हायस्कूल, सगरोळीने लातूर विभागात प्रथम क्रमांक पटकावला होता.राज्यातील १.५ लाखांहून अधिक शाळांनी या स्पर्धे त सहभाग घेतला होता, त्यामुळे छत्रपती शिवाजी हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश अत्यंत गौरवास्पद आहे. विद्यार्थ्यांनी परिसर स्वच्छ ठेवण्याबरोबरच समाजात स्वच्छतेबाबत जनजागृती करण्याचा महत्वपूर्ण संदेश दिला. त्यांनी लघु व्हिडिओ तयार करून 'स्वच्छता मॉनिटर' फेसबुक पेजवर अपलोड केले, ज्यामुळे त्यांचे कार्य राज्यभर पोहोचले.या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री. प्रदीप जाधव यांनी विशेष पुढाकार घेतला, तसेच शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे मेहनत घेतली. या उल्लेखनीय कामगिरीमुळे छत्रपती शिवाजी हायस्कूल, सगरोळीचे राज्यभरातून कौतुक होत आहे आणि संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण आहे.संस्कृती संवर्धन मंडळ संचालित छत्रपती शिवाजी हायस्कूल, सगरोळीच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छतेच्या चळवळीत आपली महत्त्वपूर्ण भूमिका बजावत संपूर्ण राज्यात आदर्श निर्माण केला आहे .




**'स्वच्छता मॉनिटर' स्पर्धेत राज्यातील टॉप २५ शाळांमध्ये मानाचे स्थान!**

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महामार्गावर बस झाली पलटी,२५ प्रवासी जखमी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर , दि.३ मार्च -**
चाकूर तालुक्यातील लातूर - नांदेड महामार्गावरील नांदगाव जवळ एक भयानक अपघाताची घटना घडली दि.०३ मार्च रोजी घडली आहे. यामध्ये एस.टी. बस उलटून २० ते २५ प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

लातूर-चाकूर मार्गावरील नांदगावपाटीजवळ हा भीषण अपघात झाला आहे. अपघातग्रस्त बस अहमदपूरवरून लातूरच्या दिशेने येत होती. नांदगावपाटीजवळ अचानक मोटारसायकल बससमोर आली.



मोटारसायकल चालकाला वाचवण्याच्या प्रयत्नात बस चालकाचे बस वरील नियंत्रण सुटले आणि बस अनियंत्रित झाली.मोटारसायकल स्वाराच्या चुकीमुळे हा अपघात झाला. ही बस उलटल्याने बसमधील २० ते २५ प्रवासी गंभीर जखमी झाले असून एका प्रवाशाचा हात तुटून बाजूला पडला आहे.

ही संपूर्ण अपघाताची घटना त्या ठिकाणी असलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे.या अपघातात पंधरा जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना तातडीने लातूर येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. अपघातात अनेकांना जखम झाली असून अपघात स्थळी जखमी प्रवाशांची बोटे तुटून पडली आहेत. या अपघाताची माहिती मिळताच पोलिस आणि स्थानिक लोकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन जखमींना रुग्णालयात दाखल केले आहे.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

### संक्षिप्त वृत्त...

#### मेंढराचे कारण; दगडाने मारहाण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ मार्च -**
तुझे मेंढरं माझ्या शेतात का येऊ दिलास? असे म्हणून शिविगाळ करून मारहाण केली. डोक्यात दगड मारून जखमी केले. ही घटना तांबरवाडी येथे १ मार्च रोजी घडली. याबाबत निलंगा पोलिस ठाण्यात तुकाराम सिद्धू शेंडगे (५०, रा. मानेवाडी, ता.जि. विजापूर) यांनी दिलेल्या तक्रारीवरून लिंबराज किसन बिरादार (रा. तांबरवाडी, ता. निलंगा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल आहे.

#### हायवाची धडक; एक तरुण गंभीर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ मार्च -**
भरधाव हायवाच्या धडकेत दुचाकीवरील २५ वर्षीय तरुण गंभीर जखमी झाल्याची घटना कातपूर रोड येथे २६ फेब्रुवारी रोजी घडली. याबाबत विवेकानंद चौक ठाण्यात गुन्हा दाखल आहे. फिर्यादी बिरजू मनोहर कतारी (रा. वीर हनुमंतवाडी, लातूर) हा तरुण दुचाकीवरून (एमएच २४ बीक्यू ८३४१) जात होता. यावेळी हायवाने (एमएच १२ एफसी ६६१०) जोराची धडक दिली.

#### विभागीय आयुक्तालय लातूरला झाले पाहिजे : माजी आ. कव्हेकर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ मार्च -**
मराठवाडयामध्ये नवीन महसुल अयुक्तालय व्हावे अशी मागणी गेल्या अनेक वर्षापासुनची आहे. माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी आयुक्तालयासाठी सध्याचे कलेक्टर कार्यालय बांधले आहे. लातूरला आजपर्यंत २६ विविध खात्याचे विभागीय कार्यालय सुरूवात झाली आहेत. धाराशिव, बीड व लातूर साठी लातूर हेच मध्यवर्ती ठिकाण आहे. शासनाने आयुक्तालय संदर्भात माजी अयुक्त दांगट यांची कमिटी नियुक्त केली होती. त्यानी या संदर्भात अहवाल दिला आहे. त्याची पाहणी करून कार्यालय लातूर येथे करावे अशी मागणी माजी. आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी लातूर येथील आयुक्तालय संदर्भात बैठकी समोर विचार मांडले. यावेळी अॅड.व्यंकटराव बेद्रे, अॅड.उदय गवारे, अशोकराव गोविंदपूरकर, शिवाजीराव नरहरे उपस्थित होते.

#### रस्त्यावरच वाहन उभा केल्या प्रकरणी चालकावर खटला

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ मार्च -**
रस्त्यावर वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या ऑटो चालकावर शिवाजीनगर पोलिस ठाण्यात खटला दाखल करण्यात आला आहे. चालकाने आपला ऑटो (एमएच २४ एटी ८४२०) हा छत्रपती शिवाजी महाराज चौक ते रेणापूर नाका जाणाऱ्या मार्गावर थांबवून वाहतुकीला अडथळा निर्माण केला. याबाबत राजकुमार सोनवणे (४०) यांनी तक्रार दिली आहे.

#### क्षुल्लक कारण; केली जबर मारहाण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ मार्च -**
माझ्या घरासमोर बसायचे नाही, असे म्हटले असता शिविगाळ करून विटाने डोक्यात मारून जखमी केल्याची घटना लातूर शहरातील राजीव नगर भागात १ मार्च रोजी घडली. याबाबत विवेकानंद चौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
पोलिसांनी सांगितले, फिर्यादी रमेश शेषेराव संमुखराव (४५, रा. राजीव नगर, लातूर) यांना महादू दिलीप संमुखराव याने शिविगाळ करीत डोक्यात विटाने मारून जखमी केले. शिवाय, भांडण सोडविण्यासाठी पत्नी समोर आली असता तिलाही मारहाण केली. फिर्यादी व फिर्यादीच्या पत्नीस, कुटुंबास जिवे मारण्याची धमकी दिली. याबाबत विवेकानंद चौक पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनंतर १ मार्च रोजी महादू संमुखराव याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सहायक फौजदार वांगे करीत आहेत.
केवळ क्षुल्लक कारणावरून ही मारहाण झाल्याचे पोलिसांनी सांगितले. माझ्या घरासमोर बसायचे नाही असे म्हटले असता फिर्यादी आणि त्यांच्या पत्नीला मारहाण करण्यात आल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

## स्वच्छता अभियानात शहरातून झाले १२० टन कचरा संकलन

### लातूरला स्वच्छतेचे महत्व पटवून सदस्यांचा उत्स्फूर्त सहभाग



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ मार्च -**
शहरातील नागरिकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देत जनजागृती करण्यासाठी रायगड जिल्ह्याच्या रेवदंडा येथील डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान व लातूर महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने रविवारी शहराच्या मुख्य रस्त्यावर व गंजगोलाई सह विविध चौकांमध्ये स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

यावेळी दीड हजार सदस्यांनी स्वच्छतेत सहभागी होत ४९ टन ओला व ६९ टन सुका असा एकूण ११८ टन कचरा उचलण्यात आला. यासाठी लातूर महापालिकेने घंटागाडीसह सर्व यंत्रणा देऊन उचललेला कचरा डेपोवर नेऊन टाकला. हे स्वच्छता अभियान धर्माधिकारी प्रतिष्ठानचे डॉ. अप्पासाहेब धर्माधिकारी, डॉ. सचिन धर्माधिकारी व महापालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आले. या अभियानाची सुरुवात महात्मा गांधी चौकातून रविवारी (दि.२) सकाळी ८.३० वाजता महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे, गांधी चौक पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक केंद्रे, माजी महापौर सुरेश पवार, माजी नगरसेविका भाग्यश्री कौळखेरे, ज्योती आवसकर यांची उपस्थिती होती. यावेळी महात्मा गांधी चौक, गंजगोलाई, सुभाष चौक, अण्णाभाऊ साठे चौक, शाहू महाराज चौक, गूळ मार्केट परिसरातील मुख्य रस्ते, १४ व उपरस्ते ६ असे एकूण २० मार्गांवर स्वच्छता करण्यात आली. स्वच्छता अभियानात ४९ टन ओला व ६९ टन सुका कचरा जमा करण्यात आला.

कचरा उचलण्यासाठी महानगरपालिकेकडून २२ घंटा गाड्या, ५४ ट्रॅक्टर, २ पाण्याचे टँकर हे साहित्य उपलब्ध करण्यात आले होते. स्वच्छता अभियानासाठी तुळजापूर, परंडा, सावरगाव, अंबाजोगाई, उमरगा, येरमाळा, मुरूम, कळंब, उदगीर, धाराशिव, भूम, वाशी, अहमदपूर, परळी व लातूर आदी ठिकाणांहून आलेले दीड हजार सदस्य स्वतः स्वच्छतेचे साहित्य, स्वतःचे जेवण घेऊन स्वच्छता उपक्रमासाठी आले होते. या स्वच्छता अभियानात परिसरातील व्यापाऱ्यांनीही सहभाग नोंदवत स्वतःच्या दुकानापुढील स्वच्छता करण्यात हातभार लावला.



लातूरकरांचे ग्रामदैवत असलेल्या श्री. सिद्धेश्वर -रत्नेश्वर देवस्थानची यात्रा सध्या सुरू असून दररोज हजारो भाविक दर्शनासाठी गर्दी करत आहेत. यात्रा परिसराचे हे विहंगम दृश्य. (छाया: श्याम भट्टड)

## 'एचएसआरपी' नंबर प्लेटमधून होणार २० कोटींची उलाढाल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ मार्च -**
सन २०१९ पुर्वीच्या सर्वच वाहनांना हायसिक्युरिटी नंबरप्लेट बसविण्याचे आदेश परिवहन आयुक्तांनी काढले आहेत. या आदेशानूसार लातूर जिल्ह्यातील सुमारे ४ लाख वाहनांना 'एचएसआरपी'नंबरप्लेट बसवावी लागणार आहे. दुचाकी आणि ट्रॅक्टरला ४५० रुपये, तीन चाकी वाहनांसाठी ५०० रुपये आणि चारचाकी, अवजड वाहने ट्रेलर आदी प्रकारच्या वाहनांना ७४५ रुपये दर असअून त्यावर जीएसटी लागणार आहे.

जिल्ह्यातील ४ लाख वाहनधारकांना प्रत्येकी सरासरी ५०० रुपये खर्च गृहीत घरला तर यातून २० कोटी रुपयांची उलाढाल होणार आहे.

वाहनांच्या नंबरप्लेटमध्ये छेडछाड व बनावटगिरी करुन होणारे गुन्हे कमी करणे, रस्त्यावर धावणा-या वाहनांची ओळख पटविणे तसेच राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीकोणातून २०१९ पुर्वीच्या सर्वच वाहनांना हायसिक्युरिटी नंबरप्लेट बसविण्याचे आदेश परिवहन आयुक्तांनी काढले आहेत. येत्या ३१ मार्चपर्यंत हायसिक्युरिटी नंबरप्लेट बसवावी लागणार आहे. त्यानंतर मात्र मोटार वाहन कायद्यानूसार कारवाई होणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानूसार १ एप्रिल २०१९ पुर्वी उत्पादीत सर्व प्रकारच्या वाहनांना राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीकोणातून हायसिक्युरिटी नंबरप्लेट बसविण्यासाठी राज्य शासनाच्या परिवहन विभागाने निर्णय घेतला आहे. त्यामुळे जुन्या वाहनांना नवीन नंबरप्लेट बसविण्यासाठी राज्यात तीन संस्थांची निवड झाली आहे.

लातूरसाठी एफटीए सोल्यूशन्स प्रा. लि. ची नियुक्ती करण्यात आली आहे. नवीन नंबरप्लेट तयार करीत असताना वाहनांचा नोंदणी क्रमांक, चेसीस, इंजिन क्रमांक, वाहनमालकाचा मोबाईल नंबर एजन्सीकडे घेतला जात आहे.

नवीन पद्धतीने नंबरप्लेट न बसविल्यास वाहनधारकांवर कारवाई होणार आहे. त्यामुळे लातूर जिल्ह्यातील जवळपास ४ लाख वाहनधारकांना नंबरप्लेट बदलावीच लागणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

## काँग्रेसच्या मुख्य प्रतोदपदी अमित देशमुख यांची निवड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ मार्च -**
राज्य विधिमंडळाचे अधिवेशन सोमवारपासून मुंबईत सुरु झाली आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाने आपल्या विधीमंडळ पक्ष पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या आहेत. यामध्ये विधानसभेतील काँग्रेस पक्षाच्या मुख्य प्रतोदपदी माजी मंत्री आ. अमित देशमुख यांची नियुक्ती केली आहे.



पक्षाच्या वतीने विधानपरिषदेतील गटनेतेपदी सतेज पाटील यांची नियुक्ती करण्यात आली असून, विधिमंडळ पक्षाची जबाबदारी तरुण नेत्यांवर सोपवत काँग्रेस पक्षाने कार्यकर्त्यांना चांगला संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे. महाराष्ट्रातील सरकारवर अंकुश ठेवण्यासाठी काँग्रेस नव्या दमाची फौज हवी होती. पक्षाने प्रदेशाध्यक्ष म्हणून हर्षवर्धन सपकाळ यांची नियुक्ती केली आहे. काँग्रेसच्या विधिमंडळ पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्याही करण्यात आल्या आहेत.

विधानसभेतील काँग्रेस पक्षाच्या उपनेतेपदी अमीन पटेल यांची तर मुख्य प्रतोदपदी माजी मंत्री आ. अमित देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली. याबाबत राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांनी नियुक्तीचे पत्र महाराष्ट्राचे प्रभारी रमेश चेन्निथल्ला यांना पाठविले आहे.

## 'शाहू' मध्ये दोन दिवसीय परिसंवाद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ मार्च -**
येथील शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे, राजर्षी शाहू महाविद्यालय आणि भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने भारत आणि जागतिक दक्षिणेकडील सार्वजनिक धोरण: सिंहावलोकनात्मक विश्लेषण या विषयावर ६ व ७ मार्च रोजी राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या परिसंवादाचे उद्घाटन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील हे असणार आहेत. यावेळी अनेक मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.

## श्री सिध्देश्वर यात्रा महोत्सवानिमित्त पशुपक्षी, अश्व-श्वान प्रदर्शनाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ मार्च -**
श्री सिद्धेश्वर व रत्नेश्वर महाशिवरात्री यात्रा महोत्सवानिमित्त यात्रा समिती, जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभाग व लातूर पंचायत समिती यांच्या संयुक्त विद्यमाने सिध्देश्वर व रत्नेश्वर देवालय परिसरात ७ मार्च २०२५ रोजी पशुपक्षी प्रदर्शन आणि ८ मार्च २०२५ रोजी अश्व व श्वान प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.

यासाठीची नोंदणी त्या-त्या दिवशी सकाळी ८ ते ११ वाजेपर्यंत करण्यात येणार असून त्यानंतर निवड प्रक्रीया करण्यात येईल, असे लातूर पंचायत समितीमार्फत कळविण्यात आले आहे.

पशु प्रदर्शनात सहभागी होण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्यांचे स्वास्थ दाखला प्रमाणपत्र घ्यावे. पशुप्रदर्शनातील सहभागी पशुधनांच्या कानात १२ अंकी पशु आधार नंबर असणे बंधनकारक राहील. पशुधन व श्वान, अश्व गटांची नोंदणी त्या-त्या दिवशी सकाळी ८ ते ११ वाजेपर्यंतच केली जाईल. कुठल्याही परिस्थितीत सकाळी ११ वाजल्यानंतर पशुधनाची नाव नोंदणी केली जाणार नाही. सकाळी ११ ते दुपारी ३ वा.पर्यंतची वेळ पशुधन निवडीसाठी राखीव राहील. प्रत्येक गटातील पशुधनास प्रथम, द्वितीय, तृतीय व ग्रेड नुसार अ, ब, क, ड अशा प्रकारे बक्षिस वितरीत करण्यात येईल. प्रत्येक गटात १० पशुधनाचा सहभाग बंधनकारक राहिल अन्यथा तो गट होणार नाही व त्या गटातील पशुधनास ग्रेड प्रमाणे अ, ब, क, ड या प्रमाणे बक्षिस वाटप करण्यात येईल.

त्यासाठी नोंदणी करताना आधार कार्ड, बँक पासबुकची झेरॉक्स प्रत देणे बंधनकारक राहील. कोणत्याही परिस्थितीत बक्षिसाची रक्कम रोख स्वरुपात दिली जाणार नाही. पशुपालकांनी आपले बहुमुल्य पशुधन व्यवस्थित दोरखंडाने बांधून आपल्या जबाबदारीने ठेवावे. निवड प्रक्रिया पारदर्शक असून निवड समितीचा निर्णय हा अंतिम राहील. निवड समिती अधिकारी, कर्मचारी यांच्याशी हुज्जत अथवा वाद घालणे, यासारखा अनुचित प्रकार आढळल्यास संबंधित पशुपालकाची नोंदणी रद्द करण्यात येईल.

## मालमत्ता कर व गाळे भाडे शास्ती माफी योजनेस मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ मार्च -**
चालू आर्थिक वर्षातील माहे मार्च महिना सुरू झाला तरी बहुतांशी मालमत्ता धारक व गाळे धारकाणी अद्याप टॅक्स भरणा केले नसल्याने लातूर मनपा कर संकलन विभाग व मालमत्ता विभागाच्या वतीने धडक वसुली मोहीम राबविण्यात येत आहे .

नागरिकांनी आपल्या मालमत्तेचा थकीत टॅक्स भरणा करावा यासाठी ५०% शास्ती सुट लागू करण्यात आली होती. तसेच मनपा मालकीच्या व्यापारी संकुलातील गाळे धारकाकडे मोठ्या प्रमाणात गाळे भाडे प्रलंबित असल्याने त्याना व्याजात १००% सुट देण्यात आली होती.



वरील दोन्ही विभागाकडून शास्ती सुट लागू केल्याने बहुतांशी नागरिक व गाळे धारकानी आपल्या कडील टॅक्स, भाडे भरून योजनेचा लाभ घेतला आहे व योजनेस उस्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. परंतु काही मालमत्ता धारक व गाळे धारकानी वैयक्तिक अडचणी मुळे टॅक्स भरणा करू न शकल्याने त्यानी महापालिकेकडे योजनेस मुदतवाढ देण्याची मागणी केली आहे . थकबाकीदार यांची मागणी व माहे मार्च महिन्यात टॅक्स भरणा करण्या कडे असणारा कल विचारात घेऊन मनपा आयुक्त तथा प्रशासक यांनी वरील दोन्ही योजनेस १० मार्च पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे .तरी उर्वरित सर्व थकबाकीदार मालमत्ता धारक व गाळे धारकाणी १० मार्च प्रयंत आपल्याकडील थकीत टैक्स भरणा करून घ्यावा व त्या नंतर कोणतीही सूट लागू होणार नाही याची नोंद घ्यावी असे आव्हान कर संकलन विभागा मार्फत करण्यात येते.

तसेच माहे मार्च महिना सुरुवात झाल्याने थकीत कराच्या व गाळे भाडे वसूलीसाठी नियुक्त पथकामार्फत ३ मार्च पासून जप्तीची कार्यवाही तिव्र करण्यात येणार असून सदर कार्यवाही अंतर्गत मालमत्ता सिल करणे,आटकाव करणे,नळ कनेक्शन बंद करणे,इत्यादी कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच मालमत्ता व गाळे जप्त किंवा सिल करूनही मालमत्ताधारकांनी कर भरणा न केल्यास अशा मालमत्ताधारकांच्या मालमत्तेचा लिलाव /विक्री करून कर वसूल करण्यात येणार आहे.

तरी अधिकाधिक मालमत्ता धारक व मनपा गाळे धारकाणी या संधीचा फायदा घेऊन आपल्याकडील थकीत कर, गाळे भाडे भरून मनपा प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे.

## ५ मार्च रोजी पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ मार्च -**
जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन, मॉडेल करिअर सेंटर व औसा येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) यांच्या संयुक्त विद्यमाने ५ मार्च २०२५ रोजी सकाळी १० वाजता औसा आयटीआय येथे पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या रोजगार मेळाव्यात रोजगार देणारे एकूण १० पेक्षा जास्त आस्थापना, उद्योजक यांनी ३३० रिक्तपदे अधिसूचित केली आहेत.

जहिराबाद येथील जीआयएस इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांनी ट्रेनी तथा ऑपरेटरची ५० पदे अधिसूचित केली असून या पदांसाठी आयटीआय, डिप्लोमा सर्व ट्रेड केलेले उमेदवार पात्र राहतील. पुणे येथील अलाईड रिसोर्स मॅनेजमेंट सर्व्हिसेस इंडिया प्रा.लि. यांनी ट्रेनीची ६५ पदे अधिसूचित केली असून यासाठी इयत्ता दहावी, बारावी, कोणतीही पदवी तथा आयटीआय किंवा डिप्लोमा अशी शैक्षणिक पात्रता निश्चित करण्यात आली आहे. पुणे येथील महिंद्रा अॅन्ड महिंद्रा कंपनी तथा पुणे चाकण येथील युनो मिंडा कंपनीमध्ये ट्रेनीच्या ५० जागा भरल्या जाणार असून यासाठी इयत्ता दहावी, बारावी, कोणतीही पदवी, आय टी आय किंवा डिप्लोमा सर्व ट्रेड अशी शैक्षणिक पात्रता आवश्यक आहे. पुणे येथील भास्कर सर्व्हिसेस अॅन्ड सप्लायर्स इंडिया प्रा.लि. मध्ये ट्रेनी, ऑपरेटर, पेंटर, हेल्परच्या ७० जागा भरल्या जाणार असून यासाठी इयत्ता दहावी, बारावी, कोणतीही पदवी, आय टी आय किंवा डिप्लोमा इंजि. अशी शैक्षणिक पात्रता आवश्यक राहील.

पुणे येथील टॅलेंट सेतू प्रा.लि.मध्ये ट्रेनीच्या ३० जागा भरल्या जाणार असून आयटीआय, डिप्लोमा सर्व ट्रेड अशी शैक्षणिक पात्रता आवश्यक राहील. आधार सोलार बॅक अप पावर सिस्टीममध्ये टेक्निशियनच्या ५ जागा भरल्या जाणार आहेत. यासाठी आय टी आय (इलेक्ट्रिशियन/वेल्डर) अशी शैक्षणिक पात्रता आवश्यक आहे. सोलापूर येथील सनसुर सृष्टी इंडिया प्रा.लि. या आस्थापनेत असिस्टंट मॅनेजर, ब्रँच मॅनेजर, बिझनेस डेव्हलपमेंट ऑफिसरच्या २० जागा भरण्यात येणार असून यासाठी इयत्ता दहावी, बारावी, कोणतीही पदवी अशी शैक्षणिक पात्रता निश्चित करण्यात आली आहे. मुथुट मायक्रोफिन प्रा.लि.मध्ये रिजनल ऑफिसर, फिल्ड ऑफिसरच्या २० जागा भरण्यात येणार असून यासाठी इयत्ता बारावी, कोणतीही पदवी अशी पात्रता निश्चित करण्यात आली आहे. लातूर येथील लाईफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियामध्ये एलआयसी ऍडवाझरच्या १० जागा भरल्या जाणार आहेत.

लातूर
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## शेतकऱ्यांच्या विविध मागण्यासंर्दभात उपजिल्हाधिकारी यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.३ मार्च -**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस अशोकराव पाटील निलंगेकर यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षातर्फे शेतकऱ्यांच्या विवीध मागण्यासंर्दभात निलंगा, शिरुर अनंतपाळ, देवणी तालुक्यातील जनतेच्या वतीने उपजिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

शेतकऱ्यांना २४ तास वीजपुरवठा सुरळीत करावा, पीक विमा रक्कम खात्यात तात्काळ जमा करावे, अतिवृष्ठीच्या शिल्लक शेतकऱ्यांचे अनुदान त्वरीत जमा करणे, कर्जमाफी तात्काळ लागु करावी, कृषि अवजारे व खत बी-बियाणे वरील जीएसटी रद्द करावी, आदी मागण्या केल्या आहेत. वरील सर्व मागण्या शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी शासनाने त्वरीत मंजुर करव्या अन्यथा चक्का जाम आंदोलन करण्यात येईल.

यावेळी जि.प.सदस्य. सुरेंद्र धुमाळ, सुधीर लखनगावे, सरपंच रमेश मोगरगे, सोनाजी कदम, दिनकर निटुरे, अनिल अग्रवाल, सुर्यवंशी व्यंकट, जब्बार अली, दिलीप हुलसुरे, गोविंद पाटील, किरण मगर, सुभाष पाटील, दिनकर पाटील, शिवाजी पाटील, भगवान जाधव, दिलीप बिरादार, भदरगे अशोक, शेख महंमद, बिराजदार भागवत यांच्यासह काँग्रेसचे कार्यकर्ते उपस्थीत होते.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत


## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### सचिन पाटील यांना पुरस्कार जाहीर

**निलंगा, दि.३ मार्च -**



तालुक्यातील औराद शहाजानी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयातील चित्रकला विभागातील सेवानिवृत्त प्राध्यापक तथा सुप्रसिद्ध कथा-कादंबरीकार सुरेन्द्र रावसाहेब पाटील यांनी साहित्यक्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या वाचन चळवळ व भाषा वृद्धीसाठी सातत्याने धडपडणाऱ्या लेखक व व्यक्ती यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी वडिलांच्या नावाने रावसाहेब पाटील साहित्य पुरस्कार देण्याचे ठरवले असून पहिला पुरस्कार सांगली जिल्ह्यातील कर्नाळ येथील सचिन वसंत पाटील यांनी संपादित केलेल्या 'मायबोली रंग कथांचे' या पुस्तकास जाहीर केला आहे. रोख ५००० रुपये, मानचिन्ह, ग्रंथ व शाल असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. कथाकार सचिन पाटील यांनी २२ बोली भाषेतील कथा या पुस्तकात संपादित केल्या आहेत. दि.२७ फेब्रुवारी रोजी प्रा. सुरेन्द्र पाटील यांनी सदर पुरस्काराची घोषणा केली आहे. पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल सचिन पाटील यांच्यावर साहित्य क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### दोन चिमुकल्यांचा पहिला रोजा पूर्ण

**वलांडी, दि.३ मार्च -**



देवणी तालुक्यातील वलांडी येथील उस्मानिया मस्जिदचे मौलवी इब्राहिम हाफिज यांचे चिमुकले ८ वर्षांची अदेबा इब्राहिम शेख आणि ६ वर्षाचा माज इब्राहिम शेख या बहीण-भावाने रमजान महिन्यातील आपला पहिला रोजा पूर्ण केला. त्यांच्या या श्रद्धा व समर्पणामुळे संपूर्ण गावात त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. रमजानचा पवित्र महिना २ मार्चपासून सुरू झाला आहे. सध्या उन्हाळ्याच्या कडाक्यातही या लहानग्यांनी समर्पित भावनेने पहिला रोजा पूर्ण केल्याने गावातील मुस्लिम बांधवांनी त्यांचा पुष्पहार घालून सत्कार केला आणि त्यांना शुभेच्छा दिल्या.

### विजयकुमार भालके यांचे निधन

**अहमदपूर, दि.३ मार्च -**



येथील ज्येष्ठ दस्त लेखक विजयकुमार विश्वनाथप्पा भालके यांचे वृद्धापकाळाने दि.१ मार्च रोजी वयाच्या ८० व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, सूना, नातवंडे, परतवंडे असा मोठा परिवार असून दस्त लेखक पप्पू उर्फ काशिनाथ भालके यांचे ते वडील होत.

### युवक-युवती नेतृत्व विकास शिबिराचे आयोजन

**उदगीर, दि.३ मार्च -**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने 'जिल्हास्तरीय विशेष युवक-युवती नेतृत्व विकास शिबिराचे' आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर ६ ते १० मार्च या कालावधीत महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या परिसरात संपन्न होणार आहे. जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांनी आपल्या विद्यार्थ्यांना या शिबिरासाठी पाठवून सुवर्णसंधी उपलब्ध करून द्यावी, असे आवाहन प्राचार्य डॉ. आर. के. मस्के आणि उपप्राचार्य डॉ. एस. जी. पाटील यांनी केले आहे.

## धवेलीत अंत्यविधीवरुन पुन्हा वाद; महिलांनीच पुढाकार घेत रचले सरण

▶▶ सरणावर चढून शेतकऱ्याने विरोध केला... ▶▶ प्रशासनाने घेतली मध्यस्थितीची भूमिका...



**उदयकुमार पाठक**
**रेणापूर, दि.३ मार्च -**

धवेली (ता. रेणापूर) येथील शेतकऱ्य आणि मयताच्या नातेवाईकांमध्ये वादाची एक गंभीर घटना घडली आहे. मागासवर्गीय समाजाच्या स्मशानभूमीच्या जागेवरून उभ्या असलेल्या वादामुळे धवेली येथे पुन्हा एकदा गोंधळ उडाला. मागील वीस दिवसांपूर्वी, एका मयत व्यक्तीवर २४ तासांनी अंत्यविधी केले गेले होते, आणि शनिवारी (दि. १) रात्री एक ७० वर्षीय महिलेच्या निधनानंतर पुन्हा त्याच स्मशानभूमीवर शेतकऱ्याने अंत्यविधी रोखण्याचा प्रयत्न केला.

स्मशानभूमीवरील जागेच्या मालकीच्या वादामुळे, शेतकऱ्याने या जागेवर अंत्यविधी होऊ देणार नाही, असे स्पष्ट केले. या वादात मयताच्या नातेवाईकांनी आक्रमकता दाखवत, उपजिल्हाधिकाऱ्यांचा आदेश दाखवित शेतकऱ्याला पोलीसांच्या मदतीने बाजूला केले आणि अंत्यविधी पार पाडले.

सविस्तर माहिती अशी की, धवेली येथील सर्वे नं. ६३ मधील गट क्रमांक २५४ मधील स्मशानभूमीच्या जागेवर वंशपरंपरेने मृतांच्या अंत्यसंस्कारांची प्रथा आहे. मात्र, संबंधित शेतकऱ्याने या गटात अंत्यविधी होत नाहीत, असे सांगत या प्रकरणी रेणापूर तहसील कार्यालयात तक्रार दाखल केली होती. त्यानंतर नायब तहसिलदारांनी शेतकऱ्याच्या बाजूने ७/१२ नोंदीवर मसनवाटा कमी करण्याचे आदेश दिले होते. या निर्णयाच्या विरोधात उपविभागीय अधिकारी औसा रेणापूर यांच्याकडे अपील करण्यात आले होते, ज्यावर कार्यवाही सुरू होती. शनिवारी, ८ फेब्रुवारी रोजी ७० वर्षीय अनुसयाबाई गुंडाजी वाघमारे यांच्या निधनानंतर, नातेवाईक आणि ग्रामस्थ स्मशानभूमीवर जाऊन अंत्यविधीसाठी तयारी करत असताना, शेतकऱ्याने पुनः त्यावर विरोध केला. त्यानंतर प्रशासनाचे अधिकारी घटनास्थळी पोहोचले. उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, तहसीलदार मंजुषा भगत, गटविकास अधिकारी सुमित जाधव, सहायक गटविकास अधिकारी सतीश पाटील, पोलीस उपनिरीक्षक घाडगे आणि इतर अधिकारी कर्मचार्यांनी हस्तक्षेप करून शेतकऱ्याला आश्वासन दिले आणि अखेर २४ तासांनंतर अंत्यविधी पार पडला. याच घटना न संपता, २ मार्च रोजी शेतकऱ्याने पुन्हा विरोध केला, आणि अंत्यविधी करणार्या नातेवाईकांना रचलेल्या सरणावर उभा राहून ते रोखण्याचा प्रयत्न केला. यावेळी, मयताच्या नातेवाईकांनी पोलीसांच्या मदतीने शेतकऱ्याला बाजूला करत सरण तयार करून अंत्यविधी पार पाडला.

या घटनेची माहिती मिळताच चाकुर पोलीसांनी शेतकऱ्याला ताब्यात घेतले. प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून, येणाऱ्या काळात या स्मशानभूमीच्या जागेवरील वादावर अंतिम निर्णय घेण्याचे आश्वासन दिले आहे.

## मागील पाच वर्षाच्या कार्यकाळात आपला लोकसेवक म्हणून काम केले : आमदार संजय बनसोडे



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.३ मार्च -**

सन २०१४ पासून मी मतदार संघातील जनतेच्या सेवेत अविरतपणे असल्यानेच मागील २०१९ च्या विधानसभेच्या निवडणुकीत मला पहिल्यांदा आमदार होण्याची संधी आपण सर्वांनी दिली व आपल्या मताचा आदर करुन पक्षश्रेष्ठींनी मंत्री पदाची जबाबदारी दिल्याने मागील पाच वर्षाच्या कार्यकाळात सहा हजार कोटींपेक्षा जास्त विकास निधी खेचुन आणुन मागील कार्यकाळात आपला लोकसेवक म्हणून काम केले असल्याचे मत माजी क्रीडा मंत्री आ. संजय बनसोडे यांनी व्यक्त केले.

उदगीर तालुक्यातील हेर ग्राम स्थांच्या वतीने आयोजीत भव्य नागरी सत्कार सोहळ्याप्रसंगी बोलत होते. यावेळी माजी आ. गोविंद केंद्रे, रामचंद्र तिरुके, बाबासाहेब पाटील, भागवत गुरमे, बालाजी भोसले, वसंत पाटील, रजनीस रासुरे, हणमंतराव हंडरगुळे, लक्ष्मण जाधव, लक्ष्मण गुराळे, बालाजी पुरी, अनंत पाटील, धनाजी माटेकर, गणपती मुंडे, सुदर्शन मुंडे, मारोतीराव घोणसे, विलास कांबळे, मारोतीराव घोणसे, सुधाकर बिरादार, केशव कांबळे, भगवंत मिटकरी, दत्ता बुरले, गंगाधर स्वामी, गुरपत मळभागे, रवी रासुरे, सोयराबाई कांबळे, माधव मिटकरी, तानाजी मुंडे, आदी उपस्थित होते. पुढे बोलताना आ. बनसोडे यांनी, मागच्या काळात केलेल्या विकास निधीमुळेच मतदार संघाच्या चेहरा मोहरा बदलण्याचे काम केल्याने २०२४ च्या निवडणुकीत आपण सर्वांनी ९३ हजाराचे मताधिक्य देवून मला दुस-यांदा आमदार केले. आता आणखीन काम करण्याची जबाबदारी वाढली असुन मी कधीही आमदारकी आणि मंत्री पदाचा गर्व केला नाही. जनतेचा जनसेवक समजुन जनतेच्या सेवेत सदैव उपलब्ध आहे. मी माझ्या ३२ वर्षाच्या राजकीय व सामाजिक जीवनात काम करत असताना मी चळवळीतुन घडलेला कार्यकर्ता असल्याने मला सर्वसामान्यांचे दु:ख समजते. आता एम.एच. ५५ ही उदगीरकरांची महाराष्ट्रात नवी ओळख दिली आहे असल्याचे सांगितले.

यावेळी हेर गावातील नागरीक व महिला उपस्थित होते.

### विद्यार्थ्यांची फ्लॅश इलेक्ट्रॉनिक्स, चाकण येथे निवड

**उदगीर, दि.३ मार्च -**

येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयातील एचएसव्हीसी विभागातील इयत्ता १२ वी इलेक्ट्रॉनिक टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थ्यांची प्रतिष्ठित फ्लॅश इलेक्ट्रॉनिक्स, चाकण (एमआयडीसी, पुणे) येथे प्रशिक्षणासाठी निवड झाली आहे.

यामध्ये गणेश बनसोडे, रुपेश पांडे, सोहेल इकबाल शेख, अथर्व सोनकांबळे, अनिकेत वाहुळे, गोविंद सूर्यवंशी, प्रशांत सूर्यवंशी, गणेश जलंगे, शिवशंकर कुंभार आणि रेखा केदासे यांचा समावेश आहे. फ्लॅश इलेक्ट्रॉनिक्स ही भारतातील नावाजलेली कंपनी असून ती विमान, रेल्वे, चारचाकी, दुचाकी तसेच विविध वाहनांसाठी इंडिकेटर आणि अन्य अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक उपकरणे तयार करते.

यशाबद्दल सर्व निवड झालेल्या मल्लिकार्जुन मानकरी, उपाध्यक्ष डॉ. रेखा रेड्डी, सचिव रामचंद्र तिरुके, ॲड.एस.टी.पाटील चिघळीकर, डॉ. रामप्रसाद लखोटिया, भालचंद्र चाकूरकर, प्राचार्य डॉ.आर.के. मस्के, डॉ.एस.जी. पाटील, प्रा.जी. एस. पाटील तसेच सर्व शिक्षक यांनी अभिनंदन केले.

## अंगणवाडी केंद्र रुद्धा येथे जागतिक कडधान्य दिन साजरा



**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.३ मार्च -**

अहमदपूर तालुक्यातील जि.प. शाळा रुद्धा येथील अंगणवाडी केंद्राच्या वतीने दि.३ मार्च रोजी जागतिक कडधान्य दिन साजरा करण्यात आला. या दिवशी कडधान्याचे महत्त्व शालेय विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यासाठी विविध प्रकारचे कडधान्ये, पालेभाज्या, फळभाज्या, रानमेवा भाज्या आणि लहान मुलांसाठी खेळणी आणि माहिती देणारे फलक शाळेत मांडण्यात आले.

यावेळी राठोड (पं.स. अहमदपूर) यांनी निरीक्षक म्हणून उपस्थित राहून मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षतेखाली साके (मुख्याध्यापिका) यांची उपस्थिती होती. तसेच प्रमुख उपस्थित म्हणून नाथराव केंद्रे (उपसरपंच), डॉ. नाईक (आरोग्य उपकेंद्र अधिकारी), डॉ. धुळे (आरोग्य उपकेंद्र), डॉ. मंद्देवाड (आरोग्य उपकेंद्र), शिल्पा चंदेवाड (शालेय समिती उपाध्यक्षा) उपस्थित होते. कार्यक्रमात जि.प.प्रा. शाळेतील सह शिक्षक माने, नाईनवाड तसेच जि.प.प्रा. शाळेचे कर्मचारी देउ चित्तलवाड, आशा कार्यकर्ती जयश्री केंद्रे, सुवर्णा केंद्रे, सतिश केंद्रे, अंगणवाडी मदतनीस महादिका सुरणर यांच्या सहकार्याने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अखेरीस सर्व मान्यवरांचा व ग्रा.पं.कर्मचारी, जि.प. शाळेचे कर्मचारी, अंगणवाडी सेविका ज्योती बदने यांनी भेटवस्तू देऊन सन्मान केला.

## मुख्य निवडणूक आयुक्तांची वादग्रस्त नियुक्ती; लोकशाही प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ मार्च -**

नुकतेच निवृत्त झालेले भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्यावर निवडणूक प्रक्रियेत हेराफेरी केल्याचे गंभीर आरोप झाल्यानंतरही केंद्र सरकारने विरोधकांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करून ज्ञानेश कुमार यांची नवीन मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून नियुक्ती केली आहे. यामुळे भारतीय लोकशाहीच्या विश्वासार्हतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

विरोधी पक्षांनी या नियुक्तीवर जोरदार आक्षेप घेतला असून, पारदर्शक आणि निष्पक्ष निवडणूक प्रक्रियेसाठी नव्या नियुक्ती पद्धतीची मागणी केली आहे. या पार्श्वभूमीवर 'फूक' संघटनेने राष्ट्रपतींना निवेदन देत मुख्य निवडणूक आयुक्त आणि मुख्य न्यायाधीश यांच्या निवड प्रक्रिया सुधारण्यासाठी एक सर्वसमावेशक, स्वतंत्र आणि पारदर्शी पद्धतीचा अवलंब करण्याची मागणी केली आहे. संघटनेच्या म्हणण्यानुसार, निवडणूक आयोग आणि न्यायव्यवस्थेवर लोकांचा विश्वास कायम ठेवण्यासाठी या पदांवरील नियुक्ती कोणत्याही राजकीय हस्तक्षेपाशिवाय पार पाडली पाहिजे. सध्याच्या नियुक्ती प्रक्रियेमुळे भारतीय लोकशाहीची प्रतिमा मळवली जात असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरही या घटनाक्रमाची



नोंद घेतली जात असून, भारतातील लोकशाही प्रक्रिया पारदर्शक आणि विश्वासार्ह राहील का, याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. आता केंद्र सरकार विरोधकांच्या आणि नागरी संस्थांच्या या मागण्यांकडे कितपत लक्ष देते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

निवेदनावर अध्यक्ष धर्मवीर कदम, उपाध्यक्ष रमेश बाराते, सचिव गणेश वाघमारे, भा.न. शेळके यांच्यासह आदिंच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## एस.टी. कामगार संघटनेच्या अध्यक्षपदी राजकुमार सूर्यवंशी

### सचिवपदी अंकुश काळे

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.३ मार्च -**

निलंगा आगारच्या एस टी कामगार संघटनेच्या अध्यक्षपदी राजकुमार सूर्यवंशी तर सचिवपदी अंकुश काळे यांची निवड करण्यात आली आहे.

तालुक्यातील बाकली येथील रहिवासी राजकुमार सुर्यवंशी हे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ निलंगा आगारात कंडाक्टर या पदावर कार्यरत आहेत. महाराष्ट्र एस.टी. कामगार संघटनेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत राजकुमार सुर्यवंशी यांची एक मताने निवड करण्यात आली.

या सभेसाठी विभागीय कार्यकारणी सदस्य व कामगार संघटना सदस्य यांची प्रमुख उपस्थिती होती. या सभेत निलंगा आगार कामगार संघटनेचे अध्यक्ष म्हणून राजकुमार सूर्यवंशी तर आगार सचिव म्हणून अंकुश काळे यांची एकमतानी निवड करून शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी विभागीय सदस्य शाम येरावाड, प्रकाश शनिमे, खंडू धुमाळ उपस्थित होते.



सदर सभेसाठी उद्धव गौडगावे, हणमंत पाटील, सांडूर उमेश, अनिल बिराजदार, प्रल्हाद विठूबोयाने, संतोष गायकवाड, दयानंद मलशेट्टे, बसवराज स्वामी, गोविंद कन्हेरे, भगवान राजे, दयानंद बडगे, सुधाकर वडमिले, देवा बेंडले, प्रवीण बेंडले, राजा कांबळे, राम मारापल्ले, भोजने जनार्धन, राम शिरूरे, चंदू शिंदे, गणेश थेट्टे, दिलीप येडले, पांडुरंग सुरशीट्टे, दत्ता शिंदे, वाडीकर सुधाकर सह कामगार संघटनेचेचे सभासद उपस्थित होते.

## बहुगुणी पळस बहरला; वसंत ऋतूत निसर्गाचा रंगोत्सव

**तभा वृत्तसेवा / शंकर मिटकर**
**शिरूर अनंतपाळ, दि.३ मार्च -**

शिरूर अनंतपाळ तालुक्यात सध्या पळसाच्या झाडांनी मोठ्या प्रमाणात बहर घेतला आहे. फ्लेम आफ द फायर असे इंग्रजांनी ज्याचे वर्णन केले आहे, तो पळस आजकल चोहीकडे लाल, केशरी, भगवा आणि किंचित पांढऱ्या रंगाच्या फुलांनी नटलेला दिसत आहे. या झाडाच्या भव्य बहरामुळे ते स्थानिक आणि पर्यटकांचे आकर्षण ठरले आहे.

वसंत ऋतूच्या आगमनासोबतच शिशिराची थंडी ओसरून, वृक्षांची पानगळी झाल्यानंतर पळसाची पिवळी-लाल फुलं फुलतात, आणि त्याच्या गंधाने वातावरण सजले जाते. पळसाला पाने तीन अशी प्रसिद्ध म्हण असली तरी या झाडाच्या फुलांचा महत्त्वही मोठा आहे. संस्कृतमध्ये पलाश या शब्दाचा अर्थ फुलांनी बहरलेले झाड असा दिला जातो. शारीरिक आणि आध्यात्मिक दृष्टिकोनातून पळसाची फुले सरस्वती माता आणि कालीका मातेस अर्पण केली जातात.

पळसाची फुले आणि पाने पूर्वी मोठ्या प्रमाणावर पंगतीच्या जेवणासाठी द्रोण आणि पात्र म्हणून वापरली जात होती. कालानंतर तरीही पळसाच्या झाडाला महत्त्व टिकून आहे. या वृक्षाची उंची जास्त नसली तरी त्याचा आकार आणि रंग निसर्गात एक सुंदर रंगोत्सव निर्माण करतात. पळसाची पांढरी, केशरी, लाल, भगवी फुले एकत्र येऊन झाडाच्या प्रत्येक फांदीवर विस्तवाच्या गोळ्यासारखी दिसतात.

पळसाच्या फुलांचा वापर धुलीवंदन सणासाठी रंग तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर केला जातो. आयुर्वेदिक औषधी वनस्पती म्हणूनही पळसाला महत्त्व आहे. पळसाच्या फुलांपासून तयार केलेल्या पाण्याने अंघोळ केली तर त्वचा रोग नाहीसे होतात, असे आयुर्वेद सांगतो. याचे बियाणे देखील औषध म्हणून वापरले जातात.

सध्या शिरूर अनंतपाळ तालुक्यातील शेतशिवारात पळसाच्या बहरलेल्या झाडांच्या मनमोहक दृश्याने निसर्गप्रेमी आणि पर्यटकांना खूप आकर्षित केले आहे. पळसाच्या बहुगुणीतेमुळे या झाडाला आयुर्वेदात विशेष स्थान दिले गेले आहे आणि ते निसर्गाच्या रंगोत्सवाला जिवंत



ठेवण्याचे काम करत आहे.

## जागतिक महिला दिनानिमित्त आज एकल महिला मेळाव्याचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.३ मार्च -**

अहमदपूर उपविभागीय अधिकारी कार्यालय आणि तहसील कार्यालय अहमदपूर यांच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त एकल महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

पतीच्या मृत्युनंतर मुलांच्या पालन पोषणासह संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी घेत, प्रतिकूल परिस्थितीतही हिम्मत न हारता कौटुंबिक जबाबदारी यशस्वीपणे सांभाळणाऱ्या महिलांच्या मनोबलाला प्रोत्साहन देण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमाद्वारे एकल महिलांना विविध सरकारी योजनांचा लाभ मिळवून देण्याचा उद्देश आहे. महिलांना योग्य माहिती न मिळाल्यामुळे अनेक योजनांचा लाभ त्यांच्यापर्यंत पोहचलेला नाही.

या कार्यक्रमात तहसील प्रशासन, पोलीस प्रशासन, पंचायत समिती, कृषी विभाग आणि अन्य विभाग सहभागी होणार आहेत. यावेळी संबंधित विभाग महिलांना त्या योजनांचा लाभ कसा घेता येईल याबाबत मार्गदर्शन करतील. सदर कार्यक्रम पार्वती मंगल कार्यालय, थोडगा रोड, अहमदपूर येथे दि.४ मार्च रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षतेखाली वर्षा ठाकूर घुगे, जिल्हाधिकारी, लातूर असतील.

कार्यक्रमाला अधिकाधिक एकल महिलांनी उपस्थित राहावे, असे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक डॉ. मंजुषा लटपटे, उज्वला पांगरकर, तहसीलदार अहमदपूर यांनी केले आहे.